# माझे गुरु
# धनंजयराव गाडगीळ

नी. वि. सोवनी

## आमची नवी प्रकाशने

पु. ल. देशपांडे

जावे त्यांच्या देशा

गुण गाईन आवडी

१ (एकांकिका)

# माझे गुरु
# धनंजयराव गाडगीळ

नी. वि. सोवनी

प्रकाशक
रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी
७३९ बुधवार, पुणे २

© नी. वि. सोवनी

पहिली आवृत्ती १९७४
प्रति १०००

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ सदाशिव, पुणे ३०

## प्रस्तावना

गाडगिळांच्या मृत्युसमयी (मे १९७१) मी बँकॉकला होतो. त्यांच्या मृत्यूनंतरच्या दोन तीन महिन्यात या पुस्तकातील पहिला व्यक्तिविषयक भाग मी लिहून काढला. साधन सामुग्रीच्या अभावी गाडगीळांच्या विचारासंबंधीचा भाग बँकॉक येथे लिहिणे अशक्यच होते. फेब्रुवारी १९७३ मध्ये मी परत मायदेशी आल्यावर पहिला भाग बऱ्याच लोकांना वाचावयास दिला व त्यांच्या प्रतीक्रिया अजमावून त्यात सुधारणा केल्या. दुसरा भाग नंतर लिहून काढला. तोही बऱ्याच लोकांनी वाचून निरनिराळ्या सूचना केल्या. त्या विचारात घेऊन तो सुधारला. हे दोन्ही भाग विषय सुसंगतीसाठी वेगळे लिहिले तसेच येथे छापले आहेत.

ज्या माझ्या मित्रांनी हे पुस्तक अगर त्याचा काही भाग वाचून मला सूचना केल्या त्यांचा मी आभारी आहे. या मित्रांची संख्या बरीच असल्यामुळे त्यांचा नामनिर्देश करीत नाही. फक्त त्यांचे ऋण मान्य करतो.

पुणे
२७।१०।१९७३

**नी. वि. सोवनी**

# भाग पहिला

# व्यक्ती

प्रज्ञावान् अर्थशास्त्रज्ञः मेधावी अर्थकारणी ।
त्यागी नेता गुरुश्रेष्ठः सव्यसाची धनंजयः ।।

## उपोद्घात

सोमवार, ता. ३ मे १९७१ रोजी बँकॉक येथे नेहमीप्रमाणे सकाळी ७॥ वाजता कामास गेलो. ९ वाजता रोजच्याप्रमाणे माझ्या खोलीत माझे दोन सहकारी कॉफी पिण्यासाठी आले. कॉफीचा पहिला हप्ता झाला न झाला तोच फोन वाजला. एशिअन इन्स्टिट्यूटचे डॉ. मेहता यांचा फोन होता की आदल्या दिवशी सकाळी प्रा. ध. रा. गाडगीळ दिल्लीहून मुंबईस येत असताना गाडीतच त्यांना हृदयविकाराचा झटका आला व ते निधन पावले. त्यांचा फोन खाली ठेवतो न ठेवतो तो श्री. भाटवडे-करांचा फोन आला. तीच बातमी सांगणारा! लगेच तिसरा फोन शैलाचा घरून आला की, तिला ही बातमी नुकतीच सौ. भाटवडेकरांच्या-कडून कळली. मला कळली का? आणि मी ठीक आहे ना? कारण तिला स्वतःला फार अस्वस्थ वाटत होते.

तिची शंका बरोबर होती. ही बातमी ऐकून मला धक्का बसेल व मी अस्वस्थ होईन असे तिला वाटणे साहजिक होते. परंतु मला धक्का बसला नाही हे खरे! मी ती बातमी शांतपणे ऐकली व शांतपणे तिचा स्वीकार केला. मला स्वतःलाही याचे आश्चर्य वाटले. पण अधिक विचार करता असे लक्षात आले की ही बातमी मला अनपेक्षित नव्हती. १९७० च्या मार्च महिन्यात मी बँकॉकला काही कामासाठी आलो होतो व तेथून

परत जाताना मुद्दाम दिल्लीस जाऊन गाडगीळांची भेट घेतली होती. त्या वेळी हृदयविकाराच्या दुसऱ्या झटक्यातून ते बाहेर पडत होते. त्या वेळी त्यांची विकल स्थिती पाहताच मला फार मोठा धक्का बसला. त्यांच्या शरीरावर मृत्यूची कळा मला स्पष्ट दिसली आणि त्यांचा मृत्यू आता फार लांब नाही याची जाणीव झाली. त्यानंतरचे एक-दोन दिवस अगदी सुन्न अवस्थेत गेले. मला वाटते की मला बसावयाचा तो धक्का त्याच वेळी बसला व त्यांच्या मृत्यूची बातमी त्यानंतर केव्हाही ऐकावयास माझ्या मनाची तयारी झाली. त्यानंतर गाडगीळांना बरे वाटले व त्यांची प्रकृती सुधारली. १९७० च्या नोव्हेंबरात बँकॉकहून दिल्लीस जाण्याचा योग आला त्या वेळी त्यांना भेटलो. तेव्हा त्यांची प्रकृती बरी दिसली. तथापि माझ्या मनातला किंतू गेला नाही. बँकॉकला परत आल्यावर मी शैलाला म्हटले की, "गाडगीळ ठीक दिसले. परंतु मला त्यांचा भरवसा वाटत नाही. त्यांनी दिल्ली सोडावी. परंतु त्यांच्या मनात ते दिसत नाही. ते आपल्या प्रकृतीचा अंत पहात आहेत." या पार्श्वभूमीवर त्यांच्या मृत्यूची बातमी आकस्मिक असून सुद्धा मला शांतपणे स्वीकारता आली याचे आश्चर्य वाटावयास नको.

गाडगीळांच्या मृत्यूने एका ध्येयवादी उदात्त जीवनाचा अंत झाला. त्यांनी नुकतेच ७१ व्या वर्षात पदार्पण केले होते. त्यामुळे एका दृष्टीने जरी त्यांचा मृत्यू अकाली नव्हता तरी तो ज्या प्रकारे झाला त्याचा विचार करता तो अकालीच होता असे म्हणणे भाग आहे. त्यांना आणखी १०–१५ वर्षे आयुष्य लाभावयास मुळीच हरकत नव्हती. परंतु समाजकार्यातून निवृत्त होऊन त्यांनी जगावे अशी जणू नियतीची इच्छाच नव्हती! (कदाचित त्यांची स्वतःचीही नसावी!) आत्यंतिक कार्यप्रवण आयुष्य जगणाऱ्या व्यक्तींना निवृत्तीचे आयुष्य फारसे सुखावह होत नाही असा अनुभव आहे. या दृष्टीने निवृत्त होण्याच्या रेषेवरच त्यांनी आपले जीवन संपविले. आणि सार्थ रीतीने संपविले! आम्हा त्यांच्या विद्यार्थ्यांना व सहकाऱ्यांना त्यांच्या मृत्यूमुळे कितीही दुःख झाले तरी या सार्थकतेकडे पाहून आम्हाला आमचे दुःख आवरणे भाग आहे.

## माझी भूमिका

गाडगीळांच्या जीवनाचे मूल्यमापन करण्याचा मी येथे प्रयत्न करीत आहे. १९३७ साली मी त्यांचा विद्यार्थी झाल्यापासून प्रथम विद्यार्थी म्हणून व पुढे सहकारी म्हणून १९६६ सालापर्यंत त्यांच्याशी माझा निकटवर्ती संबंध आला. त्यांच्याशी वैमत्य होऊन मी १९६६ मध्ये परदेशी गेल्यामुळे तो संपला. परंतु पुन्हा १९६९ साली गाडगीळांनी मला पत्र लिहून तो जोडला व आमच्यातील किल्मिष नाहीसे झाले. त्यानंतर त्यांच्या मृत्यूपर्यंत आमचे संबंध पूर्वीसारखे राहिले. गाडगीळांच्याशी इतका दीर्घकालीन निकटचा संबंध असलेली व अगदी जवळून त्यांचे चरित्र माहिती असलेली माझ्याव्यतिरिक्त एखाददुसरीच व्यक्ती असण्याचा संभव आहे. म्हणून त्यांच्या जीवनाची समीक्षा प्रामाणिकपणे करण्याची माझ्यावर जबाबदारी आहे असे मी समजतो. मला हिंदुस्थानातील नेहमीच्या पद्धतीप्रमाणे गाडगीळांचे लोकमाहात्म्य लिहावयाचे नाही. ही समीक्षा आहे आणि तिच्यातील काही भाग अगर सर्वच्या सर्व समीक्षा सुद्धा गाडगीळांच्या अनेक चाहत्यांना व निकटवर्तीयांना कदाचित आवडणार नाही. तथापि, मला जे प्रामाणिकपणे वाटले, दिसले ते मी लिहिले आहे. प्रसिद्ध व्यक्तींची समीक्षा करताना स्वतः गाडगीळ जे निकष लावीत असत तेच त्यांच्याही चरित्रास लावण्याचा मी प्रयत्न केला आहे. तो कितपत यशस्वी झाला आहे हे सांगावयास ते स्वतःच हयात असते तर फार बरे झाले असते. परंतु ते आता शक्य नाही. स्वमताशी प्रामाणिक राहण्याचा, आपली मते नीट पारखून बनविण्याचा व ती निर्भीडपणे मांडण्याचा धडा मी गाडगीळांच्यापाशीच शिकलो आहे. त्यांच्याशी प्रतारणा करून ही समीक्षा करणे मला अशक्य आहे. ही समीक्षा प्रखर असेल, क्वचित मूर्तिभंजकही असेल, परंतु प्रामाणिक आहे. ती स्वतः गाडगीळांच्या परंपरेतीलच आहे हे येथे आग्रहाने सांगू इच्छितो.

## बालपण व शिक्षण

गाडगीळांचा जन्म नाशिक येथे १० एप्रिल, १९०१ रोजी झाला• त्यांचे शालेय शिक्षण नागपूरच्या पटवर्धन हायस्कूलमध्ये झाले. १९१७ साली सीनिअर केंब्रिजची परीक्षा ते उत्तीर्ण झाले व त्याच वर्षी त्यांनी केंब्रिज विद्यापीठात प्रवेश मिळवून विलायतेस प्रयाण केले. ते १९२३ साली परत हिंदुस्थानात आले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासातील ही वर्षे फार महत्त्वाची आहेत. त्यांच्या शालेय शिक्षणाच्या काळात राजकारणावर व महाराष्ट्रावर लो. टिळकांचा प्रभाव जबरदस्त होता. गाडगीळांच्या संस्कारक्षम मनावर टिळकांचा फार खोल ठसा उमटलेला दिसतो. १९१७ साली ते केंब्रिज येथे शिक्षणासाठी गेले त्या वेळी त्यांनी आपल्याबरोबर दोनच मराठी पुस्तके नेली होती. ती म्हणजे "गीता-रहस्य" आणि "नवनीत". या पुस्तकांच्या निवडीत सुद्धा त्यांच्या त्या वेळच्या मन:स्थितीचे प्रतिबिंब पडलेले आहे. त्या वेळच्या काळास अनुरूप अशा राष्ट्रीय विचारांनी ते भारलेले असले तर नवल नव्हते. त्यांना केंब्रिज येथे पाठवण्यात त्यांच्या वडिलांचा हेतू त्यांनी I. C. S. च्या परीक्षेस बसावे हा होता. स्वत: गाडगीळांना हा हेतू कितपत मान्य होता याबद्दल निश्चित सांगता येत नाही. तथापि त्याबद्दल ते साशंक असावेत व या त्यांच्या साशंकतेची त्यांच्या वडिलांना कल्पना असावी असे त्या वेळी झालेल्या एका प्रसंगावरून ध्यानात येते. गाडगीळ केंब्रिज येथे असताना १९१८–१९ साली लो. टिळक विलायतेस गेले होते. ४ जून, १९१९ रोजी ते केंब्रिजला व्याख्यान देण्यासाठी गेले. त्याचे बातमीपत्र 'केसरी'त पुढीलप्रमाणे प्रसिद्ध झाले :

"लंडन : ५ जून १९१९ : टिळक कालच (ता. ४ जून रोजी) केंब्रिज येथे जाऊन आले. केंब्रिज येथे सुमारे ८०।९० हिंदी विद्यार्थी हिंदुस्थानच्या सर्व भागांतून अभ्यासाकरिता आले आहेत. हिंदी मजलिस नावाची संस्था केंब्रिज येथे आज काही वर्षे अस्तित्वात असल्याचे केसरीच्या वाचकांस माहीत असेलच. या सभेत व्याख्याने वादविवाद

मोकळ्या मनाने होतात. या सभेपुढे काल टिळकांचे व्याख्यान झाले. हिंदी विद्यार्थ्यांखेरीज काही थोडे युरोपियन विद्यार्थीही मुद्दाम आले होते. देशाच्या सद्य:स्थितीचे वर्णन करून टिळकांनी आपल्या तरुण श्रोत्यांस असा रोखठोक प्रश्न केला की, "तुम्ही उच्च प्रतीचे शिक्षण मिळवून व स्वतंत्रतेच्या हवेत पिकणारे विचार घेऊन हिंदुस्थानात जाणार. पण केवळ स्वार्थसाधनपर न बनता देशकार्याला वाहून घ्यावयाचे असा निश्चय तुम्हांपैकी किती जणांनी केला आहे?" याला उत्तरे देताना काही विद्यार्थ्यांनी पोरबुद्धीमुळे व अज्ञानामुळे बराच हशा पिकविला. तथापि पुष्कळांच्या मनावर प्रश्नाचे मर्म ठसून त्यांनी आपण तुमच्या उपदेशाप्रमाणे खास वागणार आहो असे सांगितले. एका तरतरीत ब्राह्मण मुलाने त्यांना आश्वासन दिले की मी सिव्हिल सर्व्हिस परीक्षा पास होणार, पण नोकरीत शिरणार नाही असा निश्चय तुमच्या उदाहरणावरून पूर्वीच केला आहे. ईश्वर या मुलाला आपला निश्चय पाळण्यास सामर्थ्य देवो. कारण जाणूनबुजून स्वार्थत्याग कशाला म्हणतात याचे ते एक उदाहरण होईल."[1]

हे वृत्त केसरीत प्रसिद्ध झाल्याबरोबर हा विद्यार्थी दुसरा कोणी नसून आपला मुलगाच असणार असे गाडगीळांच्या वडिलांना वाटले आणि त्यांनी तातडतोब त्याला त्याची खरडपट्टी काढणारे पत्र लिहिले. त्याला गाडगीळांनी उत्तर पाठविले की, मी त्या सभेस हजर होतो. परंतु असे जाहीर करणारा विद्यार्थी मी नव्हे. मी असले काही केले नाही. गाडगीळांनी अशा रीतीने देशसेवेची शपथ घेतली नाही परंतु शपथ घेतली असती तर जे केले असते ते शपथ न घेता केले. (अशा रीतीने जाहीर-

१. न. चिं. केळकर, लो. टिळकांचे चरित्र, खंड ३, भाग ५ वा, १९२८, पृ. ४० येथे उल्लेखिलेला तरतरीत ब्राह्मण विद्यार्थी कोण हे पुष्कळांना माहीत आहे. परंतु केसरीच्या बातमीदाराच्या प्रार्थनेप्रमाणे ईश्वराने त्याला आपला निश्चय पाळण्यास सामर्थ्य दिले नाही हेही पुष्कळांना ठाऊक आहे. हा विद्यार्थी सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा पास झाला, नोकरीत शिरला व यथाकाल निवृत्त झाला हा इतिहास आहे.

रीतीने आणाशपथा घेण्यास लागणारा भावनात्मक स्वभाव त्यांचा नव्हता.) वडिलांच्या रागाची पर्वा न करता I. C. S. परीक्षेस बसण्याचे नाकारले व केंब्रिज विद्यापीठाची संशोधनात्मक उच्च पदवी मिळविण्याचा आपला हेतू त्यांना स्पष्ट कळवला. आपल्या बुद्धिमत्तेचा व विद्या-व्यासंगाचा आपल्या देशासाठीच सर्वस्वी उपयोग करावयाचा संकल्प त्यांनी याच वेळी सोडलेला दिसतो. टिळकांच्या व्यक्तित्वाचा प्रभाव गाडगीळांनी ठरविलेल्या त्यांच्या जीवनाच्या ध्येयावर स्पष्टपणे उमटलेला आहे.

## केंब्रिज येथील अध्ययन

केंब्रिज येथील अर्थशास्त्राच्या अध्ययनात गाडगीळांना लाभलेले गुरू म्हणजे पिगू, केन्स, रॉबर्टसन, शव्ह, ऐलीन पॉवर व हेंडरसन हे होत. मॉरिस डॉब हे त्यांचे सहाध्यायी होते. पिगू हे अर्थशास्त्राचा प्राथमिक पाठ घेत. रॉबर्टसन हे त्याहून वरच्या पातळीवरचा पाठ घेत. बाकीची मंडळी त्यांच्या स्वतःच्या आवडीच्या विषयावर पाठ देत असत. केन्स यांचे १९२३ साली प्रसिद्ध झालेले पुस्तक Tract on Monetary Reform हे गाडगीळांच्या वर्गास प्रथम व्याख्यानरूपाने केन्स यांनी पढविले होते. या सर्वांत हेंडरसन हे गाडगीळांचे विशेष गुरू होते. केंब्रिजमधील पद्धतीप्रमाणे ते त्यांचे ट्यूटर होते. केंब्रिजमधील वास्तव्यात जवळ जवळ दर आठवड्यास या गुरुशिष्यांच्या भेटी होत असत. या भेटीत पूर्वी झालेला अभ्यास व पुढे करावयाचा अभ्यास यासंबंधी योजना होई. संशोधनात्मक पदवीसाठी लागणारे संशोधनही गाडगीळांनी हेंडरसन यांच्याच मार्गदर्शित्वाखाली केले. हेंडरसन यांच्याबद्दल गाडगीळ हे फार आदराने बोलत असत.

या गुरूंच्याबरोबरच वेब पतिपत्नींच्या अभ्यासू संशोधनाचा व जीवितकार्याचा गाडगीळांच्या मनावर खोल ठसा उमटलेला होता. आपल्या देशात परत गेल्यावर आपण काय करावयाचे याचा विचार करताना त्यांनी त्यांचे गुरू हेंडरसन, केन्स व वेब पतिपत्नी यांच्याकडून स्फूर्ती घेतलेली दिसते. केन्स व हेंडरसन यांचा वर्तमानपत्रांशी घनिष्ठ संबंध

होता. देशाच्या आर्थिक व इतर धोरणांबद्दल ते दोघेही सतत जाहीरपणे लिहीत असत. वेब पतिपत्नींचा मजूर पक्षाशी असलेला संबंध जगजाहीरच होता. या मंडळींच्याप्रमाणेच आपणही हिंदुस्थानात कार्य करावे असे गाडगीळांना वाटले असले तर त्याचे नवल वाटावयास नको. तथापि केंब्रिज-मधील शिक्षक परंपरेतील रॉबर्टसन, पिगू, शव्ह यांच्याप्रमाणे आपण फक्त अध्ययन आणि अध्यापन यातच स्वतःस गुंतवून घ्यावे असे त्यांना वाटले नाही ही गोष्ट त्यांच्या पुढच्या चरित्राच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

गाडगीळांची वैचारिक बैठक त्यांच्या केंब्रिज येथील अध्ययनाच्या काळात तयार झालेली आढळते. अर्थशास्त्रातील प्रथम पदवी संपादन करण्यासाठी त्यांना मार्शल व त्यांचे समकालीन अर्थशास्त्रज्ञ यांनी निर्मिलेल्या आर्थिक सिद्धान्तनाचा व सिद्धान्त-पद्धतीचा अभ्यास करावा लागला. या विचारपद्धतीचे साम्राज्य त्या वेळी जरी अप्रतिहत होते तरी तिच्या परिपूर्णतेबद्दल जास्त जास्त शंका निर्माण होऊ लागल्या होत्या. तिच्यातील दोष, तार्किक असंगती ही शोधली जाऊ लागली होती. खुल्या आर्थिक व्यवहाराचे धोरण सर्वस्वी कल्याणकारी होत नाही. त्यासाठी सरकारला विशिष्ट प्रसंगी व ठिकाणी हस्तक्षेप करणे, निर्बंध घालणे भाग पडते व जरूरीचे असते ही विचारसरणी बलवत्तर होत होती. प्रा. पिगू हे या मतप्रणालीचे प्रवर्तक होते. त्याचप्रमाणे पैशा-संबंधीचे नवीन सिद्धान्तन आवश्यक आहे याची जाणीव निर्माण होऊन केन्स, रॉबर्टसन वगैरे विचारवंतांचे या दृष्टीने प्रयत्नही सुरू झाले होते. या गुरूंच्याकडून हे विचारधन गाडगीळांनी शिकून आत्मसात केले.

याशिवाय त्या वेळी इंग्लंडमध्ये वाहणाऱ्या विचारओघात फेबियन सोसायटीची विचारसरणीही चांगलीच तेजीत होती. वेब पतिपत्नी, टॉने वगैरे विचारवंतांनी जोपासलेली ही विचारसरणी गाडगीळांना पुष्कळच आवडली. आर्थिक व सामाजिक समता, सहकार यांच्याशी निगडित असलेले हे तत्त्वज्ञान त्यांनी या विचारवंतांच्या लिखाणावरून अंगीकृत केले. त्यांच्या केंब्रिज येथील अभ्यासावयाच्या विचारसरणीस समांतर व मिळती-जुळती अशीच ही फेबियन विचारसरणी होती.

सरकारने फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहारांचे नियंत्रण करण्याची आवश्यकता, नियोजनाचे महत्त्व, आर्थिक व सामाजिक समता ह्या गाडगीळांच्या सर्वच लिखाणात दिसणाऱ्या मूळ कल्पनांचे बीज येथे रुजले व त्यांच्या वैचारिक बैठकीत या गोष्टी पायाभूत होऊन बसल्या.

अर्थशास्त्रीय सिद्धान्तांचा जरी त्यांनी अभ्यास केला तरी आर्थिक इतिहास हेच आपल्या संशोधनाचे क्षेत्र म्हणून नंतर निवडले. '१८५०–१९१४ या काळातील हिंदुस्थानचा आर्थिक इतिहास' हा विषय त्यांनी संशोधनासाठी निवडला. ह्या संशोधनाचे प्रसिद्ध झालेले फलित त्या विषयावरचा प्रमाणभूत ग्रंथ म्हणून आजही मानला जातो.[1] तो प्रसिद्ध झाल्यापासून आतापर्यंतच्या ५० वर्षांत या विषयावर पुस्तके लिहिली गेली. परंतु गुणवत्तेच्या क्रमाने विचार केला तर त्यांपैकी एकही गाडगीळांच्या ग्रंथाहून उच्चतर अशी पातळी गाठू शकलेले नाही.

१८५०–१९१४ या काळातील हिंदुस्थानातील आर्थिक घडामोडींचा अभ्यास करणाराला दोनतीन गोष्टी फार प्रामुख्याने जाणवतात. या काळात हिंदुस्थानाबाहेरील देशात झालेल्या उत्पादनतंत्रातील नवनवीन शोधांमुळे व त्यातून निर्माण होणाऱ्या औद्योगिक बनावटीच्या मालाच्या आयातीमुळे हिंदुस्थानातील नागर व ग्रामीण उद्योगधंद्यांचा झालेला ऱ्हास; त्यातून निर्माण झालेली जुन्या उत्पादन साधनांची व कामगारांची बेकारी. दुसरे म्हणजे परकीय सरकारचे खुल्या आर्थिक व्यवहाराचे बाह्यतः तात्त्विक परंतु खरोखर स्वार्थी धोरण आणि तिसरे, या सर्व घडामोडींत व्यापारी, सावकार, सरकारी नोकरवर्ग ( मुख्यतः ब्राह्मणांचा ) वगैरे काही वर्गांचा पिकलेली पोळी व त्यांना प्राप्त झालेली सुस्थिती. अनंत जनतेचे जरी नुकसान झाले तरी या वर्गांचा फायदा झाला व दोहोंमधील आर्थिक विषमता पूर्वीपेक्षा वाढली. आर्थिक इतिहासाच्या अभ्यासाने मनावर ठसा उमटवणाऱ्या ह्या दोनतीन गोष्टी व गाडगीळांनी संशोधनास आरंभ करण्यापूर्वी आत्मसात केलेली तत्त्वे ही थोडी फार

१. D. R. Gadgil, *Industrial Evolution of India,* Oxford University Press, Bombay, 1924.

परस्परावलंबी असली तरी एकमेकांना पूरक होती. गाडगीळांच्या विचार-सरणीचा स्थायीभाव हा त्यांच्यातूनच पक्का झाला.

त्यांच्या मनाचा कल ऐतिहासिक मीमांसेकडे होता. आर्थिक सिद्धान्तनाच्या विरळ वातावरणात त्यांचे मन रमण्यासारखे नव्हते. त्यांच्या विद्यार्थिदशेच्या काळात अर्थशास्त्रात नुकतेच उदयास येऊ लागलेले विगमनात्मक चिकित्सेचे शास्त्र त्यांना अधिक पटण्यासारखे होते व ते त्यांनी अंगीकारले. त्या काळचे आर्थिक सिद्धान्तन त्यांनी समजावून घेतले, त्याचा अभ्यास केला. ते सर्वसाधारणपणे त्यांना त्या काळात मान्य होते असे दिसते. हिंदुस्थानात परत आल्यावर त्यांनी मराठीतील आपला पहिला लेख ' विद्यासेवकात ' लिहून डॉ. केतकरांच्या स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्राच्या कल्पनेस विरोध केलेला आढळतो. तथापि हळूहळू त्यांची विचारसरणी बदलली. १९४२ साली ' हिंदी अर्थशास्त्राचा पाया ' या लेखात त्यांनी त्यांची त्या वेळची मते ज्या केतकरांना त्यांनी पूर्वी विरोध केला होता त्यांच्या मताशी जास्त जुळती आहेत असे कबूल केले. त्याचप्रमाणे त्या वेळच्या अर्थसिद्धान्तनास पायाभूत असलेल्या सीमान्त सिद्धान्तनावरचा त्यांचा विश्वास पुढे पुढे अजीबात उडाला. मजुरीचे दर, शेतांचा खंड हे या सिद्धान्ताप्रमाणे मुळीच ठरत नाहीत. हिंदुस्थानात तर नाहीच नाही, असे त्यांनी प्रतिपादन केलेले आढळेल.

## ध्येयशोधन

केंब्रिज येथील विद्यार्थिदशेतील त्यांच्या विचारांचा झालेला विकास वर्णन करताना मी अनवधानाने पुढच्या काळाबद्दल लिहू लागलो. परंतु कालसंगती पुन्हा जुळवावयास पाहिजे. गाडगीळांचे ध्येयशोधन मुख्यतः केंब्रिजमध्येच झाले. आयुष्यात आपले कार्यक्षेत्र कोणते, त्यात आपल्याला कोणती भूमिका घ्यावयाची आहे, आपल्याला आयुष्यात काय साधा-वयाचे आहे, वगैरे प्रश्नांसंबंधी पुष्कळ विचार करून व त्यासंबंधीचे निश्चित निर्णय करूनच गाडगीळ १९२२ साली हिंदुस्थानात परत आले. त्यासंबंधी आता लिहावयाचे आहे.

पूर्वी वर्णन केल्याप्रमाणे टिळकांच्या व्यक्तित्वाचा, बुद्धिमत्तेचा व चारित्र्याचा ठसा त्यांच्या मनावर फार खोलवर उमटलेला होता. राजकीय किंवा सामाजिक क्षेत्रात कार्य करावयाचे तर त्यातल्या प्रश्नांचा सखोल अभ्यास केला पाहिजे व नंतरच त्यासंबंधी काय करावयाचे याची रूपरेषा आखली पाहिजे अशी त्यांची खात्री झाली होती. लो. टिळक याप्रमाणे वागतात असे त्यांचे मत होते. सर्व प्रश्न बुद्धीच्या निकषावर तपासले पाहिजेत हे मूलभूत तत्त्व गाडगीळांना मान्य होते. केंब्रिज येथे अर्थशास्त्रादि सामाजिक शास्त्रांचे ज्ञान संपादन करावे व मायदेशी परत जाऊन टिळकांच्या हाताखाली त्यांचा साहाय्यक म्हणून काम करावे असे त्यांनी मनाशी ठरविले होते. परंतु १९२० साली लो. टिळक वारले. त्यांच्यानंतर जे त्यांचे सहकारी त्यांच्या जागी आले ते टिळकांच्या मानाने बुद्धिसामर्थ्यात व राजकारणात दुय्यम दर्जाचे होते. त्यांना मिळून विशेष काही करता येईल की काय याबद्दल गाडगीळ साशंक होते. त्यामुळे हा मार्ग त्यांनी सोडून दिला.

गाडगीळांनी देशसेवेसाठी आयुष्य वहावयाचे ठरविले. परंतु टिळकांबरोबर काम करण्याचा मार्ग बंद झाल्यावर त्याला पर्याय शोधणे भाग आले. तो शोधताना गाडगीळांनी जो विचार केला त्याचा उलगडा त्यांच्या मन:प्रवृत्तीसंबंधी लिहिल्याखेरीज होणार नाही. गाडगीळांचा पिंड क्रियावानाचा होता. त्यांना कृतिशीलतेचा ध्यास होता. प्रत्यक्ष राजकारणात भाग घेण्यास अनुकूल परिस्थिती असती तर त्यांनी तसे केले असते. परंतु पुढे वर्णन केल्याप्रमाणे तशी परिस्थिती अस्तित्वात नाही अशी त्यांची खात्री झाल्यामुळे ते आपद्धर्म म्हणून पांडित्यात पडले. त्या वेळच्या परिस्थितीत प्रत्यक्ष राजकारणात भाग घेऊन देशाचे धोरण वगैरे ठरविण्याची संधी मिळण्याची शक्यता त्यांना फार कमी वाटली. म्हणून ज्या पर्यायामुळे अप्रत्यक्षरीत्या तरी ते साधता येईल असा पर्याय म्हणून पांडित्यात पडण्याचे त्यांनी ठरविले. या बाबतीत त्यांची वृत्ती टिळकांच्या अगदी विरुद्ध होती असे दिसते. 'स्वतंत्र हिंदुस्थानात मी गणिताचा प्राध्यापक झालो असतो' असे लो. टिळक

म्हणत असत असे सांगतात. गाडगीळ परतंत्र हिंदुस्थानात प्राध्यापक-पंडित झाले. स्वतंत्र हिंदुस्थानात त्यांना आपले चरित्र घडवावयाचे असते तर ते चुकून सुद्धा प्राध्यापक अगर संशोधक झाले नसते! त्यांना असामान्य बुद्धीची देणगी लाभली होती आणि वर उल्लेखिलेल्या क्रियावानाच्या अगर पंडिताच्या भूमिकेपैकी कोणतीही ते उत्कृष्ट रीतीने करू शकले असते. परंतु त्यांचा मूळ ओढा क्रियावान होण्याकडे होता. कृतिशीलतेच्या जबरदस्त ओढीमुळेच गाडगीळांना आगरकरांच्याबद्दल विशेष प्रेम नव्हते. आगरकरांची सुधारणा ब्राह्मणांपुरती व ती सुद्धा पाश्चिमात्य आदर्शावर बेतलेली असे ते म्हणत. आगरकरांच्या बुद्धिवादाबद्दलही त्यांना फारसा आदर नव्हता. किंबहुना ' मी स्वतः निव्वळ बुद्धिवादी नाही. मी परंपरा वगैरे मानतो, ' असे ते नेहमी म्हणत. पण त्यांचा मुख्य आक्षेप आगरकरांच्या अकृतिशीलत्वाबद्दल होता. ' आगरकरांना प्रत्यक्षात काहीच करावयाचे नव्हते. फक्त विचार मांडावयाचे होते. तेव्हा त्यांनी तर्क अप्रतिहत चालवावा व परंपरा वगैरे गोष्टींच्या उच्छेदाच्या गोष्टी बोलाव्या हे ठीकच होते. हाताशी वर्तमानपत्र होते. त्यात मनाला येईल ते त्यांना लिहिता येत असे. प्रत्यक्षात समाजाची सुधारणा घडवून आणण्याच्या फंदात ते पडले असते तर त्यांना आपल्या तर्काला मुरड घालावी लागली असती ' असे ते म्हणत.

मुळात कृतीकडे ओढा असून सुद्धा लो. टिळकांच्या मृत्यूनंतरच्या हिंदुस्थानातील परिस्थितीत कोणते कार्य करावे हे ठरविणे अवघड होते. हा गांधीयुगाचा उदयकाल. यातील राजकारण बुद्धीपेक्षा आतल्या आवाजावर आधारलेले. अभ्यासापेक्षा श्रद्धेने प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणारे. या सर्वांचेच गाडगीळांना वावडे होते. त्यांचा यावर मुळातच विश्वास नव्हता. त्यामुळे अशा राजकारणात पडून काही निष्पन्न होईल असे त्यांना वाटले नाही. शिवाय नवीन राजकारणाची सुरू होणारी परंपरा पुष्कळच धकाधकीची होऊ पाहत होती. गाडगीळ कितीही जनताभिमुख असले तरी त्यांच्या स्वभावधर्माला, अंतःकरणप्रवृत्तींना व शारीरिक प्रकृतीला हे राजकारण मानवणे कठीण होते. म्हणून त्यांनी

त्याच्याकडे पाठ फिरवली.

गांधीयुगातील नवीन राजकारणाप्रमाणेच त्यांना महाराष्ट्रातील त्या वेळच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीचा विचार करावा लागला, कारण आपले जीवन व चरित्र महाराष्ट्रातच घडवावयाचे असा त्यांचा निश्चय झालेला होता. टिळकांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रात ब्राह्मणेतरांची चळवळ जोरात होती. ब्राह्मणेतरांच्या चळवळीतील पुढाऱ्यांची टिळक व त्यांचे अनुयायी यांच्यासंबंधीची वृत्ती व मते, त्यांच्याकडून टिळकांना त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या दिवसांत मिळालेली वागणूक वगैरे गोष्टींचा विचार करता या बाबतीत टिळकांचे साफ चुकले असे गाडगीळांचे मत झाले होते. टिळकांना या संबंधातील प्रश्नांचे संपूर्ण आकलन झाले असते तर वेदोक्तासंबंधी त्यांनी जो पवित्रा घेतला तो घेतला नसता. तरुण शाहूमहाराजांना हाताशी धरून सत्यशोधक चळवळीतील बहुजन समाजाचा प्रचंड ओघ त्यांना राष्ट्रीय चळवळीत सोडता आला असता. परंतु टिळकांना ब्राह्मणेतर चळवळीची अंतःप्रवृत्ती व तिचे पुढे होणारे परिणाम लक्षात आले नाहीत. त्यांच्या राजकीय जीवनातील ही फार मोठी चूक म्हणावी लागेल. ही चूक ते न करते तर त्यांच्या राजकीय कर्तृत्वास गालबोट सुद्धा लागले नसते. परंतु कोणतीही चूक माणसाच्या हातून होऊ नये असे अपेक्षिणे म्हणजे तो मनुष्य स्थलकालातीत व संपूर्ण असावा असे अपेक्षिण्यासारखे आहे. टिळक या पदवीस पोचू शकले नाहीत असे गाडगीळांना स्पष्टपणे वाटत असे.

टिळकांची चूक पुढील पिढीने सुधारली पाहिजे. ब्राह्मणांनी आपण होऊन काळाची पावले ओळखली पाहिजेत व संयमाने वागून ब्राह्मणेतरांच्या मनातला किंतू दूर केला पाहिजे असे त्यांचे (गाडगीळांचे) मत झाले. टिळकांच्या मृत्यूनंतरचा काळ सत्तासंक्रमणाचा आहे. क्रमाक्रमाने बहुजनसमाजाच्या हातीच सत्ता जाणार. या सत्तास्पर्धेत ब्राह्मणांनी आपण होऊन बाहेर राहिले पाहिजे, असे त्यांना वाटे.

हिंदू समाजातील परंपरागत स्थान ब्राह्मणांनी मागच्या १–२ शतकांत सोडले. बौद्धिक आणि वैचारिक पुढारीपणावर संतुष्ट न रहाता आर्थिक

व राजकीय पुढारीपणही आत्मसात केले. त्या वेळच्या परिस्थितीच्या आवाहनास प्रत्याघात म्हणूनही हे झाले असेल. परंतु आता येणाऱ्या काळात लोकशाहीची कदर हिंदू समाजाला व ब्राह्मणांना बाळगावी लागेल. राजकीय पुढारीपण ब्राह्मणांच्या हाती राहणे अशक्यच आहे. परंतु नवीन परिस्थितीत समतेचे तत्त्व महत्त्वाचे आहे व ब्राह्मणांनी त्याचा आपणहून अंगीकार केला पाहिजे. आपण आहोत त्यापेक्षा श्रीमंत होण्याचा त्यांनी बुद्ध्या प्रयत्न करू नये. आपली आर्थिक सुस्थिती इतरांच्या डोळ्यांवर येणार नाही अशा संयमाने वागावे. असे वागले तरच ब्राह्मणांना निदान त्यांचे वैचारिक पुढारीपण तरी टिकवता येईल आणि पुढच्या प्रगतीच्या दृष्टीने ते तसे टिकवणे आवश्यक आहे. कोणत्याही समाजात अध्ययन व अध्यापन यांनाच वाहिलेला व संशोधन करून ज्ञानाची जोपासना करणारा एखादा वर्ग असणे समाजस्वास्थ्याच्या व प्रगतीच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असते. ब्राह्मणांची परंपरागत सामाजिक भूमिका याच्याशी मिळती आहे आणि तीच त्यांनी विचारपूर्वक अंगीकारली पाहिजे. पूर्वीच्या काळी ( १७ व्या शतकापर्यंत ) ब्राह्मणवर्ग सामाजिक दृष्ट्या श्रेष्ठ मानला गेला तरी आर्थिक दृष्ट्या दरिद्रीच होता. किंबहुना त्याच्या आर्थिक व राजकीय निरपेक्षतेमुळे राजसत्तेस त्याचा सल्ला घ्यावासा वाटे व तो वेळोवेळी घेतलाही जाई. ही निरपेक्षता ब्राह्मणांनी नवीन युगात अंगिकारली पाहिजे, असा गाडगीळांचा निष्कर्ष होता.

ब्राह्मणेतर पुढारी फारसे शिक्षित नाहीत, त्यांचा दृष्टिकोन कोता आहे, फारसा दूरवरचा विचार करावयास ते समर्थ नाहीत, वगैरे गोष्टी उघड दिसत होत्या. परंतु म्हणून विचारवंतांनी त्यांना झिडकारून न टाकता त्यांना शक्य तेवढी मदत केली पाहिजे. कोणत्याही मानाची वा अधिकाराची अपेक्षा न धरता या पुढाऱ्यांच्या मागे उभे राहिले पाहिजे व त्यांच्या तत्कालीन दोषांचा देशाच्या दूरगामी प्रगतीवर वाईट परिणाम होणार नाही याची दक्षता बाळगली पाहिजे. परंतु पुढाऱ्यांच्यामागे राहून सल्लागाराच्या भूमिकेवरून धोरणाची सूत्रे हलवावयाची अगर तसा प्रयत्न करावयाचा म्हणजे ब्राह्मणेतर पुढारी म्हणत त्याप्रमाणे छत्रपतींना

नामधारी करून पेशवाई करावयाची असा गैरसमज अगदी साहजिकपणे होण्याचा संभव होता. वर वर्णन केलेली गाडगीळांची विचारश्रेणी त्यांनी गांधीवधानंतर लिहिलेल्या मराठीतील लेखात विस्तृतपणे मांडलेली आहे.[1] त्यात ब्राह्मणांनी कसे वागावे यासंबंधी लिहिताना 'पेशवाई करू नये' असेच लिहिले आहे. तेव्हा त्यांच्या सूत्राचा तसा अर्थ त्यांना अभिप्रेत नव्हता हे उघड दिसते. परंतु ब्राह्मणांनी ब्राह्मणेतर पुढाऱ्यांना सल्ला दिला पाहिजे असे म्हणण्यात इतर जातीत सल्ला-मसलत देण्यासारखे लोक नाहीत व पुढेही होणार नाहीत असे ध्वनित होते आणि गाडगीळांच्या लेखांवर आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना प्रा. खाड्ये[2] यांनी यावरच नेमके बोट ठेवले. प्रा. खाड्ये हे गाडगीळांच्या विशेष परिचयाचे, एकाच वेळी केंब्रिजमध्ये अध्ययन केलेले, गाडगीळांबद्दल विशेष आदर व प्रेम बाळगणारे. त्यांच्याकडून मुद्दाम गैरसमज होण्यासारखे लिहिले जाण्याची शक्यता नव्हती. स्वतः गाडगीळांनाही याचे आश्चर्य वाटले. पण नंतर त्यांनी कबूल केले की "ब्राह्मणेतरांच्या भावना व त्यांच्या मनातील शल्ये ब्राह्मणांनी कितीही प्रयत्न केला तरी त्यांना संपूर्णपणे समजणे शक्य होत नाही हाच यावरून मी बोध घेतो. 'जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे' हेच खरे."

वर वर्णन केलेल्या परिस्थितीत राजकारणात न उतरता शिक्षणक्षेत्रास सर्वस्वी वाहून घ्यावे व नवीन संशोधनाच्या परंपरा मायदेशात रुजवाव्या असे त्यांनी आपल्या मनाशी ठरविले. एक प्रकारे अध्ययन, अध्यापन व संशोधन यास वाहून घ्यावयाची ब्राह्मणांची परंपराच त्यांनी अनुसरण्याचे ठरविले. १९२३ साली मायदेशात परत येताना सरकारी नोकरी करावयाची नाही, अध्ययन व अध्यापन यात सर्व लक्ष घालावयाचे, संशोधन, त्याची साधने व संस्था यांची जोपासना करावयाची, त्याच्या अनुषंगाने जी इतर सामाजिक कामे करता येतील ती निरपेक्षपणे

---

१. ध. रा. गाडगीळ, "ब्राह्मण जातीतील व्यक्तींचे पुढील धोरण," सह्याद्रि, मार्च १९४८

२. कृ. म. खाड्ये, "जातीयवादाची मीमांसा," सह्याद्रि, मे १९४८.

करावयाची. आहे हे पितृधन पुरे आहे. त्यात भर घालण्यासाठी पैसा मिळवायचा नाही. आपला योगक्षेम नीट चालवण्यासाठी जरूर तेवढेच द्रव्य मिळवावयाचे असे त्यांनी आपल्या मनाशी पक्के ठरविले होते.

तथापि पढिक पांडित्य हे त्यांचे ध्येय नव्हते. पंडिताच्या तज्ज्ञ भूमिकेवरून देशाचे आर्थिक व सामाजिक धोरण ठरविण्यात आपणास अप्रत्यक्ष-रीतीने भाग घेता येईल म्हणून पांडित्याकडे एक साधन म्हणून ते पहात होते. पढिक पांडित्य जीवितकर्तव्य म्हणून अंगिकारणे आणि देशाच्या कारभाराचे धोरण ठरविण्याची आकांक्षा बाळगणे या काहीशा परस्परविरोधी वृत्ती खऱ्या. पण त्या त्यांनी जन्मभर आपल्या उराशी बाळगल्या. आपण राजकीय सत्तेचा व नेतृत्वाचा लोभ न धरता बहुजन पुढाऱ्यांच्या मागे उभे राहून, त्यांना सल्ला देऊन देशाच्या धोरणाची जडण-घडण करावयाची हे गाडगीळांनी विचारपूर्वक ठरविलेल्या भूमिकेत अनुस्यूतच होते. त्याला अनुसरून कोणत्याही राजकीय पक्षाचे सभासदत्व न स्वीकारता फक्त तज्ज्ञ सल्लागाराची भूमिका घेऊन कोणाही राजकीय अगर सामाजिक कार्यकर्त्याला व पुढाऱ्याला विनामूल्य, निरपेक्ष आणि निःपक्षपाती सल्ला द्यावयाचा असे धोरण गाडगीळांनी विचारपूर्वक आखले. विचारपूर्वक काढलेल्या निष्कर्षाप्रमाणे त्यांनी स्वतःचे वर्तन ठेवले. आपल्या गर्भश्रीमंतीचा डौल त्यांनी कधी दाखवला नाही. आपला पोशाख नेहमी हिंदी पद्धतीचा ठेवला. प्रथम मायदेशी परत आल्यावर सरकारी नोकरी एक वर्ष केली, परंतु ती सोडून सुरतेस महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाचा स्वीकार केला. १९३० मध्ये तेही सोडून त्याहून कमी पगारावर गोखले संस्थेचे चालकत्व स्वीकारले व ते वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंत चालविले.

अध्ययन–अध्यापन–संशोधनास वाहून घ्यावयाचे असे ठरल्यावर अशा व्यक्तीने कसे वागावे, कोणती पथ्ये पाळावी यासंबंधीच्या गाडगीळांच्या कल्पना सुस्पष्ट होत्या. १९४१ साली त्यांनी मला जेव्हा गोखले संस्थेत काम करण्यास बोलावले त्या वेळी यासंबंधी विस्तृत चर्चा मी त्यांच्याशी केली होती. त्या वेळी त्यांनी जी मते मला सांगितली,

विवेचन केले, निकष सांगितले ते मला सर्वस्वी मान्य झाले व आजही आहेत. अध्ययन–अध्यापन–संशोधन करताना त्या व्यक्तीने इतर भानगडीत पडू नये. संशोधन प्रत्यक्षात उपयोगी पडेल असे असावे. सल्ला विचारला तर तो संशोधकाने जरूर द्यावा परंतु तो प्रत्यक्षात आणण्याची कामगिरी आपली आहे असे त्याने समजू नये. 'अर्थशास्त्रज्ञाची जागा युद्धाच्या आघाडीवर नसते. आघाडीच्या मागे ज्ञानाचा शस्त्रसंभार व चिकित्सेची पाणीदार तरवार तयार करणे हेच त्याचे कर्तव्य होय' हे प्रा. पिगू यांनी उद्घोषिलेले तत्त्व गाडगीळांना मान्य होते. तथापि हिंदुस्थानातील परिस्थितीत यात थोडा फरक करणे आवश्यक आहे असे त्यांना वाटले. हिंदुस्थानातील एकंदर पुढारीपणाच्या क्षेत्रातील व्यक्तींची संख्या मर्यादित असल्यामुळे तेथील शिक्षक-संशोधकावर थोडी जास्त जबाबदारी पडते. त्यांनी फक्त आपल्या अभ्यासाच्या क्षेत्रासच सर्वस्वी बांधून न घेता शैक्षणिक व आनुषंगिक सामाजिक अगर सांस्कृतिक क्षेत्रातही काही काम करणे आवश्यक आहे. परंतु त्यांनी राजकारणात भाग घेऊ नये. शिक्षकांच्या व तज्ज्ञांच्या भूमिकेशी ते सुसंगत नाही. धोरण ठरविण्यासाठी सरकारला सल्ला देणे हे त्यांचे कर्तव्यच आहे. परंतु त्याच्या पलीकडे जाऊन मी सुचवतो ते धोरण सरकारने मान्य करावे किंवा स्वीकारावे यासाठी खटपट करणे व ते धोरण प्रत्यक्षात आणण्यासाठी क्रियावानाची भूमिका स्वीकारणे हे यात बसत नाही, अशी गाडगीळांची यासंबंधीची विचारसरणी होती. जे जे शिक्षक याप्रमाणे वागले नाहीत अगर वागत नव्हते त्यांच्यावर या काळात गाडगीळ फार तीव्र टीका करत असत. "त्यांनी शिक्षणाचे कामही नीट केले नाही आणि राजकारणात त्यांचा विजय कधीच झाला नाही" असे त्यांच्याबद्दल ते म्हणत असत.

पुणे विद्यापीठाच्या सुरुवातीच्या काळातील यासंबंधीची एक आठवण सांगण्यासारखी आहे. या विद्यापीठाचे ध्येयवाक्य 'यः क्रियावान् स पण्डितः' हे आहे. हे वाक्य श्री. पु. मं. लाड यांनी पहिले उपकुलगुरू श्री. जयकर यांना सुचविले. गाडगीळ त्या वेळी विद्यापीठात कर्तुमकर्तुम्

अशा अधिकाराच्या कक्षेत वावरत होते. त्यांचा या ध्येयवाक्यास फार मोठा विरोध होता. विद्यापीठाबाबत व तेथील कार्याबाबत त्यांच्या ज्या कल्पना होत्या त्यांना सर्वस्वी विरोधी हे ध्येयवाक्य आहे असे त्यांनी पुष्कळांना बोलून दाखविले. " हे ध्येयवाक्य विद्यापीठाने स्वीकारावयाचे म्हणजे विद्यापीठ विद्यापीठ म्हणून बंद करण्यासारखेच आहे. विद्यापीठ हे पंडितांचे असते. पंडितांच्या निर्मितीसाठी असते. क्रियावान् मंडळी बहुधा अपंडित असतात. क्रियावान् निर्माण करणे हे विद्यापीठाचे कार्य कधीही असू शकणार नाही. जे पंडित क्रियावान झाले त्यांचे काय झाले याची पुण्यात पुष्कळ उदाहरणे आहेत." त्यांनी या ध्येयवाक्याच्या स्वीकृतीस विरोध केला परंतु त्याबद्दल पुढे फारसा आग्रह धरला नाही असे दिसते. कारण काही दिवसांनी ते ध्येयवाक्य विद्यापीठाने स्वीकृत केले. शिक्षक–तज्ज्ञ–संशोधक यांच्या कार्याबद्दल गाडगीळांच्या कल्पना काय होत्या हे समजावयाच्या दृष्टीने ही आठवण महत्त्वाची आहे.

शिक्षक–तज्ज्ञ–संशोधक ही भूमिका घ्यावयाची असे ठरल्यावर गाडगीळांनी वर वर्णन केलेली सर्व पथ्ये अगदी काटेकोर रीतीने पाळली. विलायतेहून परत आल्यापासून १९४० साली म्हैसूर येथे भारतीय आर्थिक परिषदेचे अध्यक्षस्थान भूषवीपर्यंत या बाबतीत ते अगदी व्रतस्थाप्रमाणे वागले. यानंतरच्या काळात त्यांच्यामधील क्रियावान् अधिकाधिक बलशाली होऊ लागला. १९५० पासून पुढे त्याचा जोर अधिकच वाढला. परंतु यासंबंधी पुढे लिहावयाचे आहे. प्रस्तुतचा धागा पुढे न्यावयाचा तर गाडगीळांचे कार्यक्षेत्र व कार्यक्रम कसे विकसित होत गेले याचे वर्णन आता केले पाहिजे. एक प्रकारे त्यांच्या लौकिक चरित्राचा गोषवाराच सांगितला पाहिजे. त्या पार्श्वभूमीवर गाडगीळांच्या कार्याचे व आयुष्याचे मूल्यमापन करणे शक्य होईल.

## लौकिक आयुष्य

केंब्रिजहून १९२३ साली मायदेशी परत आल्यावर त्यांनी एक वर्ष-पर्यंत मुंबई सरकारच्या अर्थखात्यात नोकरी केली. त्यांचे केंब्रिज येथील

सहाध्यायी श्री. ज. वि. जोशी ( जे पुढे रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर झाले ) हे रजेवर दुसऱ्या कामावर पाठवले गेले. त्यांच्या अनुपस्थितीत त्यांच्या जागी काम करण्यास गाडगीळांनी संमती दिली व ती जागा स्वीकारली. त्या वेळी ते आपल्याला योग्य असे कार्यक्षेत्र शोधीत होते. लवकरच त्यांना सुरत येथील महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाची जागा उपलब्ध झाली. तेथील पगार त्यांना सरकारी नोकरीत मिळत होता त्याच्या निम्माही नव्हता! या वेळी मुंबई सरकारच्या अर्थखात्याचे चिटणीस विल्सन म्हणून होते. उपसचिव अर्देसर दलाल हे होते. सुरतेची जागा स्वीकारण्यासाठी गाडगीळांनी आपल्या सरकारी नोकरीचा राजीनामा दिला. तो या सचिव-द्वयांकडे आला. तेव्हा त्या दोघांनीही निरनिराळे महाबळेश्वर येथे त्यांना भेटीस बोलावले. गाडगीळ विल्सन यांना प्रथम भेटले. त्यांनी राजीनामा देण्याचे कारण विचारले. गाडगीळांनी सांगितले की, ' माझ्या देशाच्या सध्याच्या स्थितीत शिक्षण हे क्षेत्र पुढील विकासाच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचे आहे. आर्थिक नुकसान झाले तरी तरुण सुशिक्षित मंडळींनी या क्षेत्रात पडले पाहिजे असे माझे मत आहे. त्याप्रमाणे मी करीत आहे. ' विल्सन त्यावर एवढेच म्हणाले की, " तुझी भूमिका इतकी उदात्त आहे की तिच्या विरुद्ध मी तुला काहीच म्हणू शकत नाही. मी तुझे मन जाणू शकतो. तू हे सर्व विचार-पूर्वक करीत आहेस हे मला पटले. मी तुझ्या आड येणार नाही." याउलट गाडगीळांनी जेव्हा अर्देसर दलाल यांची गाठ घेतली त्या वेळी त्यांनी विल्सन यांच्याप्रमाणेच राजीनामा देण्याचे कारण विचारले. गाडगीळांनी विल्सन यांना जे सांगितले तेच दलालांनाही सांगितले. त्यावर दलालांनी अलीकडे तरुण माणसे कशी अविचारी झाली आहेत वगैरे भाषण केले व राजीनामा न देण्याचा उपदेश केला. गाडगीळांनी अर्थातच त्याला नकार दिला.

सरकारी नोकरी सोडून ते सुरतेस आले. अध्ययन व अध्यापन यात त्यांनी स्वतःला पूर्णपणे गुंतवून घेतले. शिक्षणक्षेत्रात निरनिराळ्या सुधारणा घडवून आणण्यासाठी व महाविद्यालय चालविण्याच्या जबाब-

दारीचा एक भाग म्हणून त्यांनी मुंबई विद्यापीठात प्रवेश केला व तेथे पुष्कळ कार्य केले. १९३० साली त्यांचे श्वशुर रा. रा. काळे यांनी गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्थेची स्थापना केली. तिचे संचालकत्व त्यांनी स्वीकारले. सुरतेहून पुण्यास येऊन ते स्थायिक झाले.

आता हाताशी स्वतंत्र संशोधन संस्था व पुण्यासारखे मध्यवर्ती कार्य-क्षेत्र त्यांना मिळाले. महाराष्ट्र साहित्य परिषद, भारत इतिहास संशोधक मंडळ, वगैरे संस्थांशी त्यांचा संबंध आला व त्यात त्यांनी पुष्कळ भाग घेतला. शिक्षणक्षेत्राशी संलग्न अशीच ही क्षेत्रे होती. या काळात त्यांनी Servant of India या पत्रात पुष्कळ वेळा आर्थिक प्रश्नांबद्दल लिखाण केले. काही नावाने केले काही तसेच केले. परंतु या पलीकडे त्यांनी राजकीय वगैरे क्षेत्रांत कोठेही पदन्यास केला नाही. सहकारी चळवळीत मात्र त्यांनी १९३७ पासून भाग घ्यावयास सुरुवात केली व पुण्याच्या जिल्हा सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत भाग घेतला. १९३७ साली पहिली काँग्रेस मंत्रिमंडळे प्रांतातून अधिकारावर आली. मुंबई सरकारने कापड गिरण्यांतील मजुरांच्या वेतनश्रेणींबद्दल चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीवर त्यांना आर्थिक तज्ज्ञ म्हणून नेमले. सरकारी धोरणासंबंधी सरकारी समितीमार्फत शिफारसी करण्याची संधी त्यांना प्रथमच मिळत होती. आपल्या आकांक्षा सफल होण्याच्या मार्गा-वरील हे पहिले पाऊल आहे असे त्यांना वाटले असल्यास नवल नाही. १९३० ते १९३७ च्या काळाबद्दल बोलताना ते पुष्कळ वेळा म्हणत की, " या काळात प्रसिद्धी व कीर्ती या सर्वांपासून पराङ्मुख होऊन मी जो अज्ञातवास पत्करला तो पत्करला नसता तर पुढची संधीही मला मिळाली नसती. या काळात संशोधन, लिखाण वगैरेशिवाय मी काहीही करू शकलो नाही. माझ्या लिखाणामुळे संशोधनात काय भर पडली असेल ती किंवा Servant of India पत्राचा दर्जा काय वाढला असेल तो. एवढेच माझे श्रेय होते. कार्य करण्याची संधी मला या अज्ञातवासा-नंतरच मिळाली. "

या समितीचा अहवाल फार चांगला म्हणून गाजला व त्याच्या

बहुतेक शिफारसी सरकारने स्वीकारल्या. परंतु लवकरच युद्ध सुरू झाले. ब्रिटिश राजवट पुन्हा पूर्वीप्रमाणे चालू झाली. युद्धकाळातील परिस्थिती जसजशी उग्र होऊ लागली तसतशी अधिक अधिक नियंत्रणे घालणे सरकारला जरूर पडू लागले. चलनवृद्धी निर्माण झाली. या अडचणीत सरकारला सल्ला देण्यास गाडगीळांच्यासारखा तज्ज्ञ हवाच होता. त्यांनाही सल्ला देण्याची हौस होती. हा संयोग उत्तम झाला. युद्धकाळात मुंबई प्रांतात गाडगीळांच्या सल्ल्याने पुष्कळ गोष्टी सरकारने केल्या. गाडगीळांनी आर्थिक धोरणाबद्दल पुस्तक लिहून चलनवृद्धीचे धोरण कसे अहितकारक आहे हे जरी सांगितले तरी प्राप्त परिस्थितीत होणारे हाल शक्य तेवढे कमी कसे करता येतील या भूमिकेवरून सरकारी नियंत्रणे कशी व कोणती असावी वगैरे गोष्टींसंबंधी त्यांनी सरकारी सल्लागाराचे काम केले. त्यामुळे युद्धकालात परकीय सरकारशी सहकार्य केल्याचा आरोप त्यांच्यावर कधी आला नाही. हे काम करण्यात त्यांची दुसरीही दृष्टी होती. आर्थिक नियंत्रणे म्हणजे नियोजनाचा गाभाच म्हणावयाचा. राजकीय स्वातंत्र्य आता फार लांब नव्हते. स्वातंत्र्यकाळात योजनाबद्ध विकास अंगीकारावा लागणार याबद्दल गाडगीळांची खात्री होती. या आगामी काळात आपला प्रभाव पाडावयाचा तर नियंत्रणासंबंधीची अनुभवाची जेवढी शिदोरी आपल्या पदरी पाडून घेता येईल तेवढी घ्यावी. मानवी व्यवहारांच्या नियंत्रणाची शक्यता, जरुरी व आवश्यकता ही त्यांच्या विचारसरणीच्या स्थायीभावाचा एक महत्त्वाचा भाग होता याचा उल्लेख पूर्वीच केला आहे. नियंत्रणासंबंधीच्या आपल्या कल्पना जास्त स्पष्ट कराव्या, अनुभवाच्या भट्टीत त्या नीट तावून सुलाखून तयार ठेवाव्या म्हणजे नियोजनाच्या काळात त्या फार उपयोगी पडतील असा त्यांचा कयास होता आणि तो बरोबर होता. या काळात त्यांनी यासंबंधीचा पुष्कळच अनुभव साठवला यात शंका नाही.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतरची ३–४ वर्षे त्यांचा अपेक्षाभंग करणारी ठरली. नवीन राज्यकर्ते नियंत्रणांच्या विरुद्ध होते. त्या वेळच्या राजकारणात नियंत्रणांना फारसा पाठिंबा नव्हता हे लक्षात घेऊनसुद्धा

पुढाऱ्यांना नियंत्रणाची जरुरी व उपयुक्तता कळली पाहिजे व त्यांनी आपल्या अनुयायांना त्याप्रमाणे मार्गदर्शन केले पाहिजे अशी गाडगीळांची अपेक्षा होती. ती साफ चुकीची ठरली. त्यांना वाटत होते तितके पुढारी शहाणे नव्हते. कदाचित त्यांच्यासंबंधीचा गाडगीळांचा होराच चुकीचा होता ! या काळात ते सरकारचे अत्यंत कडवे टीकाकार बनले होते. विशेषतः नियंत्रणाबाबतची सरकारची धरसोड त्यांना अक्षम्य वाटत होती. सरकारचे एक अत्यंत निःस्पृह टीकाकार असा त्यांचा या वेळी लौकिक पसरला होता. सरकारातही त्यांची मते मान्य नसली तरी त्यांच्या निःस्पृहतेबद्दल व विद्वत्तेबद्दल नितान्त आदर होता. याच वेळी त्यांना राष्ट्रीय उत्पन्नाची मोजणी करण्यासंबंधीच्या समितीवर नेमण्यात आले. रिझर्व्ह बँकेच्या मध्यवर्ती संचालक मंडळावर त्यांची याच सुमारास नेमणूक झाली. युनोने अविकसित देशांत आर्थिक प्रगती कशी साधता येईल याचा विचार करण्यास नेमलेल्या समितीवर त्यांना याच वेळी नेमण्यात आले. त्यांचा लौकिक देशात व देशाबाहेरही वाढत होता. त्यांचे सरकारातील वजनही वाढत होते. १९४८–४९ साली सर्वस्वी त्यांच्या प्रयत्नाने महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना सुरू झाला. तेथूनच महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांचे युग चालू झाले. त्याचे जनकत्व सर्वस्वी गाडगीळांच्याकडे जाते.

मध्यवर्ती सरकारने १९५० साली योजना समिती नेमली व पहिल्या पंचवार्षिक योजनेसंबंधीच्या हालचाली सुरू झाल्या. त्यात गाडगीळांची सल्लागाराची भूमिका महत्त्वाची होती. तथापि या योजनेच्या जडण-घडणीत त्यांचा हात फारसा नव्हता. याच सुमारास त्यांनी रिझर्व्ह बँकेमार्फत ग्रामीण कर्जाची पहाणी आयोजित केली. १९५३–५४ ही वर्षे धामधुमीची गेली दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची चर्चा चालू झाली. त्यासाठी अर्थशास्त्रज्ञांचे सल्लागार मंडळ नेमण्यात आले. त्याचे उपाध्यक्ष म्हणून गाडगीळांची नेमणूक झाली. सर्व सल्लागार मंडळाच्या बैठका वारंवार भरवता येणार नाहीत यासाठी तिच्या सभासदांपैकी ६ सभासदांची एक उपसमिती सरकारला वारंवार सल्ला देण्यासाठी नेमण्यात आली. या

उपसमितीचा अध्यक्ष म्हणून गाडगीळांची नेमणूक करण्यात आली. आपणासच या उपसमितीचा अध्यक्ष नेमण्याचा त्यांनी आग्रह धरला होता असे त्यांनीच मला सांगितले. "या वेळी मी आयुष्यात केले नाही ते दिल्लीस केले. मला या उपसमितीचा अध्यक्ष नेमलेत तरच मी या उपसमितीचे सभासदत्व स्वीकारीन असे सांगितले" असे त्यांनी मजजवळ उद्गार काढले. ही घटना येथे नोंदण्याचे कारण पुढील चर्चेत स्पष्ट होईल. याच वेळी त्यांची नेमणूक ग्रामीण—नागर हस्तव्यवसाय, उद्योगधंदे यासंबंधी काय करता येईल याचा विचार करण्यास नेमलेल्या समितीवर झाली. खुद्द नेहरूंनी त्यांना आपल्या भेटीस बोलावून या समितीवर काम करण्याची विनंती केली. इतर गोष्टींतही त्यांचा सल्ला आपल्याला बहुमूल्य वाटतो असे सुचविले व असा सल्ला वारंवार देण्याबद्दल त्यांना विनंती केली. गाडगीळांच्या अगदी मनासारखी ही गोष्ट झाली. आपली धोरण ठरविण्याची मुख्य आकांक्षा आता साध्य होणार असे त्यांना निश्चितपणे वाटले. त्या वेळच्या दिल्लीच्या सफरीहून ते जेव्हा पुण्यास परत आले त्या वेळी ते अत्यंत समाधानाच्या मनोवृत्तीत होते. त्यांना इतके समाधानी व आनंदी त्यापूर्वी अगर त्यानंतर मी केव्हाही पाहिले नाही. आगामी कृतकृत्यतेचा भाव त्यांच्या मनात उचंबळून आला होता. "अर्थशास्त्रज्ञांना आतापर्यंत कधीही नव्हती एवढी धोरण ठरविण्याची संधी आता आली आहे. ही संधी साधली तर पाहिजेच, परंतु भविष्यकाळाकडे नजर देऊन ही अनुकूलता कशी टिकेल याकडे लक्ष दिले पाहिजे. आताची संधी आम्ही सर्व प्रकारे उपयोगात आणूच, परंतु तुम्ही तरुण लोकांनी आता अधिक मेहनत केली पाहिजे व भविष्यकाळी आमची जागा घेतली पाहिजे. तरच आम्ही आतापर्यंत केलेल्या श्रमांचे सार्थक होईल व आमचे कार्य सफल झाले असे होईल" असे त्यांनी मला अत्यंत कळकळीने सांगितले. या कामासंबंधात तुम्हाला गोखले संस्थेची धुरा वाटते त्यापेक्षा फार अगोदर घ्यावी लागेल असेही त्याचवेळी सुचविले.

त्यांची ही प्रसन्न मनःस्थिती कायम राहावी व वाढत जावी अशाच

गोष्टी या वेळी घडत गेल्या. ग्रामीण कर्जासंबंधीचा अहवाल होऊन त्याच्या शिफारसी सरकारने सर्वस्वी स्वीकारल्या. गाडगीळांचा हा फार मोठा विजय होता. दुसऱ्या योजनेच्या जडण-घडणीत गाडगीळांनी फार प्रामुख्याने भाग घेतला, इतका की, दुसरी पंचवार्षिक योजना म्हणजे आपली योजना असे ते मानीत. याचा अर्थ त्यातील सर्व कल्पना त्यांच्या होत्या असा नाही. त्यांच्याशिवाय इतरांनीही त्याला पुष्कळ हातभार लावला होता. परंतु या योजनेच्या घडवणुकीत गाडगीळांना प्रथमपासून विचारलेले असल्यामुळे व त्यांनीही त्यात मन घालून पुष्कळ काम केल्यामुळे त्या योजनेबाबत त्यांना फार ममत्व निर्माण झाले होते. ती योजना त्यांचा मानबिंदू झाली होती. याच वेळी एक-दोन प्रसंगी नेहरूंनी राष्ट्रीय विकास मंडळाच्या सभांना गाडगीळांना आमंत्रण देऊन बोलावले व त्याप्रमाणे ते हजरही राहिले. गाडगीळांच्या अगदी मनात होते त्याप्रमाणे हे सर्व घडत होते. धोरण ठरविणाऱ्या सर्वांत वरिष्ठ व्यक्ती व मंडळे यांच्या निकट ते जात होते. त्यांचा सल्ला मागण्यात येत होता. तो प्रत्येक वेळी मानला जात होताच असे नाही. परंतु त्याबाबत गाडगीळ उतावीळ नव्हते. या सर्व अनुकूलतेच्या भरतीची परिणती आपल्याला योजना समितीचे उपाध्यक्षपद देण्यात होईल अशी गाडगीळांची अपेक्षा होती. तसे झाले म्हणजे तज्ज्ञाच्या भूमिकेवरून देशाचे धोरण पुष्कळ प्रकारे व निश्चितपणे ठरविण्याची संधी आपल्याला मिळेल व आपल्या इतकी वर्षे जोपासलेल्या आकांक्षा पूर्ण होतील असे त्यांना वाटत होते.

दुर्दैवाने त्यांची ही अपेक्षा या वेळी सफल झाली नाही. (पुढे जेव्हा झाली त्या वेळी योजना समिती गलितनखदंत झाली होती.) राष्ट्रीय विकास मंडळाच्या बैठकींना यानंतर नेहरूंनी गाडगीळांना बोलावले नाही. योजना समितीचे सभासदत्व या वेळी व पुढेही दोन-तीन वेळा त्यांना देऊ करण्यात आले होते. परंतु त्यांना उपाध्यक्षपदच हवे होते. नुसत्या सभासदत्वावर ते संतुष्ट नव्हते. १९६० पर्यंत गाडगीळ अनुकूलतेच्या भरतीत तरंगत होते. त्यानंतर रंग पालटू लागला व ओहोटी सुरू झाली.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या घडणावळीत गाडगीळांचा भाग पूर्वीच्या मानाने कमी होता. त्यांना त्या योजनेबद्दल फारसे ममत्व वाटत नसे. १९६२ साली रिझर्व्ह बँकेच्या मध्यवर्ती संचालक मंडळाच्या सभासदत्वाची त्यांची मुदत संपली व त्यांची पुनर्नेमणूक करण्यात आली नाही. गाडगीळांना ही गोष्ट फार लागली. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांच्या संघाचे ते १९५६ ते १९५९ पर्यंत अध्यक्ष होते. त्या जागेवरही त्यांची पुन्हा निवड झाली नाही. या सुमारास चिनी व पाकिस्तानी युद्धे झाली. गाडगीळ सल्लागार म्हणून मागे पडू लागले. गोखले संस्थेतून निवृत्त होण्याची त्यांची तारीख जवळ येऊ लागली. १९६६ मध्ये ते निवृत्त झाले व पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू म्हणून त्यांची निवड झाली. तेथून १९६७ साली ते नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष म्हणून दिल्लीस गेले. १९७१ मार्च मध्ये त्यांना त्या जागेचा राजीनामा द्यावा लागला आणि पुण्यास परत येत असतानाच गाडीत त्यांचा अंत झाला.

या त्यांच्या लौकिक चरित्राचा विचार केला तर त्यात काही काल-खंड पाडता येतात. १९२३ ते १९४०–४१ पर्यंतचा काल पढिक पांडित्याचा म्हणून प्रामुख्याने मानता येईल. १९४१ ते १९५० हा काल संक्रमणाचा आहे. या काळात त्यांचे पांडित्यावरील लक्ष कमी होऊन त्यांच्यामधील क्रियावान जास्त जास्त बलवान होऊ लागला. त्यांची पांडित्याबद्दल आस्था संपली अगर अभ्यास सुटला असा याचा अर्थ नाही. परंतु त्याकडे त्यांचे लक्ष पूर्वीपेक्षा हळूहळू कमी होऊ लागले व त्यांचे इतर क्रियावान उद्योग वाढू लागले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांना प्रत्यक्ष क्रिया करण्याची संधी आताच आहे असे वाटून ते त्या बाजूस उत्साहाने व हिरीरीने वळले. १९५० नंतर पांडित्याचा भाग निश्चितपणे मागे पडला. त्यांचा पेशा शेवटपर्यंत संशोधक-तज्ज्ञाचाच राहिला, परंतु तो लौकिक अर्थाने. त्यांना कृतीचा ध्यास लागला होता व तीच क्रियावानाची प्रवृत्ती त्यांच्यात अधिकाधिक फोफावत गेली. एक प्रकारे ते त्यांच्या मनोधारणेप्रमाणेच वागत होते व आपद्धर्म म्हणून

स्वीकारलेल्या पंडिताच्या भूमिकेचा त्याग करण्याची संधी स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर साधीत होते. परंतु दोन तपे बाळगलेली व वाढवलेली पंडिताची भूमिका सोडणे इतके सोपे नव्हते. परंतु त्याबद्दल पुढे लिहावयाचे आहे. तत्पूर्वी इतर बऱ्याच गोष्टींबद्दल लिहिले पाहिजे.

## शिक्षक गाडगीळ

गाडगीळांच्या लौकिक चारित्र्याच्या या पार्श्वभूमीवर त्यांच्या आयुष्याचे व कामगिरीचे मूल्यमापन आता करता येईल. त्यांच्या शिक्षकाच्या भूमिकेपासूनच यास सुरुवात करणे योग्य. गाडगीळ स्वतःला शिक्षक म्हणवून घेत आणि हाच आपला मुख्य पेशा आहे असे मानीत. आपण शिक्षक आहोत याचा त्यांना अभिमान होता. गाडगीळांच्या शिक्षक या भूमिकेची चौरस समीक्षा करावयाची तर खालील प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत. ते विद्यापीठातील विद्यार्थ्यांना यशस्वी रीतीने शिकविणारे शिक्षक होते का ? संशोधनात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात व नवे संशोधक निर्माण करण्यात ते वाकबगार होते का ? स्वतःच्या संशोधनात त्यांनी सर्व शास्त्रीय आदर्श पाळून आदर्श संशोधनाची परंपरा निर्माण केली का ? त्यांनी चालविलेल्या व वाढवलेल्या संशोधनसंस्थेत संशोधनाची अखंड परंपरा व तीही उच्च प्रकारची राहील अशी व्यवस्था केली का ? शिक्षक हा विद्यापीठाचा एक घटक म्हणून त्यांनी विद्यापीठात काम करताना विशेष कामगिरी केली का ? एकंदर शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे कार्य कोणत्या प्रकारचे होते ?

उत्तम शिकवणारे शिक्षक असा विद्यार्थ्यांच्यामध्ये गाडगीळांचा कधीच लौकिक नव्हता. त्यांची व्याख्याने मुद्देसूद, घोटीव व विषयाचे त्यांचे स्वतःचे सखोल ज्ञान दर्शविणारी होत. परंतु विद्यार्थ्यांना समजेल अशी किंवा त्यांची समजूत पटली आहे की नाही हे पाहून त्याप्रमाणे शिकविण्याची त्यांची पद्धत नव्हती. ते बहुधा १ तास अस्खलित व पूर्ण एकाग्रतेने व्याख्यान देत. विद्यार्थ्यांकडे त्यांचे फारसे लक्ष नसे. ते फळ्याचा वापर मुळीच करीत नसत. विद्यार्थी त्यांची विद्वत्ता पाहून व

ऐकून थक्क होत; परंतु ' त्यांचे काही कळत नाही ' असे नंतर प्रांजळपणे कबूल करीत. पदव्युत्तर परीक्षेसाठीच बहुधा गाडगीळ व्याख्याने देत. पुणे विद्यापीठाच्या स्थापनेनंतर पहिली दोन वर्षे त्यांनी पदवीपूर्व वर्गांना प्राथमिक अर्थशास्त्रावर व्याख्याने दिली. परंतु ती अयशस्वी झाली या-बद्दल त्यांचे स्वतःचेसुद्धा दुमत नव्हते. त्या भानगडीत ते त्यानंतर पुन्हा पडले नाहीत. त्यांचे स्वतःचे ज्ञान सखोल होते परंतु त्या ज्ञानाची वर्गातील व्याख्यानांच्या द्वारा करावयाची संक्रांती त्यांना तितकीशी जमत नसे.

ज्या काही थोड्या विद्यार्थ्यांना गाडगीळांच्या पातळीपर्यंत पोचून त्यांच्या ज्ञानाचा फायदा त्यांच्या व्याख्यानातून घेता येण्याची शक्यता होती त्यांचा अभिप्रायही त्यांच्या शिकवण्याबद्दल फारसा अनुकूल नसे. याचे कारण गाडगीळ जे शिकवीत ते परीक्षेच्या दृष्टीने फारसे उपयोगी पडणारे नसे हे नसे. ते परीक्षेच्या दृष्टीने शिकवीत नाहीत हे सर्वांना मान्य होते व त्याबद्दल तक्रारही नव्हती. परंतु त्यांच्या शिक्षणातून आर्थिक सिद्धान्तांबद्दल नीट व संपूर्ण अद्ययावत् ज्ञान मिळावे अशी हुषार विद्यार्थ्यांची अपेक्षा असे. परंतु तीही फलद्रूप होत नसे. कारण गाडगीळ विषय बहुधा ऐतिहासिक पद्धतीने शिकवीत व आधुनिक सिद्धान्ताविषयी थोडेच विवेचन करीत. शिवाय ते विवेचन त्या सिद्धान्तातील तार्किक व इतर दोष यावर भर देणारे असे. या सर्व सिद्धान्तनात काही अर्थ नाही असा सर्वसामान्य अर्थ त्यातून निघे. त्यामुळे यात नाही तर कशात अर्थ आहे हे तरी त्यांनी सांगावे असे विद्यार्थ्यांना वाटे. तसे काही अस्तित्वात नसल्यामुळे त्यांचे विवेचन अकरणात्मक होई. त्यातून विद्यार्थ्यांना सिद्धान्तनाच्या अधिक अभ्यासाची स्फूर्ती मिळण्याऐवजी अनुत्साह निर्माण होई. आधुनिक आर्थिक सिद्धान्तन हे अर्थहीन आहे असे जरी क्षणभर मान्य केले तरी त्या सिद्धान्तनाची एक पद्धती आहे. अर्थशास्त्रात काही अल्पस्वल्प पराक्रम करू इच्छिणाराला ही शास्त्रीय पद्धत अवगत असणे फार आवश्यक असते. गाडगीळ ही पद्धती विशद न करता फक्त तिच्या आधारावर अर्थसिद्धान्तांवर टीका करीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात अर्थसिद्धान्तनाबद्दल एक प्रकारचे वैफल्य निर्माण होई. अर्थशास्त्रीय

गणिताचा गाडगीळांनी कधीही पुरस्कार केला नाही अगर ते कधीही शिकवले नाही. गेल्या ३, ४ दशकांत अर्थशास्त्रात गणिताचा प्रादुर्भाव व उपयोग इतका विस्तारला आहे की, आधुनिक आर्थिक चर्चा वाचताना गणित न येणाऱ्याला फारच मोठा लंगडेपणा जाणवतो. अर्थशास्त्राच्या शिक्षणात गणित घालण्याचा व त्यामुळे आपले विद्यार्थी मागे पडणार नाहीत अशी व्यवस्था करण्याचा गाडगीळांनी जराही प्रयत्न केला नाही. या सर्व कारणांमुळे हुषार विद्यार्थी गाडगीळांच्या विद्वत्तेबद्दल पूर्ण आदर बाळगूनही त्यांच्या वर्गातल्या शिकवण्याबद्दल फारसे समाधानी नसत.

वर्गातील शिकवण्याची गोष्ट सोडली तर संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना गाडगीळ उत्कृष्ट शिक्षक वाटत. संशोधनातील पद्धती, त्यातील बारकावे, परिश्रमाचे महत्त्व, पूर्वग्रहदूषित दृष्टी कशी टाळावी, कोणतेही विधान कसे पारखून घ्यावे वगैरे गोष्टी शिकवण्यात गाडगीळ आदर्श शिक्षक होते. स्वतःच लिहिलेल्या मजकुराकडे दोषैक ( त्यांचा आवडता शब्द ) पद्धतीने आपणच कसे पाहण्यास शिकले पाहिजे हे ते स्वतःच्या लिखाणाचे उदाहरण देऊन विद्यार्थ्यांना दाखवीत. अशा प्रसंगी त्यांच्याशी चर्चा करणे हा एक मोठा बौद्धिक आनंद असे. परंतु या सर्व गोष्टी करावयास त्यांना त्यात पुष्कळ वेळ खर्च करावा लागत असे. १९४० पूर्वी— ज्या वेळी मी त्यांच्या हाताखाली संशोधन करीत होतो—त्यांना पुष्कळ वेळ असे व संशोधनाच्या विद्यार्थ्यांबरोबर ते विस्तृत चर्चा करीत, त्यांच्या लिखाणाचे तर्जुमे तपशीलवार वाचीत व योग्य त्या सूचना करीत. परंतु त्यांचे इतर उद्योग जसे वाढत गेले तसा त्यांना या कामासाठी देता येत असलेला वेळ कमी होऊ लागला. त्या प्रमाणात संशोधक विद्यार्थ्यांना त्यांचा मिळणारा फायदा कमी होऊ लागला. १९५० नंतर तर त्यांचे या विद्यार्थ्यांकडे दुर्लक्षच होऊ लागले. एक कर्तव्य म्हणून थोडक्या वेळात ते कसे करता येईल याकडे त्यांचा कल होऊ लागला. यांत्रिक पद्धतीने ते कर्तव्य पार पाडण्याचा त्यांनी उपक्रम केला व तो शेवटपर्यंत चालू राहिला.

गोखले संशोधन संस्था स्थापन करून, तिची काळजीपूर्वक वाढ

करून गाडगीळांनी तिला सध्याचे भव्य स्वरूप प्राप्त करून दिले. आपले तन-मन-धन त्यांनी या संस्थेला नावारूपाला आणण्यात वेचले. विगमनात्मक आर्थिक मीमांसेचा उपक्रम तिच्यामार्फत करून ती देशात सुप्रतिष्ठित केली. ग्रामीण, नागरक्षेत्रात नवनवीन संशोधनांचा उपन्यास करून कित्येक क्षेत्रांत संस्थेमार्फत इतरांना मानदंडासमान होतील अशी त्याची फलिते प्रसिद्धिली. नवीन संशोधक निर्माण केले. संशोधनाचे एक आंतरराष्ट्रीय कीर्तीचे केंद्र उभारले. हे करण्यात त्यांची स्वतःचीच कामगिरी मुख्य म्हटली पाहिजे. याचे श्रेय त्यांचे एकट्याचे आहे याबद्दल दुमत होणार नाही. या त्यांच्या उज्ज्वल कामगिरीस इतरत्र तोड सापडणे फार कठीण आहे.

शिक्षक म्हणून शैक्षणिक क्षेत्रातही त्यांनी पुष्कळच कामगिरी केली. मुंबई विद्यापीठात त्यांनी बऱ्याच सुधारणा घडवून आणल्या. डेक्कन कॉलेजच्या पुर्नरचनेची सर्व योजना त्यांचीच होती. पुणे विद्यापीठाची स्थापना व त्याची घटना याचे मोठे श्रेय त्यांनाच दिले पाहिजे. परंतु या विद्यापीठातील त्यांची कामगिरी फारशी नाव घेण्यासारखी झाली नाही. पहिली काही वर्षे गाडगीळांनी या विद्यापीठाचा सर्व कारभार पडद्याआडून व प्रत्यक्षपणेही चालविला. पुण्यातील विद्यालयांच्या केंद्रीकरणाचा वाद ते जिद्दीने खेळले. शैक्षणिक वातावरणात या वादाने फार कडवटपणा निर्माण झाला होता. गाडगीळांचा या वादात प्रथम विजय झाला परंतु तो मिळवण्यासाठी त्यांनी ज्या व्यक्तींशी संगनमत केले त्यांच्याबद्दल पुण्यातील शिक्षणक्षेत्रातील व्यक्तींमध्ये फारसा आदर नव्हता. त्यांच्या चारित्र्याबद्दल व पूर्वाश्रमातील त्यांच्या मुंबई विद्यापीठातील कारवायांबद्दल कोणालाच आदर नव्हता. खुद्द गाडगीळांनाही ! परंतु त्यांच्याशी त्यांनी या वेळेपुरती हातमिळवणी केली. संगतीसंगदोषेण गाडगीळांच्यावर त्यामुळे फार टीका झाली व ती सर्वस्वी चुकीची होती असे म्हणता येणार नाही. केंद्रीकरणातील वादातला त्यांचा विजयही तात्पुरता ठरला. त्यांच्या विरुद्ध बाजूच्या लोकांनी आपली जूट करून गाडगीळांना नामोहरम केले. गाडगीळांनी आपल्या जागेचा राजीनामा दिला व

विद्यापीठाच्या कारभारातून संपूर्णपणे अंग काढून घेतले. पुढे त्यांना विद्यापीठाचे उपकुलगुरू म्हणून निवडण्यात आले. परंतु त्यांच्या १॥–१॥। वर्षांच्या कारकीर्दीत त्यांनी कोणतीच विशेष कामगिरी केल्याचे दिसत नाही. त्यांनी तटस्थ वृत्तीने आपले कर्तव्य पार पाडले. त्यात फारसा उत्साह कोठे दिसला नाही.

त्यांचे स्वतःचे संशोधन उत्तम प्रकारचे असे हे जाहीरच आहे. त्यांनी आपली मते निर्भयपणे व निर्भीडपणे जन्मभर मांडली. 'सामाजिक शास्त्रांच्या विद्यार्थ्याने लोकप्रियतेबद्दल उदासीन असले पाहिजे' हे मार्शल यांचे विधान गाडगीळांना संपूर्णपणे मान्य होते. कोणत्याही प्रश्नाचा सर्व बाजूंनी निःपक्षपातीपणाने व शास्त्रीय दृष्टीने अभ्यास करावा, त्यासंबंधी आपली मते बनवावी व योग्य तो सल्ला द्यावा. तो सल्ला लोकांना पसंत पडो अगर न पडो त्याच्याशी आपल्याला कर्तव्य नाही असेच संशोधक–पंडिताने मानले पाहिजे, असे गाडगीळ मानीत. त्यांचे स्वतःचे वर्तन या निकषावर घासून पाहिले तर संपूर्णपणे कसोटीस उतरेल. त्यांनी आपली मते लोकांना आवडतील किंवा नाही याची कधीही पर्वा केली नाही. त्यांनी पाकिस्तानच्या निर्मितीबाबत निर्भीडपणे पुरस्कारार्थी लिहिले. ते लिखाण महाराष्ट्रात व इतर ठिकाणीही फारसे प्रिय झाले नाही. गांधीवधानंतर त्यांनी ब्राह्मणांनी काय करावे यासंबंधी लिहिलेले लेख ब्राह्मणवर्गास फार नापसंत होते. किंबहुना गाडगीळांनी बहुजन समाजाला खूष करण्यासाठी म्हणूनच ब्राह्मणांबद्दल असे लिहिले असे प्रच्छन्न आरोपही त्यांच्यावर करण्यास ब्राह्मणवर्गातील काही मंडळींनी मागे पाहिले नाही. तथापि गाडगीळांनी व्यक्त केलेली मते गांधीवधामुळे बनलेली नसून त्यापूर्वी कित्येक वर्षे त्यांच्या बोलण्यात येत असत हे पुष्कळांना माहीत होते. तेव्हा ती तत्कालीन व संधिसाधू होती हा आरोप लटका होता. ती ब्राह्मणवर्गाला अप्रिय होती एवढेच! आपल्या बुद्धीशी प्रतारणा न करता अप्रिय परंतु पथ्यकर असे लिखाण प्रसिद्ध करून गाडगीळांनी आपले निर्भीड मतप्रतिपादनाचे व्रत जन्मभर चालविले.

## व्यक्तिरेखा व स्वभाव

गाडगीळांची व्यक्तिरेखा आणि स्वभाव यासंबंधी आता लिहिले पाहिजे. गाडगीळांची बुद्धी असामान्य दर्जाची होती याबद्दल बहुधा दुमत होणार नाही. माझे दुसरे गुरू, सायमन कुझनेटस्, हे १९५० साली प्रथम हिंदुस्थानात आले. राष्ट्रीय उत्पन्नाची मोजणी करण्यासाठी जी समिती नेमली होती तिला तज्ज्ञ सल्ला देण्यासाठी जे आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ बोलावले होते त्यात कुझनेट्स होते. गाडगीळ या समितीचे सभासद होते याचा उल्लेख वर आलाच आहे. या निमित्ताने कुझनेट्स व गाडगीळ यांचा परिचय झाला व त्यांची मैत्री शेवटपर्यंत टिकली. कुझनेट्स यांच्या हाताखाली काम करण्यास मी १९५१ साली अमेरिकेस गेलो. त्या वेळी कुझनेट्स मला म्हणाले "तू गाडगीळांच्या हाताखाली काम केले आहेस हे तुझे फार मोठे सुदैव आहे. मी हिंदुस्थानच्या माझ्या भेटीत तिथल्या बहुतेक अर्थशास्त्रज्ञांना भेटलो. पण गाडगीळांच्या दर्जाचा बुद्धिमान माणूस मला भेटला नाही. फक्त त्यांच्याशी चर्चा करतानाच मला माझे शब्द व माझी विधाने जपून व तोलून करावी लागत. इतर कोणाशीही बोलताना अगर चर्चा करताना मला तसे करण्याची गरज वाटली नाही."

आपली बुद्धी असामान्य आहे याची गाडगीळांना पूर्ण जाणीव होती. यासंबंधी एक लहानशी आठवण सांगण्यासारखी आहे. बीव्हर्ले निकोल्स याने हिंदुस्थानासंबंधी लिहिलेल्या पुस्तकाबद्दल[1] १९४५ साली एकदा चहा घेताना मी म्हटले की 'त्याने डॉ. आंबेडकरांच्याबद्दल फार गौरवपूर्ण लिहिले आहे. हिंदुस्थानातील अत्यंत बुद्धिमान अशा सहा व्यक्तींत आंबेडकरांचा समावेश होतो असे त्याचे म्हणणे आहे.' त्यावर गाडगीळ ताबडतोब म्हणाले "डॉ. आंबेडकरांच्या बुद्धीबद्दल प्रश्नच नाही. हिंदुस्थानातील ज्या थोड्या व्यक्तींबरोबर मी समान बौद्धिक पातळीवर

1. Beverley Nichols, *Verdict on India*, Jonathen Cape, London, 1944.

चर्चा करू शकतो त्यात डॉ. आंबेडकर हे सर्वप्रथम आहेत." यातला भावार्थ उघड आहे.

गाडगीळांचे मन एका करारी व कर्तव्यकठोर बुद्धिवंताचे होते. त्यात भावनेला व भावनांना फार थोडा वाव होता. गरिबी, दारिद्र्य, विषमता वगैरे गोष्टी समाजास घातक आहेत. त्या उपलब्ध ज्ञानाच्या जोरावर हद्दपार करता येतील. या दृष्टीने, त्या ज्या आहेत त्या बुद्धीचा वापर न केल्यामुळे आहेत. राज्यकर्ते, अग्रणी लोक जर बुद्धीची कास धरतील, आपला मूर्खपणा सोडतील तर हे सर्व नाहीसे करिता येईल. सत्ताधीश मंडळी तसे करीत नाहीत, करू देत नाहीत याचा त्यांना संताप होता. पण तो संताप बौद्धिक होता. गरिबांची अतीव्र करुणा, अनुकंपा यातून तो निर्माण झालेला नव्हता. या प्रश्नाची निकड त्यांच्या बुद्धीला जाणवत होती. भावनावेगामुळे ते त्याच्याकडे आकर्षित झालेले नव्हते.

लोकशाहीवरही त्यांची आंधळी श्रद्धा नव्हती. जनतेचा आवाज उठवणे वगैरे गोष्टींबद्दलही त्यांना फारसे ममत्व नव्हते. समाजाला योग्य नेतृत्वाची गरज कोणत्याही काळी आणि कोणत्याही परिस्थितीत असते. योग्य नेतृत्वाच्या अभावी समाजाची अधोगती होते. योग्य नेतृत्वास समाजनियमनासाठी काही तंत्रे वापरावी लागतात. अशा उपलब्ध तंत्रांपैकी लोकशाही हे एक तंत्र आहे. त्याचे फायदे तोट्यापेक्षा जास्त आहेत म्हणून ते वापरावयाचे. लोकशाही तंत्राचा वापर नेतृत्वाने करावयाचा आहे. नुसते जनतेने निवडलेले प्रतिनिधी जनतेचा आवाज उठवून सर्व गोष्टी सुरळितपणे पार पाडतील अशी लोकशाहीबद्दलची भावनात्मक अंधश्रद्धा त्यांची नव्हती. नेतृत्वाने आपल्या नियंत्रणाने लोकशाही व्यवस्था नीट चालवावी लागते. ती आपोआप चालत नाही व फायद्याची तर होत नाहीच. ही त्यांची मते ते जाहीर रीतीने मांडीत नसत याची कारणे उघड आहेत. परंतु प्रत्यक्षात जेव्हा त्यांना स्वतःला लोकशाही संस्थांतून काम करण्याचा प्रसंग येई तेव्हा त्यातून त्यांची ही भूमिका स्पष्ट दिसे. पुणे विद्यापीठाचा कारभार पहिली काही वर्षे त्यांनी अगदी एकतंत्री केला. विद्यापीठाच्या निरनिराळ्या अंगोपांगांचे लोकशाही

स्वरूप जराही न बदलता नेतृत्वाच्या जोरावर ही लोकशाही कशी राबविता येते हे त्यांनी सोदाहरण दाखवून दिले. लोकशाही हे साधन आहे, साध्य नव्हे याबद्दल त्यांच्या मनात शंका नव्हती.

गाडगीळांच्या स्वभावात भावनांचा ओलावा फारसा नव्हता. याचा आविष्कार त्यांच्या निरनिराळ्या व्यक्तींशी असलेल्या संबंधात दिसे. त्यांचा मनुष्यसंग्रह वरवर पाहता फार मोठा होता. अनेक माणसांना त्यांनी हाताशी धरले, अनेकांना मदत केली, अनेक माणसे जोडली, वापरली, परंतु हे सर्व त्यांनी अत्यंत अलिप्त वृत्तीने केले. त्यांच्या अंतरंगात त्यापैकी एकाचा तरी प्रवेश झाला होता की नाही हे सांगणे कठीण आहे. ते अत्यंत आत्मकेंद्रित व स्वयंपूर्ण होते. त्यांना जिवाभावाचा एकही मित्र नसावा. त्यांनी त्यांच्या कुटुंबीयांशीच काय जिवाभावाच्या गोष्टी केल्या असल्या तर, परंतु दुसऱ्या कोणाशी केल्या असण्याचा संभव दिसत नाही. त्यांच्या ओळखी पुष्कळ होत्या. ते लोकांशी मोकळेपणाने गप्पा मारीत. आदरातिथ्यात ते केव्हाही कमी पडले नाहीत. तथापि हे सर्व कोरडे, जेवढ्यास तेवढे आहे असेच बहुतेकांना वाटे. बरीच वर्षे एखाद्या ठिकाणी एखाद्या व्यक्तीबरोबर गाडगीळ काम करीत व तो संबंध संपला की त्यांचे त्या व्यक्तीशी वर्तन केवळ औपचारिक तऱ्हेचे होई. सर्वसामान्य व्यक्ती दुसऱ्याच्या दीर्घकाळ सहवासात आल्यास औपचारिकाची मर्यादा ओलांडणारे काही तरी भावनात्मक (आपुलकीचे) बंध निर्माण झाले आहेत असे मानून वागतात. अशा व्यक्तींना गाडगीळांचे औपचारिक वर्तन चमत्कारिक वाटे. गाडगीळांनी आपल्याबद्दल पुष्कळांच्या मनात निष्ठा उत्पन्न केली, त्याचप्रमाणे स्नेहही केला. परंतु स्वतः मात्र त्याची भावनात्मक परतफेड त्यांनी सहसा केली नाही. कारण या सर्व साहचर्यात त्यांच्या बाजूने भावनेचा पदरच नसे. त्यामुळे गाडगीळ स्वतःच्या कामासाठी माणसे फक्त 'वापरतात' असा त्यांच्याबद्दल पुष्कळांचा ग्रह होई यात नवल नाही.

कै. द. गो. कर्वे यांचा व गाडगीळांचा सहवास सर्वांना माहितीचा आहे. १९६६ च्या फेब्रुवारी महिन्यात कर्वे व मी डेक्कन क्वीनमध्ये

भेटलो व मुंबई ते पुण्याचा प्रवास एकत्र केला. सबंध वाटभर गोखले अर्थशास्त्र संस्थेतील माझ्यासंबंधी घडलेल्या घडामोडींबद्दल बोलणे चालले होते. त्या वेळी ते मला म्हणाले, "गाडगीळांचे व माझे संबंध आज ३५ वर्षांचे आहेत. परंतु औपचारिकतेच्या थोडे पलीकडे ते नुकतेच गेले आहेत! त्यांचे स्वरूप वैयक्तिकपर्यंतही पोचलेले नाही. औपचारिकतेच्या थोडे पलीकडे ते गेले आहेत असे मी म्हणतो याचे कारण परवाचा एकच प्रसंग होय. त्यांच्या धाकट्या मुलाच्या लग्नाला मी हजर रहावे असा आग्रह त्यांनी मला केला."

कर्वे यांचे हे उद्गार महत्त्वाचे खरेच. परंतु त्यांचे रहस्य लक्षात यावयास मी स्वतः पाहिलेला एक प्रसंग सांगितला पाहिजे. गाडगीळांच्या एकुलत्या एक मुलीचे लग्न १९५५ साली दसऱ्याला झाले. मी व माझी पत्नी यांना त्या समारंभास हजर राहणे काही कारणामुळे अशक्य होते म्हणून लग्नाच्या आदल्या दिवशी सायंकाळी मी व शैला, गाडगीळ पति-पत्नी व सुलभा यांना भेटावयास गेलो. त्या वेळी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जोरात होती. गाडगीळ त्यात पूर्णपणे गुंतलेले होते. आम्ही दोघे त्यांच्या घरी गेलो त्या वेळी शंकरराव देव व वैकुंठभाई मेहता हे त्यांच्याकडे काही चर्चेसाठी आले होते. वैकुंठभाईंशी गाडगीळांचे स्नेहसंबंध कित्येक दशकांचे, त्यांच्या कार्याबद्दल त्यांना फार आदर, आपुलकी. एवढेच नव्हे तर दुसऱ्या दिवशीच्या नोंदणी विवाहात तेच मुख्य साक्षीदार म्हणून सही करावयास नियुक्त केलेले होते. गाडगीळांशी चर्चा संपल्यावर देव व मेहता बाहेर आले. त्यांच्याबरोबर गाडगीळही त्यांना पोचविण्यासाठी बाहेर आले. त्यांच्या घराच्या अंगणात लग्नाचा मांडव सजला होता. विजेची रोषणाई करण्याचे काम चालू होते. लग्नघराची गडबड सर्वत्र होती. अशा परिस्थितीत सर्वसामान्यपणे कोणताही मनुष्य आपल्याकडे आलेल्या परिचितांना 'उद्या लग्न आहे. रीतसर आमंत्रण पाठवलेच आहे. परंतु आता आलाच आहात तेव्हा पुन्हा उद्या लग्नाला जरूर यावयाचे असे आमंत्रण करतो.' असे म्हणता. परंतु गाडगीळांनी तसे काही केले नाही. देव व मेहता गाडीत बसून

निघून गेले. गाडगीळ आत आले व माझ्याशी बोलू लागले. वैकुंठभाईंच्या मनाला ही गोष्ट फार चमत्कारिक वाटली आणि त्यांनी पुण्यातील त्यांच्या एका मित्राजवळ "अहो, लग्नाचा मांडव वगैरे दारातच होता. मला आमंत्रण होते. परंतु गाडगीळ नुसते उद्या या असे सुद्धा म्हणाले नाहीत" असे उद्गार काढले. कर्वे यांच्या उद्गारातला गर्भित अर्थ मात्र या प्रसंगानुरोधाने नीट ध्यानात येतो आणि गाडगीळांच्या स्वभावातील भावनेचा अभावच याचा उलगडा करू शकतो.

या त्यांच्या काहीशा तुटक वागण्यामुळे ते कामापुरतेच चांगले वागतात असा गाडगीळांच्याबद्दल पुष्कळांचा गैरसमज होई. 'प्रयोजनं विना चाणक्यो स्वप्नेऽपि न चेष्टते' हे चाणक्याचे मुद्राराक्षसातील वाक्य त्यांचे योग्य वर्णन करते असाही आरोप त्यांच्यावर काही मंडळी करीत. त्यांचा स्वभाव न कळल्यामुळेच हा गैरसमज होई. त्यांच्यासंबंधी गैरसमज होण्याचे कारण त्यांच्या स्वभावाची आणखी एक बाजू होती. ती म्हणजे त्यांचा अतुलनीय आत्मविश्वास. स्वतःच्या बुद्धीबद्दल, कर्तृत्वाबद्दल त्यांना जबरदस्त आत्मविश्वास होता. परंतु असा आत्मविश्वास आणि अहंता यामधील फरक फार सूक्ष्म असतो. त्यांच्या आत्मविश्वासाचे प्रकट स्वरूप पुष्कळ वेळा दुसऱ्यांना अहंतेचा अवतार वाटे आणि त्याची झळ कित्येक लोकांना निरनिराळ्या प्रसंगी लागलेली होती. त्यामुळे काही लोक त्यांना बिचकून वागत तर जास्त कर्तृत्ववान मंडळी त्यांच्यासंबंधी कडवटपणा धरीत.

गाडगीळांचा हा स्वभाव बनण्याची दोन संभाव्य कारणे सांगता येतील. ती म्हणजे त्यांच्या संस्कारक्षम वयात त्यांनी गीतारहस्य आत्मसात केले हे एक आणि केंब्रिज येथील वास्तव्यात इंग्रज लोकांच्या वृत्तीचा त्यांच्या मनावर परिणाम झाला हे दुसरे. गीतारहस्याची शिकवण आत्मसात करावयाची म्हणजे प्रथम भावनावर विजय मिळवून वैयक्तिक अलिप्तता साध्य करावी लागते. त्याशिवाय फलाशारहित कर्मयोग आचरताच येत नाही. मग कर्तव्यासाठीच फक्त कर्तव्य करावयाचे हे वागणुकीचे सूत्र होऊ शकते. गाडगीळांनी प्रयत्नपूर्वक ही अलिप्तता

अंगी बाणवली होती असे मला वाटते. इंग्रज लोकांतील भावनोत्कटतेचा अभाव, स्वकेंद्रित वृत्ती, ही ऑक्सफर्ड-केंब्रिजसारख्या विश्वविद्यालयात विशेष प्रकर्षाने जाणवते व जोपासली जाते. त्याचाही गाडगीळांच्या स्वभावावर परिणाम झाला असला पाहिजे. त्यांनी फार मोठ्या प्रमाणावर आपल्या भावनांवर विजय मिळवला होता. त्यांनी जन्मभर कर्मयोग फार निष्ठेने आचरला याला त्यांचे चरित्रच साक्ष आहे. त्यांची ही अलिप्तता आणि फलाशारहित कर्मयोग एकाच बाबतीत थिटी ठरली. ती म्हणजे देशाचे आर्थिक व सामाजिक धोरण ठरविण्याची त्यांची दुर्दम्य आकांक्षा ! परंतु त्यासंबंधी पुढे लिहावयाचे आहे. येथे विस्तार करीत नाही.

अत्यंत तीव्र निष्ठा – मग ती देशसेवेबद्दल असो अगर इतर कोणत्याही गोष्टीबद्दल असो – बाळगणाऱ्या व आपले आयुष्य सर्वस्वी त्यासाठी वाहणाऱ्या व्यक्तींच्या वागणुकीत एक प्रकारची धुंदी असते आणि त्यामुळे पुष्कळ वेळा त्यांची वागणूक एकदेशीय व सामान्यांपेक्षा वेगळी वाटते. गाडगीळांच्या बाबतीतही हे खरे होते. काही तत्त्वे अगर गोष्टी यावर त्यांची अमाप निष्ठा ( येथे निष्ठाच शब्द बरोबर आहे ) होती.

## विचारसरणीचा पाया

गाडगीळांच्या विद्यार्थीदशेत जी विशिष्ट तत्त्वे त्यांच्या पुढील सर्व विचारसरणीस, लिखाणास, विचारास पायाभूत म्हणून गाडगीळांनी स्वीकारली ती म्हणजे – गीतारहस्यातील कर्मयोगाचे तत्त्वज्ञान, आर्थिक व सामाजिक समता, मानवी व्यवहारांच्या नियंत्रणाची शक्यता व आवश्यकता आणि समाजधुरीणांनी हे अंमलात आणण्याची शक्यता व आवश्यकता. ही तत्त्वे त्यांनी विचारपूर्वक आपल्या मनात व वैचारिक भूमीत रुजवली होती. त्यांच्यावर त्यांची निष्ठा होती आणि ती शाश्वत होती. ही तत्त्वे सातत्याने त्यांच्या सर्वच लिखाणात दिसतात. ती स्थलकालाबाधित आहेत असे त्यांच्या प्रकट मनाने कधीच कबूल केले नसते, परंतु ती तशी आहेत असे त्यांनी मानले हे खरे आहे. अशी

मनोभूमिका संशोधकाला चांगली नसते. कारण त्यामुळे त्याच्या मीमांसेत व लिखाणात एकदेशीपणा येण्याचा संभव असतो. गाडगीळांच्या लिखाणात तो थोडाफार प्रमाणात सर्वत्र आहे. त्यामुळे गाडगीळ हे 'तत्त्वग्रस्त' होते असे मला वाटते. तत्त्वग्रस्त या शब्दाने मला इंग्रजी-तील idiologue हा शब्द अभिप्रेत आहे. असा मनुष्य एक किंवा अधिक तत्त्वे उराशी बाळगतो. ती ज्या समाजात अंगभूत झाली आहेत अशा समाजाचे आदर्श चित्र त्याच्या मनःचक्षूसमोर असते. त्याला थोडा फार द्विव्यत्वाचा संपर्क असतो. हे चित्र अर्थातच काल्पनिक असते व अव्यवहारी बाजूकडे झुकणारे असते. मूळ तत्त्वे ही सुटी असतात. ती सिद्धान्तनाच्या विशाल कोंदणात गुंफलेली अगर सुसंगत नसतात. तत्त्वज्ञ आणि तत्त्वग्रस्त यांच्यात हाच फरक असतो. तत्त्वज्ञाच्या कल्पना व तत्त्वे सिद्धान्तनाच्या चौकटीत सुसंगत बसवलेली असतात. तत्त्वग्रस्ताची तत्त्वे सुटी असतात. गाडगीळ या अर्थाने तत्त्वग्रस्त होते.

गीतारहस्यावर पुष्कळ टीका झाल्या. त्यापैकी काही अगदी मूलग्राही होत्या. परंतु गाडगीळांना त्या सर्व पिष्टपेषणवत् वाटत. "टिळकांनी पौर्वात्य आणि पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचे सार गीतारहस्यात सांगितले आहे. त्यात काही शाब्दिक अर्थभेद करून त्यावर चर्वितचर्वण करण्यात काही अर्थ नाही" असे ते मला एकदा म्हणाल्याचे आठवते. त्यांच्यापुरते बोलावयाचे तर त्या विषयावर पुनर्विचार करण्यास ते तयार नव्हते. त्याचप्रमाणे समतेच्या तत्त्वावर त्यांची गाढ निष्ठा होती. त्यांना आर्थिक समताच मुख्यतः अभिप्रेत होती. ती साध्य झाल्यास इतर प्रकारची विषमताही नाहीशी होईल असे ते मानीत. अलीकडच्या संशोधनात व प्रत्यक्ष अनुभवातही आर्थिक समतेखेरीज सामाजिक प्रतिष्ठेची व राजकीय सत्तेची विषमता ह्याही तितक्याच महत्त्वाच्या आहेत असे मानण्यात येते. पूर्वी वाटत होते त्या मानाने त्या बऱ्याच अंशी परस्परावलंबी नाहीत असेही संशोधनात आढळून आले आहे. याही पुढे जाऊन काही समाजशास्त्रीय सिद्धान्तन विषमतेला काही सामाजिक उपयोगही आहेत असे सुचवीत आहे. समाजधारणेसाठी काही प्रमाणात आर्थिक, सामाजिक

व राजकीय विषमता आवश्यक दिसते असाही काही नवीन संशोधनाचा सूर आहे. यापैकी काहीही गाडगीळांना मान्य झाले नसते याबद्दल माझी खात्री आहे.

नियंत्रणाशिवाय व नियोजनाशिवाय काही गोष्टी खुल्या वातावरणात सुलभ व जास्त चांगल्या रीतीने होऊ शकतात ही शक्यतासुद्धा ते विचारात घ्यावयास तयार नसत असे मला पुष्कळ वेळा आढळून आले. नियंत्रणे लोकप्रिय नाहीत. ते लोकांच्या हिताचे नसेल. त्यांच्या अज्ञाना-मुळेही होत असेल. परंतु राजकीय पुढाऱ्यांना व कार्यकर्त्यांना कमीजास्त प्रमाणात लोकगंगेची पंडेगिरी करावीच लागते. त्यांना ह्या महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष करता येत नाही. म्हणून त्यांचा नियंत्रणांना विरोध दिसतो. ही साधी सरळ मीमांसा गाडगीळांना कधीही पटली नाही. तसा युक्तिवाद केला तर ते तो करणाराला सांगत, "नियंत्रणे योग्य आहेत हे नेतृत्वाने जाणले पाहिजे आणि ती त्यांनी जनतेमध्ये प्रिय केली पाहिजेत. नेतृत्वाची ही नैतिक जबाबदारी आहे." हे उत्तर विवादात योग्य पण अव्यवहारी आहे हे निराळे सांगावयास लागत नाही. त्यांचा नेतृत्वाच्या कर्तृत्वावरचा विश्वास अवास्तव होता. नेतृत्वाच्या मर्यादा त्यांनी ओळखल्या नाहीत. नेता हा जनतेला पुढचा मार्ग दाखवू शकतो, त्या मार्गाने नेऊ शकतो. पण हे मर्यादित प्रमाणात शक्य असते. प्रत्यक्ष व्यवहारात नेत्याला आपले नेतृत्व टिकवावयाचे असेल तर जनतेच्या (अनुयायांच्या) कलाने घ्यावे लागते. नेतृत्व पुढे नेते परंतु काही प्रमाणात ते जनतेला अनुसरतेही. नेहरू जरी घेतले तरी त्यांना जे बरोबर वाटले, पटले ते सर्वस्वी अंमलात आणण्यास तेही समर्थ ठरले नाहीत हे इतिहासच सांगतो. परंतु नेतृत्वाचे कर्तृत्व गाडगीळांनी नेहमीच अमर्यादित मानले असेच म्हटले पाहिजे.

नेतृत्वाने नियोजनासंबंधी काय केले पाहिजे याविषयीच्या त्यांच्या कल्पनांतही हे दिसून येते. आर्थिक विकासासंबंधी त्यांचे विचार साकल्याने घेतले तर त्यांचा सारांश असा दिसतो की, विकासप्रयत्न योजनाद्वारा मोठा होणे आवश्यक आहे. राष्ट्रीय उत्पन्नाचा $\frac{१}{४}$ ते $\frac{१}{३}$ भाग

गुंतवणुकीसाठी सतत वापरला पाहिजे. हे शक्य करण्यासाठी लोकांच्या उत्पन्नावर, खर्चावर व किंमतींवर कडक नियंत्रणे बसवली पाहिजेत. १५–२० वर्षे असे केल्यास बरे दिवस दिसतील. या काळातील पिढीने मोठा स्वार्थत्याग केला पाहिजे. फारशी फलाशा त्यांनी धरली नाही तरच हे शक्य होईल. नेतृत्वाने हे जनतेस पटवून दिले पाहिजे. आजच्या जगात कोणत्याही देशातील नेतृत्व या कसोटीस उतरेल असे वाटत नाही. असे असिधारा व्रत खुषीने जनतेने शांततेच्या काळात स्वीकारल्याचे उदाहरणही जगात सापडणे कठीण आहे.

काही उत्कृष्ट तत्त्वावर अमाप निष्ठा, त्यावर आधारलेल्या समाजाच्या काल्पनिक चित्रास असलेली साक्षात्काराची झालर, त्याच्या अनुषंगाने येणारा एकदेशीपणा व काही अंशाने अव्यवहारीपणा हे सर्व मला ‘ तत्त्वग्रस्त ’ या विशेषणाने अभिप्रेत आहे. याच अर्थाने हें विशेषण मी गाडगीळांना लावले आहे. पुष्कळ वेळा त्यांच्याविरुद्ध मत असणाऱ्या मंडळींशी बोलताना ‘ या मंडळींना मला ज्या गोष्टी स्पष्टपणे दिसतात त्या यांना कशा दिसत नाहीत ’ असा आश्चर्याचा ध्वनी गाडगीळांच्या बोलण्यात उमटे याचे कारण हेच होय. ‘ गाडगीळ आपणांशिवाय सर्वांना गाढव समजतात ’ असाही वाकडा अर्थ त्यातून काही वेळा काढण्यात येई. असा आभास झाला तरी तो मुळात निखालस खोटा असे.

देशसेवेला वाहिलेल्या त्यांच्या आयुष्यात गाडगीळांना कोणत्याही वैयक्तिक स्वार्थाचा विटाळ झालेला नव्हता. स्वतःला अधिकार मिळावा, आपल्याला पुढारीपण प्राप्त व्हावे. आपला आर्थिक फायदा व्हावा, मान मिळावा, लोकप्रियता मिळावी वगैरे नेहमीच्या स्वार्थसाधनातील हेतू गाडगीळांच्या वशीवर्गीही नव्हते. ‘ देशाचे हित कसे करावे हे मलाच कळते व माझे ऐकले तर ते होईल एरवी होणार नाही ’ असा अहंभाव त्यांच्यामागे जरूर होता. किंबहुना तो नसता तर त्यांनी त्यासाठी जिवाची एवढी आटापीट केलीच नसती. देशाचे बरे करण्याच्या प्रयत्नात प्रसिद्धी, कीर्ती, अधिकार, मान मिळाला तर आनुषंगिक म्हणून स्वीकारण्याची

त्यांची तयारी होती. परंतु मूळ प्रेरणा त्या गोष्टींमुळे नव्हती याबद्दल माझ्या मनात मुळीसुद्धा शंका नाही.

## मूळ भूमिकेतील परिवर्तन

१९४० मध्ये अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्षस्थान भूषवीपर्यंत व त्यानंतरही काही वर्षे गाडगीळांनी संशोधक–शिक्षक–तज्ज्ञ ही भूमिका अगदी काटेकोर रीतीने पाळली. मुळात क्रियावानाची ऊर्मी असलेल्या व प्रत्यक्ष घटना बदलण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या माणसास अशा रीतीने संयमाने वागणे किती अवघड होते याची कल्पनाच केलेली बरी. वर निर्देशिलेल्या काळापासून त्यांच्या वृत्तीत हळूहळू फरक पडू लागला. स्वातंत्र्य आता क्षितिजावर दिसू लागले होते. आतापर्यंत कधी मिळाली नाही अशी देशाच्या हिताच्या गोष्टी करण्याची ऐतिहासिक संधी लवकरच मिळणार असे वाटू लागले होते. अशा वेळी राष्ट्राचा पाया घालण्याच्या कामात भरघोस भाग घ्यावयाची त्यांच्या मनातील इच्छा हळूहळू प्रबळ झाली असली तर त्यात नवल कसले? ब्रिटिश राजवटीत फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक वा सामाजिक धोरणावर परिणाम करणे फारसे शक्य नव्हते. त्या वेळी पंडित–तज्ज्ञ–शिक्षक ही अलिप्ततेची भूमिका पाळणे फारसे अवघड नव्हते. परंतु राजकीय स्वातंत्र्य जवळ येऊ लागल्यावर या भूमिकेचे बंध त्यांना काचू लागले. ते हळूहळू सैल करून पुढे त्यांनी साफ तोडून टाकले. यातून पुष्कळ समस्या निर्माण झाल्या. या सर्वांची हकीगत आता लिहावयाची आहे.

त्यांच्या मूळ भूमिकेपासूनचा त्यांचा पहिला संचार अगदी थोडा होता. परंतु 'प्रसादचिन्हानि' या न्यायाने त्याचा उल्लेख केला पाहिजे. युद्धकाळात सरकारी धोरणावर परिणाम करण्याची संधी आहे असे दिसताच त्यांनी तिचा फायदा घेतला. अन्नधान्य नियंत्रणाची यंत्रणा मुंबईराज्यात उभारण्यात गाडगीळांनी फार मोठा वाटा उचलला ही गोष्ट जाहीर आहे. परंतु त्याची सुरुवात स्वतः गाडगीळांनी त्यासंबंधी एक टिपण मि. नाइट यांना अनाहूत रीतीने पाठवून केली होती. धान्य-

वसुलीची काही थातुर-मातुर पद्धती मुंबई सरकारने चालू केली होती. ती फारशी यशस्वी होत नव्हती. त्यामुळे लोकांनाही त्रास होत होता. हे लक्षात आल्यावर गाडगीळांनी गोखले संस्थेतील ग्रामीण भागात माहिती जमवणारे कामगार एक महिनाभर यासंबंधीची माहिती गोळा करण्यास निरनिराळ्या भागात पाठविले आणि त्यांनी गोळा केलेल्या माहितीच्या आधाराने व स्वतःच्या कल्पनांप्रमाणे ही योजना कोठे बरोबर नाही, कोठे व कशी सुधारता येईल यासंबंधी एक विस्तृत टिपण करून ते मि. नाइट यांच्याकडे पाठविले. सरकारशी त्या वेळी इतक्या विधायक रीतीने सहकार्य करणारी मंडळी इतकी थोडी होती की हा सहकार्याचा हात झिडकारणे सरकारला अशक्यच होते. त्यानंतर मि. नाइट यांनी गाडगीळांना बोलावून घेतले व त्यांचा सल्ला ते अधिकाधिक प्रमाणात घेऊ लागले. गाडगीळांचे स्नेही, श्री. गोरवाला, हे त्या वेळी मि. नाइट यांचे दुय्यम होते. "गाडगीळ सरकारी नोकरी स्वीकारणार नाहीत पण सल्लागार म्हणून त्यांचा आपल्याला जास्तीत जास्त फायदा घेता येईल' असा सल्ला त्यांनी मि. नाइट यांना दिला. यामुळेच गाडगीळ सरकारचे प्रमुख सल्लागार झाले. परंतु ही गोष्ट गाडगीळांनी प्रथम पाऊल उचलल्यामुळे झाली होती हे मला प्रत्यक्षात माहीत आहे.

ही गोष्ट पुढच्या घटनांच्या दृष्टीने फार सूचक आहे असे मी म्हणतो याचे कारण ही गाडगीळांच्या मनात पुढे निर्माण झालेल्या तात्त्विक द्वंद्वाची सुरुवात होती. शिक्षक–संशोधक–तज्ज्ञ या भूमिकेसंबंधी गाडगीळांच्या कल्पना काय होत्या हे पूर्वी सांगितले आहे. त्या भूमिकेप्रमाणे विचारल्यावर अभ्यासपूर्वक व निःपक्षपातीपणे सल्ला द्यावयाचा किंवा आपल्या अभ्यासाची फलिते प्रसिद्ध करून त्यातून जाहीरपणे अनाहूत असला तरी सल्ला द्यावयाचा. परंतु सल्ला विचारलाच नाही किंवा दिलेला अगर प्रसिद्धिलेला सल्ला सत्ताधाऱ्यांनी मानलाच नाही तर शिक्षक–संशोधकाने काय करावयाचे ? मूळ भूमिकेशी सुसंगत अशी वृत्ती म्हणजे काहीही करावयाचे नाही. कारण आपला सल्ला घ्यावा अगर

दिलेला मानावा यासाठी स्वत: सल्लागाराने अगर त्याच्यासाठी त्याच्या मित्रांनी काही करणे म्हणजे सल्ला घेणाऱ्या व्यक्ती अगर संस्था यांच्यावर या ना त्या मार्गाने दडपण आणण्याचा उद्योग करणे. तसा उद्योग स्वत: करणे अगर दुसऱ्याकडून प्रयोजित करणे हे मूळ भूमिकेशी (किंवा ती भूमिका टिकवण्याशीही) सुसंगत नाही हे स्पष्ट आहे. तेव्हा शिक्षक–संशोधक–तज्ज्ञाने आपला सल्ला मागितला नाही अगर दिलेला सल्ला मानला नाही तर त्याबद्दल विषाद बाळगता कामा नये हाच खरा कर्मयोग होय. स्वत: गाडगीळही तसेच मानीत असत. "पूर्वीच्या काळी क्षत्रियांनी ब्राह्मणांचा सल्ला मागितला तेव्हाच ब्राह्मणांनी दिला. इतर वेळी ते आपल्या अध्ययन–अध्यापनात गुंग असत. त्यांचा सल्ला मानला जात असे याचे कारण हेच आहे" असे ते पुष्कळ वेळा म्हणत असत.

आपला सल्ला विचारला जात नाही अगर दिलेला मानला जात नाही ही परिस्थिती १९४६ नंतर व जास्त प्रकर्षाने स्वातंत्र्यकाळात त्यांना अधिकाधिक दु:सह होऊ लागली. मूळ भूमिकेपासून होणारा त्यांचा संचार वाढत गेला. १९४७ मध्ये त्यांची Commodities Prices Board वर नेमणूक झाली होती. त्या यंत्रणेमार्फत दिलेला सल्ला हिंदुस्थान सरकारने मानला नाही. त्याच्या निषेधार्थ गाडगीळांनी त्या जागेचा राजीनामा दिला. त्यामुळे बरीच खळबळ माजेल व सरकारवर इष्ट परिणाम होईल असे त्यांना वाटले होते. परंतु तसे काही झाले नाही. त्यामुळे आपला सल्ला मानला जावा यासाठी अधिक प्रत्यक्ष स्वरूपाची खटपट करणे आवश्यक आहे असे त्यांना वाटू लागले. त्यांचा हा हेतू संपूर्णपणे साध्य होण्यास त्यांनी पूर्वीची आपली भूमिका सोडून सरळ सरळ राजकारणात पडावयास हवे होते. परंतु त्यांना ते करणे शक्य नव्हते. एक तर राजकारणात पडावयास आता उशीर झाला होता. शिवाय नवीन राजकारणात पुढे यावयास लागणारे गुण (दुर्गुण!) गाडगीळांच्या जवळ नव्हते. त्यातच त्यांची दोन तपे जोपासलेली तज्ज्ञ-संशोधक–शिक्षकाची भूमिका त्यांच्या व इतर लोकांच्या अंगवळणी

पडली होती. त्यातून त्यांची एक सामाजिक प्रतिमा निर्माण झाली होती. ती अनेक दृष्टीने स्पृहणीय होती. त्याचे फायदे उघड होते. आणि गाडगीळांच्या मनाचा एक कप्पा संशोधनात रमणारा होता. त्यामुळे त्यांना ही भूमिका सोडावयाची नव्हती. भूमिका तर सोडावयाची नाही, परंतु मनातील प्रत्यक्ष धोरणावर अगर कारभारावर परिणाम करण्याची प्रबळ इच्छा तर दाबता येत नाही अशा मानसिक द्वंद्वातून गाडगीळांचे प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. या द्वंद्वातूनच त्यांच्या पुष्कळशा असुसंगत वर्तनाचा कार्यकारणभाव ठरविता येतो.

१९५० पासून पुढच्या काळात आपला सल्ला घेतला जावा व तो मानला जावा यासाठी गाडगीळ अधिकाधिक प्रयत्न करू लागले व त्यांची निःपक्षपाती तज्ज्ञ–सल्लागार–संशोधकाची भूमिका सुटू लागली. या काळातील त्यांच्या हालचालींचे वर्णन आम्ही गंमतीने ' गाडगीळांची दिल्लीवरील स्वारी ' असे करीत असू. या वाढत्या प्रवृत्तीचे परिणाम त्यांच्या निरनिराळ्या कार्यक्षेत्रांवर व वागणुकीवर कसे कसे होत गेले हे पाहणे मनोरंजक आहे.

आपल्या तज्ज्ञाच्या भूमिकेवरून पुढाऱ्यांना सल्ला देऊन त्यांच्यामार्फत धोरणावर परिणाम करावयाचा असे गाडगीळांनी सुरुवातीसच ठरविले होते याचा उल्लेख पूर्वी केला आहे. १९४१–४२ पर्यंत हे व्रत त्यांनी अगदी काटेकोर रीतीने पाळले. त्यांच्या मनातील वर उल्लेखिलेले स्थित्यंतर व्हावयास लागल्यापासून या धोरणातही बदल होऊ लागला व त्यातले धोकेही उघड होऊ लागले. जे पुढारी सल्ला मागतील त्यांना निरपेक्ष सल्ला द्यावयाचा ही पूर्वीची भूमिका हळूहळू बदलून पुढाऱ्यांशी संबंध वाढवून त्यांच्या मार्फत आपल्या कल्पना सरकारी धोरणात प्रतिबिंबित होण्याची खटपट करणे असे त्याचे स्वरूप होऊ लागले. अशा प्रकारे पुढाऱ्यांमार्फत आपल्या कल्पना व्यवहारात आणावयाच्या तर ते पुढारी तुम्हांला मानणारे पाहिजेत. ते नुसते राजकीय क्षेत्रात महत्त्वाचे असून उपयोगी नाही तर तुमचा सल्ला आपले राजकीय वजन पणास लावून अंमलात आणतील असे पाहिजेत. त्याचप्रमाणे राजकीय

पुढारीपणाच्या चक्रनेमिक्रम गतीत जे भविष्यकाळी मोठे मोठे होत जातील अशांची अचूक निवडही यासाठी करता आली पाहिजे. या सर्व गोष्टींवर या धोरणाचे यश अवलंबून होते आणि ते सर्वस्वी गाडगीळांच्या हाती नव्हते हेही उघड आहे. त्यामुळे या मार्गाने ते मर्यादित यशच मिळवू शकले. याची कारणे दोन : एक तर त्यांची पुढाऱ्यांची निवड पुष्कळ वेळा वर उल्लेखिलेल्या निकषाप्रमाणे बरोबर ठरली नाही. दुसरे म्हणजे जो पुढारी राजकीय क्षेत्रात पुढे जाणारा व यशस्वी होणारा असतो त्याचे स्वतःचे व्यक्तिमत्त्वही प्रभावी असते. तो फार मोठ्या प्रमाणावर परप्रकाशी असण्याची शक्यता कमी असते. अशा पुढाऱ्याला दिलेला सल्ला तो मानीलच असे नाही. काही प्रसंगी मुळीच मानणारही नाही अगर सल्ला विचारणारही नाही. गाडगीळांना या परिस्थितीची जितकी जाणीव असावयास पाहिजे होती तेवढी नव्हती असे म्हणणे भाग आहे. तत्त्वग्रस्त व्यक्तीमध्ये जो थोडा अव्यवहारीपणा असतो त्याचीच ही एक बाजू असावी ! आपण कोणास सल्ला दिला अगर कोणी आपला मागितला तर तो त्याने सर्वस्वी स्वीकारला पाहिजे अशी गाडगीळांची अपेक्षा असे. पुढे पुढे तर ही अपेक्षा न राहता मागणी म्हणूनच ते करू लागले. " मी देईन तो सल्ला संपूर्णपणे मान्य करून अंमलात आणण्याची खात्री दिलीत तरच मी सल्ला देईन " असे म्हणू लागले व पुष्कळ क्षेत्रात तसे वागूही लागले. जो पुढारी हे मान्य करणार नाही त्याच्याबद्दल त्यांचे मन प्रथम कलुषित होई व काही काळाने त्यात कडवटपणा येई.

कोणताही स्वत्व असणारा व प्रगतीच्या मार्गावर असणारा पुढारी कोणत्याही सल्लागाराला कोरा पट्टा ( हुंडी ) देईल ही गोष्ट अशक्यप्रायच समजली पाहिजे. अशी अट मान्य करणारे पुढारी पुष्कळ होते परंतु ते महत्त्वाचे नव्हते व महत्त्वाला चढण्यासारखेही नव्हते. हे गाडगीळांच्या लक्षात आले नाही असे नाही परंतु त्यांनी आपले धोरण बदलले नाही. गाडगीळांचा जबरदस्त आत्मविश्वास पुष्कळ वेळा अहंतेच्या सीमेवर येई याचा उल्लेख आधी केला आहे. त्यामुळे कर्तृत्ववान पुढारी

गाडगीळांना सर्व मान देत परंतु त्यांच्यापासून दोन पावले दूर राहण्याची खटपट करीत. दुय्यम पुढाऱ्यांना तसे वाटत नसे. ते गाडगीळांशी जास्त लगट करीत. यातला दैवदुर्विपाक असा की गाडगीळांनी दिलेला सल्ला अंमलात आणण्याची कुवत व शक्ती असलेले पुढारी त्यांच्याकडे वारंवार सल्ला मागत नसत अगर मागितला तरी तो संपूर्णपणे स्वीकारीत नसत. आणि ज्यांना तशी कुवत व ताकद नव्हती ते पुढारी त्यांचा सल्ला वारंवार मागत.

याचा साहजिक परिणाम म्हणून आपल्या अपेक्षेप्रमाणे वागणाऱ्या परंतु राजकीय व इतर दृष्टींनी कमकुवत असलेल्या पुढाऱ्यास किंवा पुढाऱ्यांना हाताशी धरून आपल्या अपेक्षेप्रमाणे न वागणाऱ्या परंतु राजकीय क्षेत्रात बलशाली असणाऱ्या पुढाऱ्यास शह देण्याचा मोह होणे. गाडगीळांना तसा मोह पुष्कळ वेळा झाला व काही वेळा ते त्याला बळीही पडले. अशा एका प्रसंगानंतर यांतला धोका महाराष्ट्रातील एका मातबर पुढाऱ्याने गाडगीळांना निरोप पाठवून कळवला होता हे मला माहीत आहे. या पुढाऱ्याशी जरी त्यांचे संबंध स्नेहाचे होते तरी गाडगीळांना त्याच्याबद्दल आत्मीयता वाटत नसे. 'हा माणूस आपले चालवील, माझे ऐकणार नाही' अशी त्याच्याबद्दल गाडगीळांना खात्री होती व म्हणूनच त्यांना तो विशेष पसंत नव्हता. त्याच्याच पक्षातील एका विशेषशी योग्यता नसलेल्या पुढाऱ्याने या मातबर पुढाऱ्यास शह देण्याचा प्रयत्न केला. या त्याच्या प्रयत्नात गाडगीळांनी बरेच मोठे सहकार्य दिले होते. परंतु हा डाव अयशस्वी ठरला. तथापि या घडामोडीतील गाडगीळांचा भाग त्या मातबर पुढाऱ्याच्या लक्षात आला होता.

हा पुढारी व गाडगीळ यांच्याशी निकट संबंध असणाऱ्या एका गृहस्थाने या सुमारास त्या पुढाऱ्यास म्हटले की, "गाडगीळांच्यासारख्या तज्ज्ञाचा तुम्ही जेवढा उपयोग करून घ्यावयास पाहिजे तेवढा घेत नाही. एवढा आंतरराष्ट्रीय कीर्तीचा मनुष्य तुम्हाला उपलब्ध असून तुम्ही त्याच्याकडे दुर्लक्ष करता याला काय म्हणावे?" यावर त्या पुढाऱ्याने

फार सूचक उत्तर दिले. " गाडगीळांच्याबद्दल आम्हाला नितांत आदर आहे. त्यांच्या क्षेत्रात ते तज्ज्ञ आहेत व त्यांचा सल्ला आम्ही विचारतो हे तुम्हाला माहीत आहे. परंतु ते जो सल्ला देतील तो आम्ही सर्वस्वी मानला पाहिजे अशी त्यांची अपेक्षा दिसते. ती आम्ही पुरी करू शकत नाही. आम्ही राजकारणी माणसे आहोत. आमची तंत्रे आम्हाला सांभाळावी लागतात. त्याच्या अनुषंगाने त्यांचा सल्ला किती मानावयाचा हे आम्हाला ठरवावे लागते. तुम्ही सांगाल ते आम्ही जसेच्या तसे स्वीकारू असे म्हणणे आम्हाला शक्य नाही आणि आम्ही आमचे पुढारीपण सोडावयाचे नसेल तर योग्यही नव्हे. आमच्या मर्यादातच आम्ही त्यांचा उपयोग करून घेऊ शकतो. त्याप्रमाणे आम्ही तो घेत आहोत. ही आमची भूमिका ठाम आहे आणि ती गाडगीळांना माहीत आहे असे मला वाटते. नसेल तर तुम्ही सांगा. शिवाय गाडगीळ अलीकडे नुसत्या तज्ज्ञाच्या भूमिकेवरून सल्ला देण्यावर संतुष्ट आहेत असे दिसत नाही. कारण काही राजकीय पवित्र्यांत त्यांचा हात मला उघड दिसतो. असे असूनही मी त्याबद्दल काहीही केलेले नाही. परंतु गाडगीळांना आता राजकारणही करण्याची इच्छा झालेली दिसते. तशी इच्छा झाली असेल तर त्यांनी जरूर या आखाड्यात उतरावे. पण मग इथले नियम निराळे आहेत. त्यांच्याशी तज्ज्ञाची व निःपक्षपाती सल्लागाराची भूमिका जुळत नाही असा माझा निरोप तुम्ही गाडगीळांना सांगा. "

हा सर्व प्रकार मला गाडगीळांच्याकडून कळला नाही. ज्या गृहस्थाने हा निरोप[1] आणला त्याच्याकडून कळला. या निरोपावरून गाडगीळांनी आपले वर्तन बदलले असे दिसले नाही. तथापि त्यानंतर त्या पुढाऱ्याचे व त्यांचे संबंध पूर्वीपेक्षा जास्त औपचारिक झाले असे दिसले.

याच संदर्भात गाडगीळांच्या नेहरूंशी असलेल्या संबंधांचा विचार केला पाहिजे. थोडा मागचा इतिहास पहावयाचा तर गाडगीळांचे नेहरूंच्याबद्दलचे मत विशेष चांगले नव्हते. सुभाषचंद्र बोस हे

१. हा मजकूर या गृहस्थांनी वाचून पाहिला आहे
व तो बरोबर आहे असा निर्वाळा दिला आहे.

गाडगीळांचे केंब्रिजमधील समकालीन होते. त्यांच्याबद्दल गाडगीळांना जास्त आपुलकी असे. याचा अर्थ बोसांची सर्व कृत्ये अगर मते त्यांना मान्य होती असे नव्हे. परंतु व्यक्ती म्हणून त्यांना गाडगीळ फार मानीत. त्यांनीच एकदा सांगितल्याप्रमाचे "नेहरू हे आपले पुढारीपण कसे टिकेल याची अहर्निश चिंता बाळगीत आणि त्याला धक्का लागेल असे काहीही करावयास ते अगदी पहिल्यापासून कधीही तयार नसत. सुभाषचे याच्या अगदी विरुद्ध होते. प्रत्येक वेळी आपले सर्वस्व पणास लावून ते गमावण्याची त्याची तयारी असे. त्याने आपले पुढारीपण टिकवण्यासाठी आपले सत्त्व कधी सोडले नाही."

तथापि नेहरूंशी गाडगीळांचे संबंध उत्तम प्रकारचे होते. नेहरूंना गाडगीळांच्याबद्दल फार आदर होता. त्यांनी त्यांचा अवमान कधीही केला नाही. उलट कित्येक वेळा त्यांच्या टीकेची भलामण केली. परंतु एवढ्याने गाडगीळांचे समाधान होण्यासारखे नव्हते. नेहरूंनी वारंवार आपला सल्ला घ्यावा, तो मानावा असे त्यांना वाटे. नेहरूंनी हे मात्र केले नाही. त्यांच्या निकटवर्ती वर्तुळात गाडगीळांचा त्यांनी समावेश केला नाही. काही प्रसंगी ते तसा करतील अशी गाडगीळांना आशा उत्पन्न झाली होती. परंतु ते घडले नाही. त्यामुळे नेहरूसंबंधी गाडगीळांची वृत्ती या टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत आंदोलित असे. ज्या वेळी त्यांची नेहरूंशी काही निमित्ताने गाठ पडे, चर्चा होई, किंवा यांचे एखादे टिपण किंवा व्याख्यान याकडे नेहरू जाहीर अगर इतर मार्गांनी लक्ष वेधीत त्या वेळी गाडगीळ नेहरूंच्याबद्दल फार चांगले उद्गार काढीत. परंतु या व अशा प्रसंगातून पल्लवित झालेली त्यांची आशा भंग पावली की नेहरूंच्या संबंधीची त्यांची मते अत्यंत कडवट होत. यासंबंधीचे आमचे आडाखे इतके अचूक बसले होते की आम्ही आपसात आज-उद्या गाडगीळ नेहरूंच्याबद्दल चहाच्या वेळी काय म्हणतील यासंबंधी अंदाज तयार करीत असू व ९० टक्के तो बरोबर ठरे. हे त्यांना सांगण्याची आम्हाला कधीच छाती झाली नाही. परंतु हे त्यांचे मनोलाघव पाहून आम्हाला फार वाईट वाटे.

दिल्लीवरील स्वारीचा हा एक परिणाम. आता त्यांच्या संशोधकाच्या भूमिकेवर तिचे काय परिणाम झाले हे पाहू. आपल्यापुढे असलेल्या पुराव्याची नीट छाननी करून निःपक्षपाती व पूर्वग्रहविरहित अशी मीमांसा संशोधकाने केली पाहिजे ही भूमिका गाडगीळांना मान्य होती. त्याप्रमाणे त्यांचे लिखाण व संशोधन १९४० पर्यंत सर्वस्वी व पुढेही बहुतेक प्रसंगी होई. परंतु १९४७ पासून याबाबतीत त्यांच्या हातून जास्त जास्त प्रमाणात प्रमाद होऊ लागले. याचे मुख्य कारण त्यांच्या धोरण बदलण्यासंबंधीच्या बदललेल्या वृत्तीत आढळेल. काही विशिष्ट धोरण त्यांना पुरस्कारावयाचे होते व त्यासाठी पुराव्याकडे दुर्लक्ष करणे, शास्त्रीय मीमांसा बाजूस ठेवून इतर गोष्टींवर झोड उठवणे, काही विशिष्ट गोष्टी साधण्यासाठी संशोधनाचा अवडंबर घालणे, वगैरे गोष्टी त्यांच्या हातून होऊ लागल्या. याची काही उदाहरणे येथे देणे इष्ट ठरेल.

( १ ) १९५१ साली पहिल्या पंचवार्षिक योजनेचे विस्तृत परीक्षण करणारा एक टीकात्मक निबंध त्यांनी लिहिला.[१] याचा फार मोठा भाग पहिल्या योजनेत ज्या जलपायन योजना—विशेषतः मुंबई राज्यात—अंतर्भूत केल्या गेल्या होत्या त्यांची निवड आर्थिक दृष्टया कशी चुकीची आहे हे दाखविण्यासाठी होता. ही त्यांची टीका सर्वस्वी गैरलागू होती. कारण या योजनेतच सध्या ( १९५१ ) ज्या चालू आहेत त्याच योजना अंतर्भूत केल्या आहेत असे योजनाकारांनी प्रथमच प्रांजळपणे म्हटले होते. तेव्हा निवड करण्याचा प्रश्नच नव्हता व त्यासंबंधी झोड उठवणे मुद्याला सोडून होते. त्यांहूनही महत्त्वाचे म्हणजे जे योजनाकारांनी म्हटले नव्हते ते त्यांनी म्हटले आहे असे गृहीत धरून गाडगीळांनी ही टीका केली होती. पांडित्याच्या कोणत्याच कसोटीस हे उतरण्यासारखे नव्हते.

१. याचे मराठी भाषांतरही प्रसिद्ध केलेले आहे. पहा : ध. रा. गाडगीळ, **पंचवार्षिक योजनेचे समीक्षण**, गोखले अर्थशास्त्र संस्था, मराठी प्रकाशन ४ थे, १९५१.

खासगी चचत गाडगीळ ही चूक मान्य करीत परंतु जाहीर रीतीने त्यांनी तसे केले नाही. त्यांचा हा टीकात्मक लेख Economic Development and Cultural Change ( Vol. I, No.1, March 1952 ) या शिकागो येथील त्रैमासिकात प्रसिद्ध झाला. त्यावर हा आक्षेप एका अमेरिकी टीकाकाराने जाहीर रीतीने घेतला होता. त्याला छोटेसे उत्तर देताना गाडगीळांनी या मुद्द्याला संपूर्ण बगल देऊन दुसऱ्याच मुद्द्यावर भाष्य केले होते.[१]

( २ ) याच सुमारास त्यांनी India Quarterly (April-June, 1952) मध्ये ' हिंदुस्थानच्या आर्थिक विकासाची दिशा ' या विषयावर एक लेख लिहिला. त्यात पहिली योजना किती लहान आहे व विकासाच्या दृष्टीने किती मोठी पाहिजे यासंबंधी चर्चा केली. त्यांनी ज्या युनायटेड नेशन्सच्या समितीवर काम केले होते त्या समितीच्या अहवालाच्या आधारे हिंदुस्थानातील विकासयोजनेत त्याच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या २३ ते २४ टक्के इतकी गुंतवणूक तरी किमान केली पाहिजे असे सांगून हे कसे शक्य आहे हे दाखविण्यासाठी त्याला इतर देशांचा दाखला दिला. त्यांचेच शब्द येथे उद्धृत करतो.[२]

" The Colombia plan assumes total capital formation and investment of the measure of between 17 and 19 per cent of the national income. The rates of investment of the group of experts worked out in the case of India at a little over 23 per cent, which in not high if we note that the **per capita** national income of Colombia is nearly three times that of India. It is interesring to note in this connexion that the Japanese post-war economic plan estimates planned capital formation to be between 23·1

---

१. Ibid, Vol. I, Nos. 2 and 4, June and December 1952.

२. D. R. Gadgil, " Economic Development in India, " *India Quarterly*, April–June, 1952. Reprinted in *Planning and Economic Policy in India*, Gokhale Institute of Politics and Economics, Study No. 39, 1961, pp. 38–39.

and 23·5 per cent of the national income for each year of the plan i. e. 1949 to 1953. "

या मीमांसेचे अर्थशास्त्र अजब आहे. दर डोई तिप्पट राष्ट्रीय उत्पन्न असणाऱ्या देशाच्या प्रमाणाहून जास्त प्रमाणात हिंदुस्थानसारख्या गरीब देशाने भांडवलाची गुंतवणूक केली पाहिजे असा याचा अर्थ होतो. देश जितका गरीब तितकी मोठ्या प्रमाणावर योजना त्याने केली पाहिजे हे कोणत्या आर्थिक तत्त्वज्ञानात अगर व्यवहारी अर्थशास्त्रात बसते हे सांगणे कठीण आहे. रक्तक्षय झालेल्या माणसाने उत्तम प्रकृती असणाऱ्या माणसापेक्षा जास्त श्रम केले पाहिजेत तरच त्याची प्रगती होईल असे म्हणणे जितके चमत्कारिक तितकेच वरील विधान होय. कोणत्याही आर्थिक कसोटीस हे विधान उतरणे दुरापास्त आहे. तथापि पहिली योजना किती कुचकामी आहे हे सांगण्यासाठी गाडगीळांनी हे चमत्कारिक अर्थशास्त्र वापरले आहे. या त्यांच्या मीमांसेत त्यांच्या तत्त्वग्रस्ततेचेही प्रतिबिंब आहे. समतेचे तत्त्व आंतरराष्ट्रीय पातळीवर लावावयाचा तो एक प्रयत्न आहे. निरनिराळ्या राष्ट्रांत आर्थिक समता साधावयाची तर गरीब राष्ट्रातील राष्ट्रीय उत्पन्नाची वाढ श्रीमंत राष्ट्रांच्या उत्पन्नाच्या वाढीच्या दराच्याहून जास्त दराने झाली पाहिजे. जास्त दराने वाढ होण्याचा एकच मार्ग म्हणजे जास्त प्रमाणात भांडवलाची गुंतवणूक करणे. म्हणजेच गरीब राष्ट्रांनी श्रीमंत राष्ट्रांपेक्षा मोठ्या प्रमाणावर आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाचा भाग भांडवल म्हणून गुंतवला पाहिजे असे ओघानेच प्राप्त होते. गाडगीळांना या युक्तिवादाचा पोकळपणा व अव्यवहारीपणा आकलन झाला नसेल असे म्हणवत नाही.

( ३ ) गाडगीळांनी सहकारी संस्थांतील आपल्या अनुभवावरून व अवलोकनावरून ग्रामीण भागात भांडवलाचा पुरवठा योग्य रीतीने करण्यास काय केले पाहिजे याच्या निश्चित कल्पना १९४८-४९ च्या सुमारास ठरविल्या होत्या. त्यात एक प्रमुख म्हणजे इंपीरियल बँकेच्या राष्ट्रीयीकरणाची होती. १९४८-४९ च्या नंतर गाडगीळ पुष्कळ वेळा असे म्हणत की, ' या सर्वच क्षेत्रात आता इंपीरियल बँकेचा सवता सुभा

मोडून काढण्याची गरज आहे. तो मोडल्याखेरीज सहकारी क्षेत्रात कोणतीही प्रगती होणार नाही. ' ही सूचना व त्यांच्या सहकार क्षेत्रातील इतर सूचना त्यांनी १९५४–५५ साली सरकारकडून स्वीकृत करून घेण्यात यश मिळविले. यासाठी त्यांनी वापरलेले साधन पंडिती होते, परंतु पंडिती पद्धतीने त्यांनी ते वापरले नाही. हे साधन म्हणजे रिझर्व्ह बँकेमार्फत त्यांनी ग्रामीण पतीची एक विस्तृत पहाणी आयोजित केली व त्याची सर्व सूत्रे आपल्याकडे घेतली. या पहाणीचा अहवाल[१] त्यांनी अशा पद्धतीने लिहिला की वाचक तपशिलात बुडून जावा, त्यातून निघणारे निष्कर्ष अंधुक राहावे. या अहवालावर आधारलेल्या शिफारशी– त्यात इंपीरियल बँकेचे राष्ट्रीयीकरणही होते– गाडगीळांनी आपल्या मनाशी पूर्वी ठरविल्या होत्या त्याच होत्या. अहवालाचा हा प्रचंड खटाटोप त्यांना आधार देण्यासाठीच होता. परंतु त्या अहवालातील माहितीवरून त्याच सूचना त्यातून निघतात व त्याच योग्य आहेत असा निष्कर्ष काढता येणार नाही. यावर आमच्यात पुष्कळ वेळा चर्चा झाली. एकदा आम्ही गाडगीळांना अगदी बोळातच पकडले. तेव्हा त्यांनी शेवटी सांगितले की " याच शिफारसी त्या अहवालातून निघतात असे जरी नसले तरी या शिफारसींच्या विरुद्धही अहवालात काही नाही. तेव्हा नकारात्मक का होईना आमच्या शिफारसींना त्या अहवालाचा आधार आहे. " आपण आधी ठरविलेल्या निष्कर्षांना आधार देण्यासाठी माहिती जमविणे व त्या माहितीतून ते निष्कर्ष नकारात्मक पद्धतीने काढण्याचे समर्थन करणे शास्त्रशुद्धतेचे आणि शास्त्रशुचितेचे ध्येय बाळगणाऱ्या संशोधकाला फारसे शोभत नाही.

( ४ ) १९५७–५८ मध्ये दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा बोजवारा उडण्याची चिन्हे दिसू लागली. पूर्वी सांगितल्याप्रमाणे ही योजना गाडगीळांचा मानबिंदू होऊन बसली होती. ही योजना कमी केल्याखेरीज

१. All-India Rural Credit Survey, Report of the Committee of Direction, Vols I ( Parts 1 and 2 ), II, III, Reserve Bank of India, Bombay, 1954–56.

देशात वाढणाऱ्या चलनवृद्धीला आळा घालता यावयाचा नाही असे काही मंडळी म्हणू लागली. आपल्या मानलेल्या या योजनेत सरकारने काही काटछाट करू नये म्हणून देशात चलनवृद्धीच नाही असे मत गाडगीळ जोराने मांडू लागले. १९५७ च्या आर्थिक परिषदेत हे मत त्यांनी जाहीररीतीने ठासून मांडले व त्या अर्थाचे त्यांचे टिपणही परिषदेच्या त्रैमासिकात प्रसिद्ध झाले.[१] हा सत्यापलाप इतका उघड होता की मला स्वतःलासुद्धा याचा निषेध करणे जरूर वाटले व मी यापूर्वी कधीही न केलेली गोष्ट केली. ती म्हणजे जाहीर रीतीने त्यांच्या या विचारसरणीवर लेखी आक्षेप घेतला. त्यांचे म्हणणे कसे तर्कदुष्ट आहे व शास्त्रीय कसोटीवर कसे टिकणारे नाही हे दाखविणारे एक टिपण मी लिहिले. प्रथम ते प्रसिद्ध करू नये, फक्त गाडगीळांना दाखवावे असे माझ्या मनात होते. त्याप्रमाणे मी ते त्यांना दाखविले. परंतु त्यामुळे ते आपले पूर्वीचे लिखाण मागे घेतील हे अशक्यच होते. तेव्हा मीच ते त्यांना प्रसिद्ध करण्याची परवानगी मागितली. मनातून त्यांना हे मुळीच आवडले नाही परंतु उघडपणे तर त्यांना परवानगी नाकारता येईना. तेव्हा त्यांनी मला परवानगी दिली पण मला बजावले की 'या वादविवादात मी मुळीच भाग घेणार नाही.' याचा अर्थ 'मी मला काय म्हणावयाचे ते म्हटले आहे. त्यासंबंधी इतर काय म्हणतात याकडे लक्ष देण्याचे मला कारण नाही.'

माझा लेख प्रसिद्ध झाला.[२] अशा प्रकारचे मतभेद सहिष्णूपणे वागवणे, जोपासणे हे संशोधन संस्थांच्या प्रगतीस आवश्यक असते व गाडगीळांनी ही सहिष्णुता दाखविली याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक झाले. माझ्या ह्या लेखासंबंधी कोठेही विषय निघाला की या सहिष्णुतेकडे बोट दाखवून गाडगीळ चर्चा बंद करीत असे पुष्कळांनी मला सांगितले.

(५) १९५२-५३ मध्ये ओरिसा प्रांतिक सरकारच्या विनंतीवरून

१. Indian Economic Journal, Vol. V, No. 4, April 1958

२. N. V. Sovani, "Inflationary Pressure in the Indian Economy" Indian Economic Journal, Vol. V, No.4, April 1958.

तेथील हिराकूद धरणाचे आर्थिक व सामाजिक फायदे-तोटे यासंबंधी पाहणी करून त्यावर आधारलेला अहवाल तयार करण्याचे गोखले अर्थशास्त्र संस्थेने ठरविले. हे काम माझ्यावर सोपविण्यात आले. त्याप्रमाणे दोन-तीन वर्षांत सविस्तर पाहणी करून १९५९ मध्ये हा अहवाल मी व माझे विद्यार्थी-सहकारी नीलकंठ रथ यांनी तयार केला. या संशोधनाबद्दल गाडगीळ प्रथम फार उत्साही होते. बहुधा या संशोधनातून हिराकूद योजना फारशी फायदेशीर नाही असे निघेल व त्या आधारावर योजना समितीची अशा योजनांची निवड किती चुकीची असते व शास्त्रीय नसते अशी झोड उठवता येईल अशी त्यांची अपेक्षा असावी. परंतु प्रत्यक्षात उलटे झाले. ही योजना चांगली फायदेशीर आहे असे आमच्या संशोधनातून निष्पन्न झाले. त्याचप्रमाणे या अहवालात हिंदुस्थानात प्रथमच एकंदर सामाजिक व आर्थिक फायदा-तोट्याचे गणित एखाद्या प्रकल्पाबद्दल कसे करता येते हे आकडेवारीने दाखविण्यात आले होते. अशा प्रकारची पाहणी गाडगीळांनी गोखले संस्थेमार्फतच १९४० साली केली होती. तथापि ती मर्यादित होती. हिराकूदची पाहणी जास्त व्यापक व अधिक खोलवर जाणारी होती.

हा अहवाल १९६०-६१ मध्ये छापून प्रसिद्ध झाला.[१] परंतु या दरम्यानच्या काळात गाडगीळ या संशोधनाबद्दल अनुत्साही झाले होते. या अहवालाच्या संचालकीय पुरस्कारात त्यांनी लिहिले : " What I want in effect to emphasize is that work such as that undertaken by the Institute in relation to this project is neither of great academic importance nor of much practical use. " ( p. vii ) पुरस्काराचा पहिला तर्जुमा त्यांनी मला वाचावयास दिला त्यात हे वाक्य पाहून मी थक्क झालो. तथापि थोडा विचार केल्यावर हा मजकूर मला गाडगीळांच्या एकंदर व्यक्तिमत्त्वावर व चरित्रावर फार खोल प्रकाश

१. N. V. Sovani & Nilkanth Rath, *Economics of A Multiple-purpose River Dam*, Report of an Inquiry into the Economic Benefits of the Hirakud Dam, Gokhale Intsitute of Politics and Economics, 1960

टाकणारा आहे असे वाटले. तेव्हा त्याबद्दल फारसा आरडा-ओरडा न करता अगदी मऊपणाने मी त्यांना 'हे वाक्य जरा चमत्कारिक वाटते' असे म्हटले. त्यावर त्यांनी सांगितले की 'या अहवालात प्रकल्पांच्या फायदा-तोट्याचे जे गणित मांडण्यात आले आहे तसे गणित प्रत्येक प्रकल्पाबाबत केल्याशिवाय कोणताही प्रकल्प योजनेत समाविष्ट करता उपयोगी नाही असा याचा अर्थ लावला जाईल व त्यामुळे पंचवार्षिक योजना लहान होतील अशी मला भीती वाटली म्हणून मी तसे लिहिले आहे.'

हे समर्थन अगदीच लटके होते. कारण असे फायदा-तोट्याचे गणित करूनच प्रकल्प निवडले पाहिजेत हे योजना–समितीच्या गळी उतरविण्यासाठी १९५७-५८ मध्ये गाडगीळांनी योजना समितीमार्फत एक समिती नेमून घेऊन तिच्या देखरेखीखाली देशाच्या निरनिराळ्या भागांतील पाच जलपायन प्रकल्प निवडून त्यांची पाहाणी हिराकूदच्या नमुन्याप्रमाणे करण्याची योजना कार्यवाहीत आणली होती. या समितीचे ते अध्यक्ष होते व सभासद म्हणून त्यांनी माझी त्या समितीवर नेमणूक करून घेतली होती. या पुढच्या काळात ते सर्व अहवाल तयार होऊन त्यांच्या आधारावर फायदा-तोट्याचे गणित करूनच सर्व प्रकल्प निवडावे अशी योजना समितीची शिफारस झाली व १९६४ साली ती सरकारनेही स्वीकृत केली.[१] गाडगीळांनी पुरस्कारात लिहिलेला मजकूर का लिहिला याची जी दोन कारणे दिली त्यातले हे कारण त्यांच्या पूर्वीच्या व नंतरच्या वर्तनाशीही सुसंगत नव्हते. दुसरे कारणही खरे नव्हते. कारण या अहवालाचा त्यांना वाटत होता असा परिणाम योजनेच्या आकारावर होण्याचा संभव नव्हता. त्यांना या अहवालाबद्दल का अनुत्साह त्या वेळी निर्माण झाला होता हे सांगणे कठीण आहे. परंतु त्यांनी दिलेली कारणे उडवाउडवीची होती यात शंका नाही.

---

१. Report of the Irrigation Commission 1972, Ministry of Irrigation and Power, Vol. I, Para 116, P. 252, New Delhi, 1972.

या शिवाय त्यांचे विधान संश कध-पोडिताच्या भूमिकेशी पूर्ण विसंगत होते. या पुस्तकावर जे जे अभिप्राय प्रसिद्ध झाले त्यात या वाक्याकडे लक्ष वेधून अभिप्राय देणाऱ्यांनी त्या विधानाशी आपला मतभेद दर्शविला होता. काहींनी आश्चर्य व्यक्त केले होते. 'ज्या संशोधनाला तात्त्विक अगर व्यवहारिक महत्त्व नाही असे संशोधन गाडगीळांनी संस्थेसाठी प्रथम स्वीकारलेच का ?' असाही खोचक प्रश्न काही अभिप्रायात विचारण्यात आला होता. हा सर्वच प्रकार गाडगीळांच्या संशोधकाच्या भूमिकेला फारसा स्पृहणीय नव्हता याबद्दल दुमत होणार नाही.

निःपक्षपाती अभ्यासकाच्या भूमिकेशी असुसंगत अशी ही निरनिराळ्या प्रकारची उदाहरणे कालक्रमाने दिली आहेत. त्यावरून गाडगीळांची भूमिका कशी उत्तरोत्तर जास्त जास्त संचारी झाली हे सहज लक्षात येईल. या सर्व प्रमादांमागील मुख्य हेतू सरकारी धोरण एका विशिष्ट दिशेने खेचण्यासाठी दबाव आणण्याचा होता हेही उघड आहे.

## अधिकाराच्या व मानाच्या जागा

सरकारी धोरणावर परिणाम करण्याचा हेतू काही अधिकाराच्या व मानाच्या जागांवरून जास्त यशस्वीपणे साध्य करता येतो हे सांगावयास पाहिजे असे नाही. गाडगीळांना याची पूर्ण जाणीव होती व अशा जागा त्यांना देण्यात आल्या त्या वेळी त्या स्वीकारण्याचे त्यांचे मनातले मुख्य कारण तेच होते. परंतु त्या जागांना चिकटून राहणे त्यांच्या तत्त्वज्ञानात मुळीच बसत नव्हते व त्याप्रमाणे त्यांनी निःस्पृहपणे पुष्कळ वेळा अशा जागांची त्यागपत्रे दिलेली प्रसिद्ध आहेत. परंतु १९६० पासून त्यांची या बाबतीत ढिलाई होऊ लागली व अशा जागांना चिकटून राहण्याची प्रवृत्ती त्यांच्यात बळावू लागली. शेवटी तर त्याचा कडेलोट झाला. अशा जागा सोडल्यास धोरण ठरविण्याच्या कार्यातला आपला भाग कमी होईल, अशी भीती त्यांना अधिकाधिक वाटू लागली असावी. नाही तर त्याचा उलगडाच होत नाही. यांपैकी काही उदाहरणे अशी :

( १ ) संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत गाडगीळांनी अगदी मनापासून

भाग घेतला. १९५५-५६ मध्ये यासंबंधीची स्थिती जेव्हा स्फोटक बनली. तेव्हा हिंदुस्थान सरकारवर जास्तीत जास्त दबाव आणण्यासाठी प्रमुख महाराष्ट्रीय व्यक्तींनी, मंत्रिमंडळाच्या काही सभासदांनी राजीनामे द्यावे असा निर्णय संयुक्त महाराष्ट्र परिषदेने केला. या सर्व घडामोडीत गाडगीळ हिरीरीने भाग घेत होते, मार्गदर्शन करीत होते. शंकरराव देवांशी त्यांचे पूर्ण सहकार्य होते. अर्थातच गाडगीळांनीही रिझर्व्ह बँकेच्या मध्यवर्ती मंडळाच्या सभासदत्वाचा राजीनामा द्यावा अशी अपेक्षा होती. त्याप्रमाणे गाडगीळांनी नेहरूंना पाठविण्यासाठी राजीनाम्याचे पत्रही तयार केले होते कारण नेहरूंकडे त्या वेळपुरते अर्थखाते आले होते. हे पत्र त्यांनी मला व दांडेकरांना वाचून दाखविले व आज-उद्या पाठवणार असे सांगितले. राजीनाम्याचे सर्वसाधारण कारण होतेच परंतु त्यामुळे त्यांच्या-वर राजकीय इतराजी झाली तर त्यामुळे गोखले संस्थेस त्याची झळ लागू नये यासाठी तिचे संचालकत्वही तात्पुरते सोडण्याची कल्पना त्यांनी त्याच वेळी आम्हांला सांगितली होती.

परंतु हे राजीनाम्याचे पत्र त्यांनी कधीच पाठवले नाही. शंकरराव देव त्या वेळी सारखी गाडगीळांच्या राजीनाम्याची चौकशी करीत होते कारण त्यांनाही ते पत्र गाडगीळांनी दाखविले होते. परंतु 'राजीनाम्याचा साधारणपणे दिल्लीवर फारसा परिणाम होत नाही असे दिसते' असे म्हणून गाडगीळांनी राजीनामा देण्याचे टाळले. वास्तविक पाहता रिझर्व बँकेवरील जागा तशी फार महत्त्वाची नव्हती. परंतु गाडगीळांना त्या जागेची विलक्षण ओढ होती. कारण पुढे १९६२ साली त्यांची १० वर्षांची मुदत झाल्यामुळे जेव्हा त्यांना त्या जागेवर पुन्हा नेमले नाही त्या वेळी ती गोष्ट त्यांच्या मनाला फार लागली होती. वास्तविक या जागेवर ते १० वर्षां-पेक्षा जास्त वेळ होते आणि दहा वर्षांपेक्षा जास्त मुदतीवर अशा जागां-वर माणसे नेमू नयेत अशा मध्यवर्ती सरकारने केलेल्या नियमाच्या आधारेच त्यांची त्या जागेवर पुन्हा नेमणूक करण्याचे नाकारण्यात आले होते.

( २ ) महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांच्या संघटनेचे–मुंबई

राज्य सहकारी साखर कारखाना संघ–१९५६ ते १९५९ पर्यंत ते अध्यक्ष होते. हे अध्यक्षपद २-३ वर्षे त्यांना बिनबोभाट लाभले. त्यांना न कळवता या संघटनेच्या संचालक मंडळातील मंडळींनी आपसात ठरवून गाडगीळांची त्या जागेवर पुन्हा निवडणूक करावयाची नाही, त्यांचे नाव सुद्धा अध्यक्ष-पदासाठी सुचवावयाचे नाही असे ठरविले व आपला उमेदवार निश्चित केला. या निवडणुकीच्या सभेस जाईपर्यंत गाडगीळांना याची कल्पना नव्हती व आपली नेहमीप्रमाणे एकमताने निवड होईल अशी त्यांची अपेक्षा होती. सभेच्या जागी गेल्यावर हा बनाव त्यांना समजला. मग ठरलेल्या दुसऱ्या उमेदवाराची निवडणूक झाली. आपल्या विरुद्ध काय शिजते आहे याचा सुगावा गाडगीळांना थोडा लागता तरी त्यांनी आपली जागा सोडण्याची तयारी दाखविली असती व हा अप्रिय प्रसंग टळला असता. परंतु आपले अध्यक्षपद किती वर्षे चालवावयाचे याचे तारतम्य त्यांना या काळात फारसे राहिले नव्हते.

(३) योजना समितीचे उपाध्यक्षपद त्यांना फार पूर्वीपासून हवे होते. १९६७ साली त्यांना ते देण्यात आले व त्यांनी ते स्वीकारले. ते स्वीकारताना त्यांनी सरकारला काही अटी घातल्या होत्या व त्या सरकारने मान्य केल्या होत्या असे कळते.[१] या अटींपैकी एक महत्त्वाची अट अशी होती : " नियोजन मंडळ योजना तयार करून मंत्रिमंडळास सादर करील. त्यावर अनुकूल अगर प्रतिकूल निर्णय मंत्रिमंडळाने घ्यावयाचा आहे. प्रतिकूल निर्णय असल्यास परत प्रकरण मंत्रिमंडळाचे काय म्हणणे आहे हे समजून घेण्यासाठी पाठविले जाईल. तदनंतर नियोजन मंडळ पुनश्च अशा प्रश्नावर विचार करील. अशा प्रकारे नियोजन मंडळ व मंत्रिमंडळ यात सतत सल्लामसलत सुरू राहणे इष्ट आहे." अशा प्रकारची सतत सल्लामसलत गाडगीळ नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष झाल्यानंतर प्रथम थोडे दिवस चालली असली

१. पहा : वा. चु. श्रीश्रीमाळ, " डॉ. गाडगीळ आणि नियोजन ", नवशक्ती, १–९–१९६७. W. C. Shrishrimal " Mr. Gadgil's views on Planning ", *Financial Express*, Bombay, 1–9–1967.

तर असेल परंतु पुढे पुढे ती मुळीच चालू नव्हती हे जाहीर आहे. असे असून सुद्धा गाडगीळांनी ते चालवून घेतले. असे समजते की नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष म्हणून गाडगीळांच्याकडून जी टिपणे अध्यक्षांकडे ( म्हणजेच पंतप्रधानांच्याकडे ) जात ती पंतप्रधानांच्या सचिवालयातील अर्थशाखेच्या मल्लीनाथीशिवाय जात नसत. ही परिस्थिती गाडगीळांच्या २।३ निकटवर्ती मंडळींनी त्यांच्या नजरेस आणून ती अनिष्ट आहे असे सांगितले. त्यांनी ही गोष्ट धसास लावावी असे या मंडळींनी त्यांना आग्रहाने विनविले. परंतु गाडगीळांनी ते मनावर घेतले नाही. प्रकृती अत्यंत खालावलेली असताना सुद्धा त्यांनी आपली जागा सोडली नाही. कळस शेवटी झाला. नवीन निवडणुकांच्या निकालानंतर 'योजना समितीची पुनर्रचना करावयाची आहे. तुम्ही तुमच्या जागेचा राजीनामा द्यावा.' असा अपमानकारक निरोप पंतप्रधानांनी योजना समितीच्या एका सभासदामार्फत पाठविला. त्याप्रमाणे गाडगीळ व त्यांचे सहकारी यांनी राजीनामे दिले. त्यानंतर एक दिवस सुद्धा तेथे राहणे अपमानास्पद होते. अनेकांनी गाडगीळांना तसे सांगितले. परंतु गाडगीळ आणखी दीड महिना तेथे राहिले याचे आश्चर्य वाटते व पूर्वीचे गाडगीळ ते हेच का ? असा प्रश्न पडतो.

अधिकाराच्या जागा स्वीकारण्यात आणखी एक आनुषंगिक बाजू होती. १९५० सालापासून व १९५२ नंतर अगदी न चुकता दर बुधवारी रिझर्व्ह बँकेच्या सभांना जावयाचा पायंडा गाडगीळांनी पाडला होता. या सभांना हजर राहून त्यांच्यामार्फत धोरणावर परिणाम करिता येईल म्हणूनच हे व्रत त्यांनी धरले होते. सहकारी क्षेत्रातील सरकारी धोरण बदलण्यात त्यांना या सभेचे सभासदत्वच उपयोगी पडले याचा उल्लेख पूर्वीच आला आहे. दर बुधवारच्या या मुंबईच्या फेऱ्यांबरोबरच त्यांनी दिल्लीस दर दोन तीन महिन्यांनी जावयाचा पायंडा पाडला होता. धोरणाचे मुख्य सुकाणू दिल्लीस होते व त्यावर परिणाम करावयाचा तर तेथपर्यंत हात पोचणे आवश्यक होते. जेथे धोरण ठरविण्याची चर्चा होऊ शकेल असे संशोधनाचे प्रस्ताव तयार करणे व त्यासाठी सल्लागार

समित्या नेमून घेऊन त्यावर आपण काम करणे, इतर समित्यांवर सभासद म्हणून जाणे या गोष्टी गाडगीळ १९५० नंतर जास्त जास्त करू लागले. यासाठी त्यांना पुष्कळ प्रवास करावा लागे व त्याचा अनिष्ट परिणाम त्यांच्या प्रकृतीवर होई. " तुम्हाला प्रवास सोसत नाही. तुम्ही अगदी पंढरीच्या वारकऱ्याप्रमाणे दर बुधवारी मुंबईस व इतर वेळी दिल्लीस का जाता ? " असे या संबंधात मी त्यांना एकदा म्हटले. तेव्हा त्यांनी मला उत्तर दिले, " जर दिल्लीतील विशिष्ट वर्तुळात तुम्ही २–३ महिने दिसला नाहीत तर तुमचा दिल्लीला विसर पडतो. म्हणून १, २ महिन्यांचे अंतराने मी दिल्लीस जाण्याचे करतो. "

## संशोधक व त्याचे कार्यक्षेत्र

गाडगीळांना धोरण ठरविण्याच्या आकांक्षेने जास्त जास्त ग्रासले व पांडित्यात त्यांना रस उरला नाही तर त्यात बिघडले कोठे ? संशोधन नुसते पुस्तकी व पंडिती असून त्याचा उपयोग काय ? धोरण ठरविण्यासाठी, सुधारण्यासाठीच सर्व संशोधन करावयाचे तर धोरण ठरविण्यावर गाडगीळांनी भर दिला तर त्यात काय बिघडले ? असे प्रश्न सहजच यावर विचारता येतील. किंबहुना गाडगीळांचे हेच वैशिष्ट्य होते असे त्यांच्यावर आलेल्या पुष्कळशा लेखांतून लिहिले गेले आहे. दि. के. बेडेकर यांनी या संबंधात लिहिले आहे ते सर्वसामान्यपणे प्रातिनिधिक समजण्यास हरकत नाही. ते लिहितात : " महाराष्ट्राच्या दैनंदिन आर्थिक जीवनातील क्षुल्लक वाटणाऱ्या व्यवहारापासून तो शेतीच्या, सहकाराच्या, बेकारीच्या, बँक-व्यवसायाच्या, वेतनश्रेणीच्या इत्यादी जटिल प्रश्नांपर्यंत जे काही घडत होते त्यात प्रत्यक्ष मार्गदर्शनाची जबाबदारी त्यांनी पत्करली. जेवढे घडत आहे त्याकडे निर्लेप निरीक्षकाच्या भूमिकेवरून पाहणे हा अभ्यासाचा प्रकार असू शकतो. पण अभ्यासाची उपयुक्तता ओळखूनही त्याची मर्यादा गाडगीळांनी हेरली होती. काटेकोर व निःस्पृह शास्त्रज्ञाप्रमाणे ते निरीक्षण करीत पण तितक्याच तत्परतेने प्रत्यक्ष घडामोडीत सहभागी होत, जबाबदारी अंगावर घेऊन ती निरलस श्रम करून पार

पार्डीत."[1] यातील शास्त्रज्ञाच्या भूमिकेबद्दलचा जो ध्वनी आहे तो लोकप्रिय असला तरी चुकीचा आहे. कारण प्रत्यक्ष घडामोडीत भाग घेणारा शास्त्रज्ञ काटेकोर व निःस्पृह निरीक्षक राहू शकत नाही. विशेषतः सामाजिक शास्त्रात तर हे अशक्यच असते. एखादा रसायनतज्ज्ञ आपल्या प्रायोगिकेमध्ये जाऊन काटेकोर व निःस्पृह निरीक्षण करू शकतो व प्रायोगिकेबाहेर येऊन इतर घडामोडीत भाग घेऊ शकतो. या दोन भूमिका अलग ठेवण्यात सुद्धा पुष्कळ अडचणी असतात आणि ही गोष्टही अवघडच समजली जाते. नैसर्गिक शास्त्रात ही अलगता ठेवण्याची शक्यता तरी मानावी लागते. परंतु सामाजिक शास्त्रात प्रायोगिकेचा अभाव असल्यामुळे व निरीक्षण करणारा निरीक्षकही ज्या समाजाचे अवलोकन करावयाचे त्याचाच घटक असल्यामुळे एकाच व्यक्तीला या दोन भूमिका निरनिराळ्या ठेवणे अशक्य असते. निरीक्षकाला जे अशक्य ते प्रत्यक्ष भाग घेणाराला सुतराम् अशक्य असते. स्वतः गाडगीळांचे तसेच मत होते व अभ्यासाच्या शास्त्रीय पद्धतीवर गोखले संस्थेतील शिकाऊ संशोधकांना ते जो पाठ देत असत त्याच्या टिपणात वरील विचार ग्रथित केलेले आढळतील.

निर्लेप निरीक्षकाच्या भूमिकेवरून अभ्यास करीत राहिल्यास वस्तुस्थितीतील बदलाकडे दुर्लक्ष होते असाही एक आक्षेप घेतला जातो. परंतु हे खरे नाही. निरीक्षक-अभ्यासक जर साक्षेपी असेल तर असे होणार नाही. तो फरकांचाही अभ्यास करील. ते फरक बरोबर दिशेने होत आहेत की नाही हेही तो सांगू शकेल व तसे नसल्यास त्यात काय बदल करावयास हवा हेही सांगावयास त्यास काहीच प्रत्यवाय नाही परंतु ते फरक मी घडवून आणून दाखवतो असे त्याने म्हटले व केले तर त्याची भूमिका अभ्यासक-निरीक्षकाची राहत नाही. धोरण ठरविणारा व धोरणावर परिणाम करण्यासाठी वागणारा संशोधक रहात नाही. तो क्रियावान कार्यकर्ता बनतो. दोन्ही भूमिका एकाच वेळी पार पाडावयाच्या तर दोन्हीतही अंशतः यशस्वी होता येते हे निराळे सांगावयास नको.

१. माणूस, १५ मे १९७१

गाडगीळांनी केले ते बरोबर केले का चूक केले हा मुद्दा येथे नाही. त्यांनी केले तेच योग्य केले व तसेच करणे जरूर आहे असा जो ध्वनी बेडेकरांच्या व इतरांच्या लिखाणात आहे त्यातील अंतर्विरोध काय असतो याच्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे तो उत्पन्न झालेला आहे.

धोरण अमलात आणण्यात भाग घेतला नाही तर त्यातल्या व्यावहारिक अडचणी कळत नाहीत व निर्लेप निरीक्षकाचे संशोधन वास्तवापासून दूर जाते. परंतु त्यात भाग घ्यावा तर निर्लेपता सुटते. अशा या श्रृंगापत्तीतून एक मार्ग युरोपीय व अमेरिकी अभ्यासक पुष्कळ वेळा अनुसरतात. तो म्हणजे एका वेळी एकच भूमिका करण्याचा. परदेशातील पुष्कळ प्राध्यापक संशोधक अध्ययन व अध्यापन सोडून काही काळ सरकारी नोकर होतात अगर सरकारी अगर खाजगी उद्योगधंद्यांतून जागा पत्करतात. ठराविक काळानंतर ते पुन्हा विद्यापीठात परत येतात च पूर्वीची भूमिका करू लागतात. यामुळे प्रत्यक्ष परिस्थिती व व्यवहार यांच्याशी त्यांचा संबंध येतो व त्यांचे संशोधन जास्ती वस्तुनिष्ठ होण्यास मदत होते. परंतु एक भूमिका करीत असताना दुसरी न करण्याचा संकेत ते पाळतात. गाडगीळांना असे करणे शक्य होते. परंतु त्यांनी ते केले नाही याचे कारण त्यांना काही मुदतीतच धोरण ठरविण्याची आकांक्षा नव्हती. त्यांची आकांक्षा याहून फार मोठी होती.

गाडगीळांच्या दुरंगी भूमिकेचा आविष्कार पुष्कळ वेळा ते वादविवादात आपली बाजू सावरण्यासाठी करीत असत. अर्थशास्त्रज्ञांच्या बैठकीत अगर तात्त्विक चर्चेत जर आपली बाजू सैद्धान्तिक वादात कमी पडत आहे असे त्यांना वाटले तर ' मी पढिक पंडित नाही. मी प्रत्यक्ष कार्य करणारा आणि व्यवहारी अर्थशास्त्रज्ञ आहे. माझे मत माझ्या अनुभवावर आधारलेले आहे. ते सैद्धान्तिक दृष्टीने चूक असल्यास त्याला माझा नाइलाज आहे. येथे सिद्धान्तन बदलण्याची जरूर आहे असे मला वाटते ' असे म्हणत. या उलट ज्या वेळी राजकारणी पुढारी, सरकारी अधिकारी वगैरे मंडळींशी चर्चा करताना आपल्यावर बाजू शेकते आहे असे त्यांना वाटल्यास ते म्हणत : ' मी पढिक पंडित आहे. शास्त्राप्रमाणे

काय करावयास पाहिजे हे मी तुम्हांला सांगितले. तुम्हांला शास्त्रीय चिकित्सा बाजूस सारावयाची असेल तर तुमचे म्हणणे बरोबर ठरेल. परंतु ते शास्त्रीय नाही व तसे करणे हितावह नाही हे मी ठासून सांगतो." त्यांचे प्रत्यक्ष शब्द मी येथे उद्धृत करीत नाही. तर स्थूलमानाने ते काय म्हणत याचा गोषवारा सांगत आहे. गाडगीळांच्या बद्दलचा हा अनुभव पुष्कळांना पुष्कळ वेळा आलेला आहे. त्यामुळे काही मंडळींना ते दुटप्पी वाटत. काहीही करून आपले समर्थन करण्याची त्यांना सवय आहे असाही आरोप त्यांच्यावर होई. त्यांचा आग्रही स्वभाव लक्षात घेता आपले म्हणणे दुसऱ्यांच्या गळी उतरविण्यासाठी ते या विवादतंत्राचा उपयोग करीत हे खरे आहे. परंतु त्यांच्या मनातील द्वंद्वामुळे हे अगदी सहजपणे होई. त्याच्यामागे आपण देत असलेला सल्ला किंवा सांगत असलेले मत दुसऱ्यांना पटवण्याचा हेतू प्रधान असे. परंतु त्याचे मूळ मला त्यांच्या द्विधा मनःस्थितीत दिसते.

आपल्या मनातील द्वंद्वामुळे आपल्या वर्तनात होणाऱ्या संचाराबद्दल गाडगीळांना पूर्ण कल्पना होती व हे काही मर्यादेपर्यंत ठीक असले तरी एकंदरीने योग्य नव्हे याचीही जाणीव होती असे मला खात्रीपूर्वक वाटते. यातून एक मार्ग निघण्यासारखा होता व तो आपल्याला अनुसरता येईल अशी त्यांना आशा वाटत होती. सरकारी धोरणावर केंद्रस्थानी बसून परिणाम करावयाचा तर त्याला त्यांच्या तज्ज्ञाच्या भूमिकेला जुळेलशी योग्य अशी अधिकाराची जागा त्यांना मिळणे आवश्यक होते. त्यांना नुसती सरकारी नोकरी म्हणून अशी जागा मिळाली तर नको होती. योजना समितीच्या नेमणुकीनंतर तिच्या उपाध्यक्षाचे पद त्यांना अगदी हवे तसे होते. उपाध्यक्षाला मंत्रिमंडळाच्या सभासदाचा दर्जा देण्यात आला होता. मंत्रिमंडळात आर्थिक प्रश्नावर चर्चा होईल तेव्हा हजर राहून चर्चेत भाग घेऊ देण्याची प्रथा नेहरूंच्या वेळेपासून सुरू झाली होती. योजना समिती ही तज्ज्ञ समिती होती. तिच्या उपाध्यक्षस्थानी तज्ज्ञच नेमणे उचित होते. ही जागा गाडगीळांना मनापासून हवी होती. ती त्यांना मिळती तर गोखले संस्थेचे संचालकपद सोडून त्यांनी ती घेतली

असती यात तिळप्रायही संशय नाही. एक दोनदा आडून का होईना हे हृद्गत त्यांनी माझ्याजवळ व्यक्त केले होते व गोखले संस्था चालवण्याची जबाबदारी वाटते त्यापेक्षा फार लवकर तुम्हांला उचलावी लागेल असे बजावले होते. असे झाले असते तर त्यांच्या मनातील द्वंद्वाचा निरास झाला असता. सफल आकांक्षेने त्यांचा उत्साह द्विगुणित झाला असता. आणखी पुष्कळ गोष्टी झाल्या असत्या. १९५६ नंतर तसे होण्याचा दाट संभव निर्माण झाला होता. परंतु तसे झाले नाही. त्यांना दोन-चार वेळा योजना समितीचे सभासदत्व देऊ करण्यात आले. परंतु त्यांनी त्याला नकार दिला. त्यांना नुसते सभासदत्व नको होते. कोणाच्याही हाताखाली काम करण्यात त्यांना रस नव्हता व त्यांना समाधानही लाभले नसते. त्यामुळे त्यांनी नुसत्या सभासदत्वास नकार दिला ते योग्यच केले असे म्हटले पाहिजे. परंतु उपाध्यक्षाची जागा त्यांना योग्य वेळी न मिळाल्या-मुळे त्यांच्या मनातील द्वंद्व सतत चालू राहिले. त्याचा अनिष्ट परिणाम त्यांच्या सर्वच कार्यक्षेत्रावर होत राहिला.

अशा मानसिक द्वंद्वामुळे मूळ शिक्षक-संशोधकाची भूमिका कशी सुटते हे पाहण्यासारखे आहे. संशोधन संपूर्णपणे हवेत नसावे, प्रत्यक्ष धोरणाशी त्याचा संबंध असावा या गोष्टी सहज मान्य करता येतात. परंतु संशोधनातून निघालेल्या आपल्या धोरणविषयक शिफारशी मान्य करून घ्यावयाची खटपट संशोधकच करू लागला व ते प्रत्यक्षात आणण्याची जबाबदारीही अंगावर घेऊ लागला म्हणजे प्रथमत: संशोधनाकडील लक्ष कमी होऊ लागते. कारण या खटपटींसाठी लागणारा वेळ व त्यासाठी खर्च करावी लागणारी शक्ती ही संशोधनाला मिळेनाशी होतात. दुसरे म्हणजे संशोधनाची स्वयंगती कुंठित होऊन निरनिराळ्या ठिकाणी अगर वेळी धोरण ठरविण्यास काय उपयोगी पडेल यासंबंधीच संशोधन करण्याची वृत्ती बळावते. कोणत्याही वेळी जो प्रश्न असा संशोधक धोरण ठरविण्याच्या दृष्टीने हाताळत असेल त्याला उपयोगी असे संशोधन हाती घेण्याकडे त्याचा कल होतो. पूर्वीच्या संशोधनाने सुचविलेले नवे प्रश्न सोडविण्यासाठी तेच संशोधन पुढे न्यावे लागते,

त्याचे पर्याय शोधावे लागतात, नवीन दिशेने त्याची मीमांसा करावी लागते. संशोधनाची ही स्वयंगती किंवा दिशा म्हणता येईल. वरील परिस्थितीत ती सुटणे अटळ असते आणि याचा अनिष्ट परिणाम संशोधनावर होतो. तिसरे म्हणजे संशोधक ज्या धोरणाचा पुरस्कार करीत असेल त्याला विरोधी उत्तरे देणारे संशोधन मूल्यवान नाही असे मानण्याकडे त्याच्या मनाची प्रवृत्ती होऊ लागते. (हिराकूदच्या पाहणीचे उदाहरण मागे दिलेच आहे.) ही वृत्ती संशोधनास फार मारक असते. फक्त आर्थिक हितसंबंधामुळेच लोक विशिष्ट प्रकारे वागतात असे नसून स्वतःच्या कल्पना, सिद्धान्त वगैरेसंबंधीही हितसंबंध निर्माण होऊ शकतात व वागणुकीवर परिणाम करू शकतात. त्यात निर्माण झालेली आत्मीयता संशोधकाच्या निःपक्षपाती भूमिकेचा संपूर्ण नाश करते. असा संशोधक एखाद्या संशोधन संस्थेचा स्थापक व चालक असला तर यामुळे त्या संस्थेवर, तिच्यातील व्यवस्थेवर, संशोधनात्मक धोरणावर, वगैरे अनिष्ट परिणाम होतात. गाडगीळांना हे टाळता आले नाही.

मानसिक संघर्षामुळे त्यांचा संशोधनासंबंधीचा दृष्टिकोण हळूहळू बदलू लागला. ज्या संशोधनातून त्यांना त्या वेळी धोरणावर परिणाम करण्याच्या दृष्टीने इष्ट असेल ते न मिळण्यासारखे असेल तर त्याबद्दल ते संपूर्ण अनुत्साह दाखवू लागले. या उलट ज्याचा त्यांना तात्कालिक उपयोग असे अगर त्यांच्या दिल्लीवरील स्वारीत ज्याचा त्यांना नजीकच्या काळात उपयोग करावयाचा असेल त्याबद्दल ते अतोनात उत्साह दाखवीत. पुष्कळ वेळा संशोधकांच्या दृष्टीने हे संशोधन दुय्यम दर्जाचे असे, अगर अगदीच सामान्य असे, तर पहिल्या प्रकारचे कधी कधी जास्त मौलिक व महत्त्वाचे असे. गाडगीळांची ही उलटी रीत फार मोठा अचंबा निर्माण करी. संशोधन संस्थेत अशा प्रकारची चलाखी फार वेळ लपून राहू शकत नाही. उदाहरणार्थ, गाडगीळ गोखले संस्थेतून निवृत्त होण्याच्या आधी २, ३ वर्षे त्यांनी 'जिल्हा योजना' यासंबंधी संशोधन करावयासाठी १, २ माणसे लावून बरेच पैसे खर्च केले. संस्थेच्या संशोधन कार्यक्रमात हे संस्थेच्या कामाच्या 'सीमेवरील' संशोधन

( fringe activity ) असे खुद्द गाडगीळांनीच त्याचे वर्णन केलेले होते. दिल्लीवरील स्वारीतील ही एक महत्त्वाची बाब होती. तथापि या संशोधनातून काहीही निघण्यासारखे नाही असे प्रथमपासूनच वाटत होते. पुढे पुढे तर त्या संशोधनावर नेमलेल्या माणसांना ते पूर्णपणे कळून चुकले. त्यांपैकी एक दोघांनी — जे वयाने व अनुभवाने बरेच पक्व होते व ज्यांचा योगक्षेम गोखले संस्थेतील नोकरीवरच अवलंबून नव्हता— हे त्यांचे मत गाडगीळांना स्पष्टपणे कळविले. परंतु गाडगीळांनी ते संशोधन थांबविले नाही. उलट अशा परिस्थितीत सुद्धा हताश न होता सतत उद्योग करीत राहिले पाहिजे असे व्याख्यान त्यांना ऐकविले. संशोधनाच्या यशाविषयी त्यांचीही विशेष अपेक्षा नसावी. परंतु त्यातील यश वा अपयश हा त्यामागचा हेतूच नव्हता. रान उठविण्याच्या मोहिमेतले ते एक शस्त्र होते. त्याने काय होते याची काळजी न करता ते सारखे परजीत राहणे हे त्यांच्या दिल्लीवरच्या स्वारीच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. त्यामुळे गाडगीळ त्या संशोधकांचे म्हणणे मान्य करणे शक्यच नव्हते.

त्यांच्या दिल्लीवरील स्वारीमुळे गाडगीळांचा बाहेरच्या कामांचा व्याप वाढू लागला. त्यामुळे त्यातून जो थोडा वेळ उरेल त्यातच संस्थेचे काम त्यांना उरकावे लागे. ते शक्य तेवढ्या यांत्रिक पद्धतीने कसे उरकता येईल याकडे त्यांचा कल होऊ लागला. एक वर्षी त्यांनी एक सेवानिवृत्त मामलेदार आपल्या हाताखाली कारभारी नेमून संस्थेतील आपले काम कमी करण्याचा प्रयत्न केला. आम्हा सहकाऱ्यांचा विरुद्ध सल्ला त्यांनी धुडकावून लावला व आपल्या मनातले खरे केले. पण त्यांच्या दुर्दैवाने त्याचे अनिष्ट परिणाम त्यांना फारच लवकर दिसू लागले व त्यांनी शक्य तितक्या लवकर त्या गृहस्थांना रजा दिली.

संस्थेच्या संचालकत्वाची कामे दुय्यम सहकाऱ्यांवर सोपवून त्यांना आपल्या कामाचा भार हलका करता आला असता. परंतु अधिकाराचे असे वाटप त्यांच्या स्वभावाच्या सर्वस्वी विरुद्ध होते. अधिकाराचे वाटप, विकेंद्रीकरण यांना अनुकूल अशीच त्यांची जाहीर मते होती. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात व गोखले संस्थेबाबतीत आपल्या हातातील अणूएवढी

सत्ताही दुसऱ्यास अगर दुय्यमास देण्यास ते तयार नसत. कागदावर विकेंद्रीकरण ते पुष्कळच दाखवीत. परंतु प्रत्यक्षात तसे मुळीच नसे. पुणे विद्यापीठातील पुण्यातील महाविद्यालयांच्या केन्द्रीकरणाच्या वादात गाडगीळांचा पराजय झाल्यानंतर त्यांनी विद्यापीठातील आपल्या जागांचा राजीनामा दिला. परंतु गोखले संस्थेस विद्यापीठाच्या निरनिराळ्या सभांमध्ये कायद्यानेच पदसिद्ध सभासदत्व दिलेले होते. राजीनामा देण्यापूर्वी या सर्व जागांवर गाडगीळ संस्थेचे प्रतिनिधी म्हणून काम करीत, पण राजीनामा दिल्यावर त्यांना विद्यापीठात जावयाचे टाळावयाचे होते. संस्थेचे नुकसान होऊ नये व आपल्याला विद्यापीठात जावयास लागू नये यासाठी 'संयुक्त संचालक' असे एक नवे पद निर्माण करून त्यांनी त्यावर माझी नियुक्ती केली. १९५८ साली त्यांनी मला संयुक्त संचालक म्हणून नेमून घेतले. संयुक्त संचालकाची कामे संचालकाने वेळोवेळी ठरवावयाची असे ठरावात होते. त्याला अनुसरून पुणे विद्यापीठावर संस्थेमार्फत मी काम करावे – संस्थेचा प्रतिनिधी म्हणून – या पलीकडे त्यांनी कोणतेही काम मी १९६४ पर्यंत संयुक्त संचालक ही उपाधी बाळगीत होतो तोपर्यंत माझ्याकडे सुपूर्द केले नाही!

संशोधक संस्थांचे यश त्यात काम करणारी मंडळी किती हुशार व आपल्या कामास किती पूर्णपणे वाहिलेली आहेत त्यावर अवलंबून असते. संचालकाला अशी माणसे पारखून घेऊन ती संस्थेत कशी नीट स्थिरावतील याकडे सतत लक्ष द्यावे लागते. आरंभीच्या काळात गाडगीळ त्यासंबंधी फार जागरूक असत. त्या वेळी गोखले संस्थेची आर्थिक परिस्थितीही बेताचीच असल्यामुळे तसे करणे आवश्यकही होते. परंतु संस्थेची आर्थिक परिस्थिती सुधारली, ती वाढू लागली – पूर्वीच्या मानाने १०–१२ पट माणसे तेथे काम करू लागली. या काळातच गाडगीळांची बाहेरची कामे वाढली. संस्थेची कामे करण्यास त्यांना उपलब्ध असलेला वेळ जसा जसा कमी होऊ लागला तसे तसे माणसे नीट पारखून घेणे, त्यांच्या कुवतीचा नीट अंदाज बांधणे वगैरे गोष्टींबाबत ते पूर्वीइतके जागरूक राहिले नाहीत. सहकाऱ्यांमार्फत हे त्यांना करता आले असते. परंतु वर

सांगितल्याप्रमाणे ते त्यांच्या स्वभावात नव्हते. याचा परिणाम असा झाला की संस्थेचा विस्तार यांत्रिक पद्धतीने करण्याकडे त्यांची प्रवृत्ती होऊ लागली. इतक्या जागा निर्माण केल्या आहेत, त्या भरल्या पाहिजेत, मग त्यासाठी मिळतील ती माणसे घ्यावी व तो कार्यक्रम सजवावा असे होऊ लागले. प्रथम माणसे एक वर्षापुरती घेऊन त्यांच्या कामावरून त्यांचे मूल्यमापन करून योग्य असतील त्यांची मुदत पुढे वाढवावी या नियमास शैथिल्य येऊ लागले. जास्त हुषार व होतकरू तरुण माणसे संस्थेत येत ती संस्थेच्या लौकिकाचा फायदा घेऊन तेथून पुढे जाण्यासाठी. बहुधा ती आपणहून संस्थेतून जात. त्यामुळे संस्थेत टिकून राहणारी मंडळी बहुधा दुय्यम प्रतीची व ज्यांना दुसरीकडे त्याहून बरी नोकरी मिळण्याची संधी नाही अशीच असू लागली. निग्रहीपणाने अशांना कमी करून दुसरी मंडळी तेथे आणणे, त्यांची परीक्षा घेणे हे क्रमप्राप्त होते. परंतु गाडगीळ हे करीनासे झाले. फक्त संकल्पित जागांवर माणसे आहेत की नाहीत व ती तशी असली पाहिजेत येवढेच ते यांत्रिक पद्धतीने बघू लागले. पूर्वीप्रमाणे त्यांना वेळ असता तर त्यांनी हे केले नसते. हे काम सहकाऱ्यांवर सोपविले असते तरीही हे झाले असते. पुष्कळ वेळा संस्थेत काम करणाऱ्या बऱ्याच मंडळींची तोंडओळख सुद्धा गाडगीळांना नसे इतके ते संस्थेतील मंडळींना पुढे पुढे दुरावले होते.

संशोधन संस्थेचा विकास करताना तिची कोणती अंगे-उपांगे वाढवावयाची, संशोधनाचा एकंदर कार्यक्रम सुसूत्र कसा ठेवावयाचा याची काळजी वाहावी लागते. त्यात दोन धोके प्रमुख असतात. पहिला धोका संशोधनासाठी उपलब्ध होणारा पैसा ज्यांच्याकडून येतो त्यांच्या बाजूने असतो. एकदा संशोधन संस्थेचे नाव झाले की, संशोधनासाठी पैसे पुरविणाऱ्या संस्था अगर सरकारी यंत्रणा यांचे मोहरे तिकडे वळतात व निरनिराळ्या संशोधन प्रकल्पांना लागणारा पैसा अशा संस्थेस देऊ करण्यात येतो. हा पैसा सर्वसाधारण संशोधनाची वाढ व्हावी यासाठी बहुधा नसतो तर काही विशिष्ट संशोधन प्रकल्पासाठी असतो. असे विशिष्ट संशोधन संस्थेच्या पूर्वीच्या व चालू असलेल्या संशोधनाच्या

कार्यक्रमाशी जुळते नसले तरी देऊ करण्यात आलेल्या संशोधन प्रकल्पाबरोबर पैसा येतो म्हणून स्वीकारण्याचे प्रलोभन असते. काही प्रमाणात हे टाळता येत नाही व त्यामुळे संशोधनाचे कार्यक्रम विस्कळित होतात. मग ते कमीत कमी विस्कळित कसे होतील याकडे लक्ष द्यावे लागते. दुसरा धोका उपलब्ध होणाऱ्या संशोधकांचा असतो. एखादा उत्तम संशोधक संस्थेत यावयाची इच्छा व्यक्त करून तयारी दाखवितो. त्याच्या नैपुण्यास जुळते असे संशोधन हे चालू संशोधनाच्या कार्यक्रमात बसणारे नसले तर एक नवीन अंग त्यास जोडणे आवश्यक होते. यातही हे अंग संस्थांच्या कार्यक्रमात चपखल बसेल की नाही, सध्या बसले तरी दीर्घकालीन कार्यक्रमात त्याचा समावेश होईल की नाही, पैसा व संशोधक त्याला सातत्याने चालू राहण्यासाठी मिळू शकतील की नाही वगैरे गोष्टी विचारात घेऊन फार सावधगिरीने पावले टाकावी लागतात. या सर्वच गोष्टींतील गाडगीळांचे अवधान शेवटच्या काही वर्षांत अजिबात सुटले होते. याबाबत एकच उदाहरण पुरेसे आहे.

श्री. जे. पी. नाईक यांनी १९६४ साली गोखले संस्थेस येऊन मिळण्याचा मानस गाडगीळांची भेट घेऊन त्यांना कळविला. त्या वेळी ते १, २ महिन्यांत मध्यवर्ती शिक्षणखात्यातून सेवानिवृत्त व्हावयाचे होते व शिक्षण आयोगावर त्यांची कार्यवाह व सभासद म्हणून नेमणूक व्हावयाची होती. आयोगाचे काम १८ महिन्यांत पूर्ण होईल व त्यानंतर मी लगेच गोखले संस्थेत काम करण्यास येईन असे त्यांनी गाडगीळांना सांगितले. गाडगीळांनी त्यासंबंधी फारसा विचार न करता लगेच Educational Administration and Finance असा विभाग संस्थेत काढावयाचा व त्याचे मुख्य म्हणून नाईक यांची नेमणूक करावयाची असा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान मंडळाकडे पाठविण्यासाठी तयार केला. मला ही गोष्ट अत्यंत अविचारी वाटली. नाईक यांच्या तज्ज्ञपणाबद्दल शंका नव्हती. परंतु अशा प्रकारचे संशोधन संस्थेच्या संशोधनाच्या कार्यक्रमात चपखल बसण्यासारखे नव्हते. परंतु त्याहूनही महत्त्वाची गोष्ट नाईक यांचे वय संस्थेस मिळण्याच्या वेळी ५८ वर्षांचे झाले असते व

संस्थेच्या नियमाप्रमाणे ६० व्या वर्षी त्यांना निवृत्त व्हावे लागले असते. तेव्हा नाईक हे या कामासाठी संस्थेस दोनच वर्षे मिळणार होते. तेव्हा नाईक हे स्वत: जरी संशोधनासाठी आदर्श असले तरी त्यांची जागा घेऊ शकेल अशी माणसे अगर माणूस तयार करण्यास हा अवधी अगदीच अपुरा होता. तेव्हा दीर्घकालीन दृष्टीने याचा अधिक विचार केल्याखेरीज ही योजना करणे व ती विद्यापीठ अनुदान मंडळाकडे पाठविणे योग्य नव्हते. नाईक यांना गाडगीळांनी माझ्याशी चर्चा करावयास पाठविले त्या वेळी मी त्यांना हे स्पष्टपणे सांगितले. पुढे गाडगीळांनाही सांगितले. माझे म्हणणे ऐकून घेऊन 'तुम्ही म्हणता ते बरोबर आहे' असे म्हणून गाडगीळांनी माझी बोळवण केली आणि काही दिवसांनी ती योजना जशी पूर्वी होती तशीच मला न कळवताच विद्यापीठ अनुदान मंडळाकडे पाठवून दिली. पुढे नाईक स्वत:च न आल्यामुळे त्याचे आणखी साडेपोवाडे झाले नाहीत. परंतु या सर्वच बाबतीत गाडगीळांची वागणूक खरोखरीच आश्चर्यजनक होती.[1]

त्यांच्या या मन:स्थितीचा परिणाम त्यांच्या बौद्धिक कामगिरीवरही झाला. पाश्चिमात्य देशातील परिस्थितीस अनुसरून सिद्ध झालेले सध्याचे अर्थशास्त्र हिंदी परिस्थितीचे आकलन करण्यासाठी योग्य नाही असे त्यांचे मत होते. त्यासाठी हिंदी अर्थशास्त्र हे मुळापासून उभारले पाहिजे असे ते मानीत. तसे करण्यासाठी हिंदी जीवनाची अधिक माहिती गोळा केली पाहिजे, तिचा अधिक अभ्यास झाला पाहिजे असे त्यांना वाटत असे. गोखले संशोधन संस्थेसारखी संस्था काढून ती वाढवून तिच्यामार्फत निरनिराळे संशोधनाचे उपक्रम करून त्यांनी हे साध्य करण्याचे एक हत्यार निर्माण केले. त्यांचे स्वत:चे संशोधनकार्यही पहिली बरीच वर्षे याच ध्येयाने चालू होते. त्याप्रमाणे ते पुढे चालू राहते तर आयुष्याच्या अखेरीस हिंदी अर्थशास्त्राचा सैद्धान्तिक आराखडा ते स्थूलमानाने तरी तयार करू शकले असते. एक सुसंगत व घोटीव असे गाडगीळ-सिद्धान्तन

१. या परिच्छेदातील मजकूर श्री. जे. पी. नाईक यांनी पाहून तो बरोबर असल्याचा निर्वाळा दिला आहे.

तयार झाले असते. निदान त्याचा पाया घातला गेला असता. परंतु त्यांचा धोरण ठरविण्याचा ध्यास जसा वाढू लागला तसा अशा प्रकारचा विस्तृत अभ्यास सोडून जो प्रश्न धोरणाच्या दृष्टीने त्यांना त्या त्या वेळी महत्त्वाचा वाटत असे त्यावर संशोधन करण्याकडे व लिहिण्याकडे त्यांची शक्ती खर्च होऊ लागली. धोरणाचे प्रश्न परिस्थितिजन्य असल्यामुळे त्यात भिन्नत्व व पृथकपणा पुष्कळच असे. त्यामुळे निरनिराळ्या भिन्न प्रश्नांवर त्यांची विचारशक्ती केन्द्रित होई. त्यांनी ज्या प्रश्नावर लिहिले त्यावर मौलिक अशी मीमांसा केली व विचार मांडले याबद्दलही दुमत होणार नाही. त्यांचे बुद्धिवैभव होतेच तसे ! परंतु ही विचारमौक्तिके त्या त्या प्रश्नांच्या शिंपल्यातून सिद्ध होऊन निरनिराळीच राहिली. त्यांना एका सूत्रात बांधून त्यातून एक सलग अशी विचारमालिका गुंफण्याचे काम त्यांना करता आले नाही. किंबहुना त्याकडे त्यांनी दुर्लक्षच केले. त्यामुळे त्यांचे पुढच्या पिढीला द्यावयाचे विचारधन बिखरे मोती असेच वर्णावे लागेल. गाडगीळ–विचारपरंपरा अशी त्यातून सिद्ध झालेली नाही. ही पृथक पृथक विचाररत्ने कालपरत्वे लुप्त होणार नाहीत ना अशी भीती वाटते.

## मानसिक द्वंद्व

आपण संस्थेशी संबंधित नसलेल्या कामात बराच वेळ घालवतो याची गाडगीळांना जाणीव होती. दर बुधवारी रिझर्व्ह बँकेच्या बैठकीसाठी मुंबईस जावयाचे ते गोखले संस्थेच्या अगर शिक्षणक्षेत्रातील इतर कामासाठी नसल्यामुळे त्या दिवशी गोखले संस्थेत त्यांची अनुपस्थिती ही रजेच्या सदरात पडत होती. पहिली काही वर्षे याकडे कोणी लक्ष दिले नाही. परंतु संस्थेचा व्याप जसा वाढू लागला व जास्त जास्त माणसे तेथे काम करू लागली तसतसे सर्वांचीच वागणूक नियमबद्ध करणे आवश्यक झाले. याबाबत स्वतःच उदाहरण घालून द्यावे म्हणून दर आठवड्यातील बुधवार हा रजेचा दिवस मांडावा अशी गाडगीळांनी सूचना दिली. पण ती त्यांच्या अंगाशी आली. कारण त्यापायी त्यांच्या

किरकोळ व हक्काच्या रजेच्या दिवसांपैकी ३५ ते ४० दिवस खर्ची पडू लागले. त्यामुळे दरवर्षी विश्रांतीसाठी त्यांना दोन तीन आठवडेही रजा घेणे अशक्य होऊ लागले. तेव्हा बुधवारची त्यांची अनुपस्थिती रजा म्हणून धरू नये असे ठरविण्यात आले.

आपल्या धोरण ठरविण्याच्या आकांक्षेमुळे आपल्या शिक्षक-संशोधक-तज्ज्ञाच्या भूमिकेशी प्रतारणा होते व त्याचे दुष्परिणाम होतात याची गाडगीळांना मनोमन जाणीव होती. परंतु त्यांचा स्वतःचा स्वभाव व बाहेरची परिस्थिती यांची कोंडी फोडून बाहेर पडणे त्यांना शक्य झाले नाही. योजना समितीचे उपाध्यक्षपद त्यांना लवकर मिळते तर सर्व साध्य झाले असते. परंतु ते त्यांना मिळाले नाही. त्यामुळे त्यांच्या मनातील द्वंद्व सतत चालू राहिले. त्यातून पुष्कळसा कडवटपणा निर्माण झाला. गोखले संस्थेच्या संचालकपदास ते चिकटून राहिले. १९६१ साली त्यांना साठ वर्षे पूर्ण झाली व संस्थेच्या नियमाप्रमाणे ते निवृत्त व्हावयाचे होते. परंतु आपल्यापुरते निवृत्तीचे वय ६५ असावे असे ठरवून घेऊन त्यांनी आपली मुदत आणखी पाच वर्षांनी वाढवून घेतली. कारण संचालकपद हा त्यांचा बालेकिल्ला होता. कोठूनही तेथे परत येऊन ते त्यांची दिल्ली-वरील स्वारी तेथून नेटाने चालवू शकत असत. परंतु दुर्दैवाने ही स्वारी यशस्वी होण्याची चिन्हे १९६० नंतर मुळीच दिसेनाशी झाली. अनुकूलतेची ओहोटी या काळात सुरू झाल्याचे पूर्वी उल्लेखिले आहे. ' आपली गरज संपली की काय ? ' असा कर्तृत्ववान् माणसाला भेडसावणारा प्रश्न त्यांना ग्रासू लागला. वाढवून घेतलेले निवृत्तीचे वयही हळूहळू संपत आले तरी दिल्लीवरील स्वारी यशस्वी होईना. तेव्हा निवृत्त झाल्या-वरही या बालेकिल्ल्याचा उपयोग आपल्याला पूर्वीसारखाच कसा करता येईल या दिशेने त्यांचे विचार वाहू लागले. ही गोष्ट पुष्कळशी त्यांच्या-नंतर त्यांच्या जागी येणाऱ्या व्यक्तीवर अवलंबून होती. त्यांचा शिक्षक-संशोधक-तज्ज्ञ भूमिकेपासूनचा वाढता संचार मला पसंत नव्हता व माझी नापसंती मी त्यांना अनेक वेळा स्पष्टपणे सांगितली होती. त्यामुळे मी त्या पदावर आल्यास त्यांचा हेतू साध्य होण्याचा संभव नव्हता. त्यामुळे

संस्थेचे सर्व कार्यक्रम तेव्हा होते तसेच चालू राहिले पाहिजेत अशी काही योजना माझ्याकडून मान्य करून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मी त्याला साफ नकार दिला. नवीन संचालकाला पूर्वीच्या धोरणाच्या मर्यादा असल्या तरी त्यात त्याने बदल, काटछाट, फिरवा-फिरव करताच कामा नये ही भूमिकाच अशुद्ध आहे असे मी त्यांना बजावले. तेव्हा " तुमचा कार्यक्रम तरी काय असेल ते मला लिहून द्या " असे त्यांनी मला वैतागून सांगितले. मी त्याप्रमाणे त्यांना माझा कार्यक्रम लिहून दिला.[1] त्यात त्यांना सोईच्या असलेल्या काही योजना हळूहळू बंद करण्याचा प्रस्ताव होता. त्यामुळे ते फारच भडकले व शेवटी " हा कार्यक्रम संस्थेवर अन्याय करणारा आहे म्हणून मी तुमची शिफारस संचालक-पदासाठी करू शकत नाही " असे त्यांनी मला सांगितले. ही गोष्ट मला मुळीच अनपेक्षित नव्हती. त्यापूर्वीच दोन वर्षे संयुक्त संचालकपदाचा राजीनामा देण्याचा मी प्रयत्न केला होता व " संचालकपदाचा मोह मला नाही " असे तेव्हा व त्यानंतर गाडगीळांना मी अनेक वेळा सांगितले होते. मी लगेच राजीनामा देऊन त्यांचा मार्ग मोकळा करून दिला.

परंतु त्यांची मनःस्थिती किती तीव्र झाली होती याचे उदाहरण पुढे घडले. संस्थेच्या व्यवस्थापन मंडळास माझी नेमणूक न करण्याचा गाडगीळांचा प्रस्ताव मान्य होईना. त्याला त्यांचा खूपच विरोध आहे असे दिसू लागले. मला नेमावे असाही सूर निघू लागला. तेव्हा

१. हे टिपणवजा पत्र मीच आपणहून देऊन त्यांना लेखी तीव्र विरोध केला अशी गाडगीळांनी पुढे आपली सोईस्कर समजूत करून घेतली ( पुढे दिलेले पत्र पहा ). वास्तविक तसे मुळीच नव्हते. कारण त्या पत्राची पहिली चार वाक्ये अशी होती.

9·10·64

" Dear Professor Gadgil,

This is a personal memorandum for you only. I am writing it at your insistence and not on my own initiative. It is necessarily brief and does not go into pros and cons. This is how I will run the Institute if I *have* to. "

गाडगीळ बेभान झाले आणि म्हणाले, " Don't beat about the bush. You want to appoint Sovani. If you do so my path is clear. I will publicly disassociate myself from the Institute and retire from tomorrow. " ( व्यवस्थापन मंडळाला असे बजावण्यात आपण मर्यादातिक्रम करीत आहोत याची गाडगीळांना जाणीव होती व त्यासंबंधी दिलगिरीचे पत्र त्यांनी दुसऱ्या दिवशी पं. कुंझरूंना लिहिले. ते दप्तरी दाखल आहे. ) हा कडवटपणा कोणत्या मन:स्थितीतून निर्माण झाला होता याचे वर्णन वर केले आहे. आता या घटना आठवल्या व गाळगीळांच्या एकंदर वर्तनाचा व मन:स्थितीचा विचार केला म्हणजे अनुकंपेची भावना निर्माण होते. जगातील व्यवहार-दुष्टता किती परिस्थितीजन्य असते हे लक्षात येते. ग्रीक किंवा शेक्स-पियरच्या दु:खकारक नाटकांतून नायकांचे पतन त्यांच्या उदात्त व भव्य मन:प्रवृत्तीतूनच अटळपणे होते तसाच काहीसा प्रकार येथे दिसतो.

वरील घटनांबद्दल हा मजकूर लिहिताना माझ्या मनात गाडगीळांच्या-बद्दल यत्किंचितही कडवटपणा नाही. कारण या घटनेनंतर ४ वर्षांनी मला गोखले संस्थेच्या संचालकत्वाची सूत्रे घेण्याबद्दल विनंती करणारे पत्र त्यांनी लिहिले त्यात स्वत:ची चूक त्यांनी कबूल केली व मनाच्या या मोठेपणाने माझ्या मनातील सर्व किल्मिष दूर केले. ते पत्र पुढे देत आहे. परंतु त्याची थोडी पार्श्वभूमी प्रथम सांगितली पाहिजे.

मी १९६६ साली मार्च महिन्यात गोखले संस्थेतून निवृत्त होऊन जिनिव्हास गेलो. दांडेकर गाडगीळांच्या निवृत्तीनंतर १ एप्रिल १९६६ पासून संस्थेचे संचालक झाले. १९६८ साली जून महिन्यात व्यवस्थापन मंडळाशी मतभेद होऊन दांडेकरांनी आपल्या जागेचा राजीनामा दिला. त्यानंतर त्यांच्या जागी कोणास नेमावे असा शोध चालू झाला. दांडेकरांनी ' तुम्हाला अवघड वाटत असेल तर मी सोवनींना पत्र लिहून बोलावतो ' असे व्यवस्थापन मंडळाला सुचविले. त्या वेळी माझ्या नावाला गाडगीळांनी विरोध केला व ती जागा माथुर यांना दिली. पुढे माथुर यांनी काय केले हे जाहीरच आहे, तेव्हा त्याची द्विरुक्ती नको. १९६९ च्या जून

मध्ये संस्थेच्या व्यवस्थापन मंडळातील श्री. काकडे यांनी मला जिनिव्हास पत्र लिहिले की, 'तुम्ही सप्टेंबरमध्ये हिंदुस्थानास परत येणार असे समजते तर तुम्ही गोखले संस्थेत परत याल का ?' मी त्यांना लिहिले की, 'मला संस्थेत परत यावयास आनंद होईल. परंतु मी संचालक म्हणूनच येऊ शकेन व व्यवस्थापन मंडळाने एकमताने मला तसे आमंत्रण देऊन बोलावले तरच येईन. परंतु अशा प्रस्तावाला गाडगीळांचा विरोध होईल व मग असा प्रस्ताव तुम्ही अगर व्यवस्थापन मंडळ मान्य करील की नाही याबद्दल मला जबरदस्त शंका आहे.' हे पत्र गाडगीळांना काकडे यांनी दाखविल्यावर पुढे दिलेले पत्र गाडगीळांनी मला लिहिले.

१६, तुघलग रोड,<br>
नवी दिल्ली<br>
२३ । ६ । ६९.

स. न. वि. वि.

गेल्या आठवड्यात मी पुण्यास गेलो होतो. तेव्हा गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या पुढील व्यवस्थापनेबद्दल चर्चा करावी लागली. चि. सौ. प्रमिलाने व्यवस्थापक मंडळाचा राजीनामा दिल्यामुळे मला ती जागा पत्करावी लागली व अधिकारतः चर्चेत भाग घ्यावा लागला. गेल्या सहा सात महिन्यांत प्रा. माथुर यांना संचालकपद अगदीच सांभाळता आले नाही. अंतर्गत व्यवस्थापन समितीतील ५ पैकी ४ सभासदांनी राजीनामे दिले. डॉ. काकडे अतोनात नाखूष झाले. असा पेच प्रसंग निर्माण झाला होता. यातून सर्वोत्तम मार्ग म्हणजे आपण संचालक म्हणून येऊ शकल्यास ते पद आपणावर सोपवावे असे काकडे यांचे म्हणणे होते. कुंझरूंनाही ते मान्य दिसले. या प्रश्नावर बोर्डात खुली चर्चा होऊ शकली नाही. कारण आपले म्हणणे नक्की कळल्या-शिवाय ठराव करता आला नसता. शिवाय आपण तीन महिने उपलब्ध नसल्यामुळे आताच या गोष्टीची वाच्यता करणे अनिष्ट

होते. तेव्हा हा प्रश्न पंडित कुंझरू व मी या दोहोंवर सोपविला व आमच्यात चर्चा होऊन पंडित कुंझरूंनी काकडे यांस आपणास लिहिण्यास सांगावे असे ठरले. ते पत्र आपणाकडे येईलच.

मी हे पत्र लिहिण्याचे कारण की डॉ. काकडे यांच्या पत्रात गोखले अर्थशास्त्र संस्थेकडून बोलावणे एकमताने आले तरच आपण विचार कराल असा मजकूर होता. विशेषतः माझ्या संमती-बद्दल निराळा उल्लेख होता. काकडे यांस माझी संमती मी कळविली, पण पूर्वेतिहास पाहता अधिक तपशीलवार स्वतःच लिहावे हे इष्ट वाटले. माझी संमती मी अगतिक होऊन नाखुषीने देत आहे असेही आपणास वाटू नये म्हणून विस्ताराने लिहीत आहे.

आपण संस्थेत कायम राहण्याचे ठरविल्यापासून १९६५ सालपर्यंत आपणाखेरीज अन्य कोणी माझ्या पश्चात संचालक होईल हे मी मनातच आणले नव्हते. आपण जे पत्र लिहून दिले त्यातून पुढील घटना उद्भवल्या. तेव्हा व्यक्तिशः आपण संचालक होण्यास पूर्ण योग्य याबद्दल माझ्या मनात शंका कधीच नव्हती, आताही नाही. मतभेद फक्त पुढील धोरणाबद्दल तोही अगदी तीव्रतेने लेखी केल्यामुळे मला फेरविचार करावा लागला. निदान त्या वेळी तरी तसे वाटले. आज आपण संचालक झाल्यास त्या घटनेचे मी स्वागत करीन असे म्हणताना पुढील धोरणाबद्दल काही लिहिणे अपरिहार्य आहे. माझी आजची भूमिका अशी आहे. गेल्या तीन वर्षांत अनेक महत्त्वाच्या स्थानी माझ्यानंतर कोण याविषयी मला विचार करावा लागला व सल्ला द्यावा लागला. याबाबत तदनंतरच्या घटना पाहता नवीन स्थानापन्न व्यक्ती काय धोरण आखते त्यापेक्षा तिची वृत्ती व कार्यपद्धती काय हेच खरे महत्त्वाचे हे स्पष्ट झाले आहे. धोरणे ही परिस्थितिजन्य असतात. असावी लागतात. त्याविषयी फार लांबचे कयास बांधण्यात अर्थ नाही हेही पटले. म्हणजे धोरणाविषयींचा आग्रह आता माझा पूर्वीहूनही कमी झाला. दुसरे असे की आपणा-

सही आता इतर संस्थांचा अनुभव आला आहे व पूर्वीचे पत्र लिहून चार वर्षे झाली. तेव्हा आपणही काही दुराग्रहाने, घाईने करणार नाही ही खात्री वाटते. उलट पक्षी संस्थेतील जुन्या माणसास बरोबर घेऊन चालणे, मोकळ्या चर्चात्मक अभ्यासक वृत्तीची जोपासना करणे, संस्थेचा नावलौकिक व आब राखणे हे आपणास जेवढे साधेल तेवढे इतर कोणासही नाही हे मला माहीत आहे. तेव्हा या वेळेस आपण उपलब्ध असणे हा संस्थेच्या दृष्टीने मी सुयोग समजतो.

वर लिहिल्याप्रमाणे तात्रडतोब काही ठराव करणे व्यवस्थापक मंडळास अनेक दृष्टींनी गैरसोईचे आहे. तेव्हा आपण हिंदुस्थानात आल्यावर संस्थेची सद्यःस्थिती अवलोकून आपणास उपसंचालक कोण हवे वगैरे निर्णय घेऊन व्यवस्थापक मंडळाबरोबर विचार-विनिमय करावा. मग लगेच जाहीर रीतीने ठराव निश्चित करता येईल.

सौ. शैलाताईस नमस्कार सांगावा.

कळावे लो. अ. हे विनंती.

आ.

ध. रा. गाडगीळ

या पत्राप्रमाणे मी परत हिंदुस्थानास आलो परंतु मला संचालकपद देण्याची गाळगीळांची इच्छा सफळ झाली नाही. प्रा. माथुर यांनी न्यायालयाचा मार्ग धरला व पुष्कळच घोटाळे खटले-खोकले निर्माण केले. या जंजाळातून व्यवस्थापन मंडळास मला संचालकपद देण्याचा ठराव केव्हा कार्यवाहीत आणता येईल यासंबंधी काहीच ठरविता येईना. कामाशिवाय, पगाराशिवाय, मीही किती दिवस नुसतेच थांबावयाचे यालाही काही सीमा होत्या. त्याच सुमारास मला बँकॉकच्या नोकरी-संबंधी विचारणा करण्यात आली. तीन महिनेपर्यंत मी त्यास काहीच उत्तर दिले नाही. परंतु जेव्हा वरीलप्रमाणे परिस्थिती केव्हा निवळेल हे अनिश्चित दिसू लागले तेव्हा मी ही नोकरी स्वीकारण्यासाठी गाडगीळांची

परवानगी मागितली. अत्यंत अनिच्छेने व नाइलाज म्हणून त्यांनी ती दिली व मी एक वर्षाच्या संपूर्ण बेकारीनंतर व विनाकारण झालेल्या मनःस्तापानंतर बँकॉकला गेलो. १९७० च्या नोव्हेंबरात गाडगीळांना भेटल्याचा उल्लेख आरंभीच केला आहे.

गाडगीळांच्याच परंपरेतील काहीशा परखड अशा या समीक्षेतूनसुद्धा गाडगीळांचे भव्य व्यक्तिमत्त्व आणि मोठेपण प्रकर्षाने उठून दिसते. त्यांनी अंगीकारलेले देशसेवेचे जाज्वल्य व्रत, वैयक्तिक स्वार्थाचा संपूर्ण अभाव, स्वसुखाविषयी कमालीची निरभिलाषा, दृष्ट लागावी असे बुद्धिवैभव, अकलंकित चारित्र्य हे सर्व या समीक्षेत तावूनसुलाखून अधिकच तेजाने उसळून येतात. यापैकी एक एक गुणसुद्धा हल्ली इतका दुर्मिळ झाला आहे की त्या सर्वांचा समुच्चय असलेले गाडगीळांच्यासारखे पुरुष किती विरळा असतात याची तीव्र जाणीव होते व मन आदराने भरून येते. " आदर्शः शिक्षितानां सुचरित निकषः शीलवेलासमुद्रः " हे शूद्रकाने केलेले वर्णन गाडगीळांना सर्व अर्थाने लागू पडते.

परस्पर विरोधी अशा पंडित आणि क्रियावान या दोन्ही भूमिका त्यांनी इतक्या सव्यसाचीपणाने हाताळल्या की दोन्ही कार्यक्षेत्रांत कामाचे ढीग पाडले. यापैकी एकच भूमिका जन्मभर करणाऱ्या किती लोकांनी एकाच क्षेत्रात त्यांनी केले तेवढ्याच्या निम्मे तरी काम केले आहे का ? असा प्रश्न विचारल्यास त्याचे नकारात्मकच उत्तर द्यावे लागेल. यापकी एकाच भूमिकेवर ते स्थिर राहिले असते तर त्या क्षेत्रात त्यांनी केले त्याहून किती तरी मोठे व मौलिक काम केले असते ! परंतु असे झाले असते तर सुवर्णाला केशराचा वास आला असता ! तसे झाले नाही म्हणून सुवर्णाचे सुवर्णपण कमी होत नाही. उत्तमोत्तम नसले तरी उत्तम ते उत्तमच. गाडगीळांच्यासारख्या व्यक्तीशी माझा दीर्घकाळ संबंध आला, ते मला गुरुस्थानी लाभले हे मी माझे भाग्य समजतो. त्यांचे माझ्यावरील ऋण फिटण्यासारखे नाही आणि ते मला फेडावयाचेही नाही तर जन्मभर जवळ बाळगावयाचे आहे. त्यांच्या स्मृतीला माझे शतप्रणाम !

बँकॉक, नोव्हेंबर १९७१

# भाग दुसरा

# विचार

अर्थशास्त्रज्ञ म्हणून गाडगीळांचे मूल्यमापन केल्याशिवाय त्यांच्या जीवनाचे मूल्यमापन पुरे होणार नाही. परंतु ते करावयाचे तर बरेच विस्तृत प्रमाणावर करावे लागेल. त्यांनी केलेले सर्व लिखाण कालवार व विषयवार विचारात घेऊन त्यांचे मूळ विचार काय होते, त्यांचा विकास कसा झाला व त्यांचे परिणत स्वरूप कसे होते याचा तपशीलवार व साकल्याने विचार करून त्यांनी अर्थशास्त्रीय विचारात कोणती भर टाकली याचे विवेचन केले पाहिजे. परंतु हा सर्व खटाटोप १००–१५० छापील पानांइतका सहज विस्तारेल. इतका विस्तार येथे करणे शक्य नाही व इष्टही नाही. कारण अशा प्रकारची मीमांसा अर्थशास्त्रीय विचारांचा विशेष अभ्यास करण्यास किंवा अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांस जरी उपयोगी असली तरी सर्वसामान्य वाचकास त्यात रस वाटेलच असे नाही. गाडगीळांचे अर्थशास्त्रज्ञ म्हणून मूल्यमापन न केले तर त्यांच्या जीवनाचे मूल्यमापन अपुरे व तोकडे होते. ते समाधानकारक रीतीने करावयाचे तर त्याचाच एक स्वतंत्र ग्रंथ होतो अशी ही श्रृंगापत्ती आहे. यातून सर्वांत कमी असमाधानकारक मार्ग म्हणजे त्यांनी अर्थशास्त्रीय विचारात स्वतःची अशी काय भर घातली या सर्वसामान्य वाचकाच्या जिज्ञासेवर लक्ष केंद्रित करून त्या अनुषंगाने थोडक्यात गाडगीळांचे अर्थशास्त्रज्ञ म्हणून मूल्यमापन करावयाचे. माझा प्रयत्न या दिशेने आहे.

परंतु अशा रीतीने जरी हा प्रश्न सोडवावयाचा म्हटला तरीसुद्धा थोडा विस्तार करणे टाळता येण्यासारखे नाही. कारण अर्थशास्त्रीय विचारात भर टाकणे म्हणजे काय करणे यासंबंधी हिंदी विचारवंतांच्या व अर्थशास्त्रज्ञांच्या मनात बरेच गैरसमज आहेत. त्यातले काही त्यांच्या न्यूनगंडातून निर्माण झालेले तर काही ज्ञानशास्त्राच्या ( Epistimology ) अज्ञानातून निर्माण झालेले ! तेव्हा त्यांचे थोडेबहुत निराकरण व मीमांसा प्रथम पायाभरणीसाठी केल्याशिवाय गाडगीळांनी अर्थशास्त्रीय विचारात जी भर टाकली त्याचे स्वरूप मूर्त करता येणार नाही. म्हणून या चर्चेस अर्थ-शास्त्रीय विचारांचे स्वरूप, त्यांच्या विकासाचे मार्ग, त्यांची स्फूर्ती यापासून सुरुवात केली पाहिजे.

अर्थशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र आहे. नैसर्गिक शास्त्रांप्रमाणे सामाजिक शास्त्रांतील सिद्धान्त स्थलकालांच्या मर्यादा ओलांडू शकत नाहीत. गुरुत्वाकर्षणासारखे सर्व जगभर लागू होणारे व अनंतकाळ चालू असणारे सिद्धान्त सामाजिक शास्त्रे सांगू शकत नाहीत. सामाजिक शास्त्रात शास्त्रशुद्ध प्रयोग करण्याची शक्यता नसते व पूर्वीच्या अगर सध्याच्या परिस्थितीच्या निरीक्षणावरच सर्वस्वी अवलंबून रहावे लागते. अशा निरीक्षणातून निर्माण होणारी माहिती निरीक्षकांच्या वैयक्तिक दृष्टिकोनातून निर्माण होणाऱ्या दोषांपासून अलिप्त असू शकत नाही. सामाजिक शास्त्रांच्या या मर्यादा अर्थशास्त्रासही लागू आहेत.

अर्थशास्त्राचे सिद्धान्त हे अर्थशास्त्रज्ञांच्या सभोवतालच्या परिस्थितीतून उत्पन्न झालेल्या प्रश्नांचा विचार करताना उत्पन्न होतात व झाले आहेत हे अर्थशास्त्रीय विचारांच्या इतिहासावरून स्पष्ट आहे. म्हणूनच ते स्थळकाळपरिस्थितीसापेक्ष असतात. एकाच वेळी सर्व जगातील समाजांना लागू पडेल असा सिद्धान्त अर्थशास्त्र सांगू शकत नाही. सभोवतालच्या परिस्थितीचे व त्यातून निघणाऱ्या प्रश्नांचे अन्वेषण करण्यास उपयोगी अशा संकल्पना व त्यावर आधारलेली संस्कारित ज्ञापके यांच्या आधारावर अर्थशास्त्रीय सिद्धान्त उभारले जातात. अशा संलग्न सिद्धान्तांच्या जुळणी-तून सिद्धान्तन निर्माण होते. अर्थशास्त्रातील प्रचलित सिद्धान्तन हे इंग्लंड,

युरोप, अमेरिका वगैरे आर्थिकदृष्टया आज प्रगत असलेल्या समाजांच्या परिस्थितीस सापेक्ष व अनुरूप असे निर्माण झालेले आहे. आजचे हे प्रचलित सिद्धान्तन पूर्वीच्या सिद्धान्तनातून विकसत, सुधारत, काही टाकीत व काही नवीन जोडीत सिद्ध झालेले आहे. अशा प्रकारचे कोणतेही सिद्धान्तन १००–१५० वर्षे वर्धिष्णू राहिले म्हणजे त्याची परिभाषा, संकल्पना, ज्ञापके, सिद्धान्त यांना एक प्रकारचे तार्किक शरीर अगर व्यवस्था प्राप्त होते. त्यामुळे त्याचा विस्तार, विकास, सुधारणा ही नवीन परिस्थितिजन्य प्रश्नांवरच अवलंबून न राहता त्याच्या शरीरगुणामुळे निव्वळ शास्त्रीय संश्लेषण व तार्किक अगर गणिती अन्वेषणामुळेही होऊ शकतात. प्रचलित सिद्धान्तनाच्या विकासाचा हा मुख्यतः जिज्ञासेवर आधारलेला स्वयंचलित व बुद्धिगम्य असा आणखी एक मार्ग बनतो. प्रचलित सिद्धान्तनातील गृहीत कृत्याऐवजी दुसरी काल्पनिक गृहीतकृत्ये घेऊन, नवीन प्रतिमाने उभारून, पूर्वीच्या सिद्धान्तनांची तार्किक व गणिती सुसंगती तपासून या मार्गाने प्रचलित सिद्धान्तनाची व्याप्ती वाढवून ते अधिक घोटीव करण्याचा यात यत्न होतो. ही खटपट बहुधा निगमनात्मक असते व पुष्कळ वेळा असे निगमन पूर्णपणे गणितीही असते. परंतु विगमनात्मक खटपटीचाही यासाठी अवलंब केला जातो. निगमनाने प्राप्त झालेले सिद्धान्त आकडेवार माहितीच्या आधारे तपासून घेणे व ते त्या कसोटीस उतरत नसल्यास कोणती सुधारणा आवश्यक आहे हे सुचविणे याचाही यात समावेश आहे. पुष्कळ वेळा आकडेवार माहितीच्या विश्लेषणातून कोणते सिद्धान्त दृष्टिगोचर होतात अशा प्रकारचेही याचे स्वरूप असू शकते. निगमन व विगमन या दोन्ही पद्धतींनी अर्थशास्त्रीय सिद्धान्तनाचा विकास झालेला आहे.

सिद्धान्तन ( Theory ) या संज्ञेचा एकच एक अर्थ नसल्यामुळे त्यासंबंधीही थोडा प्रपंच केला पाहिजे. काही गृहीत कृत्यावर आधारलेली किंवा त्यापासून तार्किक ( निगमन ) पद्धतीने निघणारी सिद्धान्ताची संपृक्त रचना अशी सिद्धान्तनाची एक व्याख्या आहे. पुष्कळ वेळा सिद्धान्तनाने एखाद्या परिस्थितीचा उलगडा करणारा उपन्यास ( Explanatory hypo-

thesis ) अथवा स्पष्टीकरणार्थ उपकल्पना दर्शविलेली असते. प्रत्यक्ष परिस्थितीचे संस्कारित प्रतिमान (Model) असेही सिद्धान्तनाचे एक स्वरूप प्रसिद्ध आहे. आर्थिक प्रवृत्तींसंबंधीचे विधान किंवा विधाने असेही सिद्धान्तनाचे स्वरूप सांगितले जाते. सिद्धान्तन म्हणजे दुसरे तिसरे काही नसून कोणत्याही परिस्थितीचे जास्त मूलगामी वर्णन असे सॅम्युएलसन यांनी म्हटले आहे. सिद्धान्तनाच्या या निरनिराळ्या व्याख्यांची चर्चा करून त्यातील चूक वा बरोबर कोणती याचे दिग्दर्शन करण्यास येथे अवकाश नाही. त्यांचा येथे निर्देश करण्याचे कारण इतकेच की सिद्धान्तन ही संज्ञा निरनिराळ्या अर्थाने वापरली जाते व ती वापरताना वरीलपैकी कोणती व्याख्या वापरणारास अभिप्रेत आहे हे लक्षात घेतल्याशिवाय त्याच्या विधानाचा नीट अर्थ समजणे शक्य नसते.

अर्थशास्त्रीय सिद्धान्तनाचे हे स्वरूप लक्षात घेतले म्हणजे प्रचलित अर्थशास्त्रीय सिद्धान्तनाच्या मर्यादा स्पष्टपणे ध्यानात येतात. आर्थिक दृष्ट्या प्रगत असलेल्या भिन्न संस्कृतीय समाजास अनुरूप असणारे प्रचलित सिद्धान्तन अप्रगत व विविध संस्कृतीतील समाजांना तितकेसे अनुरूप नसते. त्यामुळे अशा समाजांसाठी प्रचलित अर्थसिद्धान्ताहून पुष्कळ अंशी वेगळे असे सिद्धान्तन अनुरूप ठरेल हेही निराळे सांगावयास नको. याच दृष्टीने गेल्या शतकाच्या शेवटच्या दशकात न्या. रानडे यांनी एका स्वतंत्र निबंधात निराळ्या " हिंदी अर्थशास्त्राची " का व कशी जरुरी आहे याचे विवेचन केले होते. त्यांचा रोख मुख्यतः ब्रिटिश सरकारच्या खुल्या अर्थव्यवहाराच्या आर्थिक धोरणावर होता. ज्या अर्थशास्त्रीय तत्त्वांवर हे धोरण ठरविले जात होते ती तत्त्वे इंग्लंडमधील परिस्थितीत जन्मास आलेल्या अर्थशास्त्रात उद्भवली आहेत. इंग्लंड व हिंदुस्थान यांच्या एकंदर सामाजिक व आर्थिक परिस्थितीत जमीन-अस्मानाचा फरक असल्यामुळे ही तत्त्वे हिंदुस्थानला लागू करणे बरोबर नाही. हिंदुस्थानची परिस्थिती युरोपखंडातील व अमेरिकेसारख्या त्या वेळी इंग्लंडच्या मानाने कमी प्रगत असलेल्या देशांशी जास्त जुळती आहे व या देशातून ज्या-प्रमाणे सरकारे खुल्या अर्थव्यवहाराचे धोरण न स्वीकारता जास्त करणा-

त्मक आर्थिक धोरणे स्वीकारतात तसे हिंदुस्थानात केले पाहिजे असे रानड्यांनी प्रतिपादिले. परंतु हिंदुस्थानच्या आर्थिक बाबतीत असा निराळा विचार हा त्यांच्या मते संक्रमणकाळातच करावयाचा होता. सध्याच्या स्थितीतून इंग्लंडसारख्या आर्थिक-सामाजिक स्थितीत संक्रमण पूर्ण झाले म्हणजे इंग्लंडप्रमाणेच येथेही खुल्या अर्थव्यवहाराचे धोरण स्वीकारावयास लागेल. हे संक्रमण सध्या होत आहे व ते होणे योग्य आहे. ते जास्त वेगाने होण्यासाठी सरकारने करणात्मक धोरण स्वीकारले पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. यावरून त्यांची हिंदी अर्थशास्त्राची कल्पना मर्यादित स्वरूपाची होती हे लक्षात येईल. आपणास हिंदुस्थानसाठी सर्वस्वी स्वतंत्र अर्थशास्त्रच निर्माण करावयाचे आहे येथपर्यंत न्या. रानडे गेलेले नाहीत.

परंतु डॉ. केतकरांनी तसा विचार पहिल्या महायुद्धाच्या काळात प्रथम व पुढेही मांडला.[1] हिंदुस्थानातील सामाजिक परिस्थिती इतकी निराळी आहे की तिच्या स्थितीचे आणि गतीचे नियम इतर समाजाच्या पेक्षा व अर्थातच प्रचलित अर्थशास्त्रात सांगितल्यापेक्षा सर्वस्वी निराळेच असणार अशी रोखठोक भूमिका त्यांनी घेतली. उदाहरणार्थ, आमची जातिव्यवस्था. जातिव्यवस्थेमुळे श्रमविभागाचे तत्त्व आमच्या समाजात अंमलात येत नाही. कारण आर्थिक उत्पादनासाठी बुद्धी, श्रम व भांडवल ही एकत्र यावी लागतात. परंतु आमच्याकडे बुद्धी ब्राह्मणांजवळ, भांडवल गुजर-मारवाड्यांकडे व श्रम शूद्रांकडे अशी व्यवस्था आहे व त्यांचे एकत्र येणे जातिव्यवस्थेमुळे घडतच नाही. या व अशा प्रकारच्या अनेक सामाजिक बंधनांमुळे पाश्चात्त्य अर्थसिद्धान्त आमच्या समाजास कसे लागू होणार ? आमचे नियम निराळे व स्वतंत्रच असणार. म्हणूनच स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्राची उभारणी करण्याची आवश्यकता आहे व तसे झाल्या-

1. S. V. Ketkar, An Essay on Indian Economics and its relation to social, psychic, political and linguistic conditions in India, and on the laws of economic evolution, and on the acceptability of socialistic measures and the future outlook, Thacker, Spink and Co., Calcatta, 1914.

खेरीज आपणास फलदायी असे आर्थिक धोरणही आपल्याला ठरविता येणार नाही.

केतकरांनी घेतलेली ही आग्रही भूमिका दुसऱ्या कोणी घेतली नाही. किंबहुना हिंदी अर्थशास्त्रज्ञांच्या विचाराचा ओघ उलट्या दिशेनेच वाहिला व पूर्वीच्या रानड्यांच्या भूमिकेशीही थोडा फार विरोधीच राहिला. रानड्यांच्या नंतर प्रो. काळे यांनी त्यांचा वारसा पुढे चालविला. परंतु पहिल्या महायुद्धाच्या काळानंतर रानडे यांच्या भूमिकेबद्दलही पुष्कळांनी साशंकता व्यक्त करण्यास सुरुवात केली. इंग्लंडपेक्षा हिंदुस्थानातील परिस्थिती निराळी आहे असे जरी रानड्यांनी १८९२ साली म्हटले तरी तेव्हापासून पुष्कळच बदल हिंदुस्थानात झाले आहेत व महायुद्धानंतर ते आणखी झपाट्याने होत आहेत. तेव्हा आता प्रचलित अर्थशास्त्राहून निराळा विचार करण्याची तितकीशी गरज नाही असे विचार पाणंदीकर सप्रे, भाटनगर वगैरे अर्थशास्त्रज्ञांनी मांडलेले आढळतात. स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्राची गरज तर नाहीच, परंतु आता हिंदुस्थानातील व इंग्लंड-युरोपमधील आर्थिक परिस्थितीत फारसा फरक राहिलेला नसल्यामुळे प्रचलित अर्थशास्त्रीय मीमांसाच हिंदुस्थानातील समस्यांना लागू करता येतात; हिंदी अर्थशास्त्र म्हणजे हिंदी आर्थिक प्रश्नांचा अभ्यास एवढाच मर्यादित अर्थ घ्यावा असा या सर्व लिखाणाचा सूर आहे. आपले शिक्षण संपवून गाडगीळ हिंदुस्थानात परत आले त्या वेळी त्यांचे विचार असेच होते. यासंबंधात स्वतः गाडगीळांचे विचार काय होते व ते कसे बदलले हे सुदैवाने सांगणे शक्य आहे. त्यांच्या अर्थशास्त्रीय कामगिरीच्या मूल्य-मापनासही त्यांचा उपयोग असल्यामुळे या काहीशा तात्त्विक चर्चेत त्यांचा थोडा विस्ताराने परामर्श घेणे जरूर आहे.

डॉ. श्री. व्यं. केतकरांनी ‘ स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्राची आवश्यकता ’ या विषयावर आपले मत ठासून ‘ महाराष्ट्रीय ज्ञानकोशात ’[१] मांडले.

---

१. महाराष्ट्रीय ज्ञानकोश, विभाग ७ वा, १९२४, पृ. अ ४६३–४७३.

त्यावर प्रतिक्रिया म्हणून त्या वेळी (१९२४) गाडगीळांनी 'विद्यासेवक'[१] या ज्ञानकोश मंडळाने चालविलेल्या मासिकात लेख लिहिला. यात ते लिहितात : "स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्र उत्पन्न करण्याची बिलकुल जरुरी नाही. इतकेच नव्हे तर अशा प्रकारच्या संज्ञेनेच फार चुकीच्या समजुती पसरण्याचा संभव आहे. उगीच अवांतर बऱ्याचशा गोष्टींचा विचार करून मुख्य अर्थशास्त्राची कक्षा विसरून चालावयाचे नाही. आणि हिंदी अर्थशास्त्र स्वतंत्र तयार करून आमच्या आर्थिक रचनेत काही विशेष आहे असा समज उत्पन्न करणेही योग्य नाही. व्यावहारिक दृष्टीने अर्थशास्त्राचा विचार करणे बरोबर आहे आणि हिंदुस्थानातील एकंदर परिस्थितीचा विचार करूनच नंतर अर्थशास्त्राचे विचार लागू करावे. पण यास हिंदी अर्थशास्त्र असे स्वतंत्र शास्त्र निर्माण करण्याची जरुरी नाही."

"आपल्या सामाजिक परिस्थितीत व युरोपीय परिस्थितीत फरक बराच आहे हे खरे, पण हा फरक आर्थिक बाबतीत फार महत्त्वाचा नाही. आर्थिक प्रगती अथवा आर्थिक स्थित्यंतरे केवळ भौगोलिक अगर नैसर्गिक कारणावरच अवलंबून नसतात. पण आजच्या आपल्या परिस्थितीत आपल्या सामाजिक रचनेमुळे उत्पन्न झालेले अडथळे फारसे महत्त्वाचे नाहीत; त्यांनी अर्थशास्त्रीय सिद्धान्तांच्या क्रियेतील घर्पण फार तर थोडेसे वाढेल इतकेच आमचे म्हणणे आहे."

या दोन उताऱ्यांतील गाडगीळांचे विचार त्यांच्या पिढीतील त्या वेळच्या तरुण अर्थशास्त्रज्ञांचे प्रातिनिधिक असे होते. आजही हिंदुस्थानातील व अप्रगत देशातील अर्थशास्त्राच्या अभ्यासकांत या विचाराची माणसे पुष्कळ निघतील. स्वतः गाडगीळ मात्र या विचारात अडकून राहिले नाहीत. 'विद्यासेवकात' वरील लेख लिहिल्यानंतर १८ वर्षांनी

१. ध. रा. गाडगीळ, "स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्राची आवश्यकता," विद्यासेवक. हा लेख श्री. व्यं. केतकर, **माझे बारा वर्षांचे काम ऊर्फ ज्ञानकोश मंडळाचा इतिहास**, पुणे, १९२७ या पुस्तकात परिशिष्ट नं. १५ म्हणून पुनर्मुद्रित केला आहे. येथे त्या पुस्तकातील पृष्ठ संख्या दिली आहे. पृ. ८१–९१.

त्यांनी न्या. रानडे यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने 'हिंदी अर्थशास्त्राचा पाया' या मथळ्याच्या 'सह्याद्री'[१] मध्ये प्रसिद्ध केलेल्या लेखात या विषयावरची आपली परिणत मते मांडली. या लेखात त्यांनी लिहिले : "येथे एक गोष्ट प्रांजलपणे नमूद करणे आवश्यक आहे. प्रस्तुत लेखक जेव्हा सुमारे १८ वर्षांपूर्वी विलायती पदवी संपादून हिंदुस्थानास परत आला त्या वेळी त्याचे विचार भिन्न होते; त्यामुळे त्यांनी (डॉ. केतकरांनी) 'ज्ञानकोशात' स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्र स्थापण्याची आवश्यकता प्रतिपादिली असता तीस 'विद्यासेवकात' आपला मराठीतील पहिला लेख लिहून त्याने कसून विरोध केला. आज मात्र त्याचे विचार स्वतःच्या जुन्या लेखापेक्षा डॉ. केतकरांशीच जास्त जुळते आहेत."

याच लेखात या विषयावरचे आपले परिणत विचार जास्त विस्ताराने मांडताना ते म्हणतात : "....मनुष्याचे विचार हे त्याची परिस्थिती, पूर्वग्रह व त्याचे हितसंबंध यांच्याशी निगडित असतात....विचारवंतांची भूमिका ही परिस्थितीजन्य असते व त्यांच्या विचारांचा रोख हा त्यांच्या भोवतालच्या घडामोडींवरून बहुतांशी ठरतो....यांत्रिक युगाच्या परिणामाविषयी जी मीमांसा युरोपीय अर्थशास्त्रज्ञांनी केली तिचा इतिहास या दृष्टीने फार उद्बोधक आहे. यांत्रिक युगाच्या अगदी सुरुवातीस यांत्रिक उत्पादनामुळे जुन्या कारागिरीच्या धंद्यांवर अनिष्ट परिणाम घडून बेकारी व असंतोष यांची काही चिन्हे दिसली; परंतु थोड्याच काळात यांत्रिक उत्पादनाच्या खपाची मर्यादा जशी जगभर वाढू लागली तसतसे या अनिष्ट परिणामाऐवजी वाढते उद्योग व वाढती मजुरी हीच जास्त ठळकपणे डोळ्यांत भरू लागली. त्यामुळे जरी प्रारंभी प्रत्येक युरोपीय देशात अर्थशास्त्रज्ञांनी यांत्रिक उत्पादनाच्या प्रसाराच्या अनिष्ट परिणामाकडे लक्ष दिले तरी शेवटी सर्वांचा भर त्याचे हितावह परिणाम काय झाले याजवरच मुख्यतः राहिला. यांत्रिक उत्पादनाच्या प्रसाराचे अनिष्ट परिणाम पुढारलेल्या औद्योगिक देशात फार थोडा काळ आणि अत्यल्प प्रमाणात

---

१. ध. रा. गाडगीळ "हिंदी अर्थशास्त्राचा पाया" सह्याद्रि, जानेवारी १९४२.

भासल्यामुळे संक्रमणावस्थेतील परिस्थितीचा विचार फारसा महत्त्वाचा नाही असेच सर्व अर्थशास्त्रज्ञांनी मानले. यांत्रिक उत्पादनाने बेकारी होतच नाही; झाली तरी ती तात्पुरती असते आणि तिच्या बरोबर उद्योगधंद्यांची वाढ फार होते असे सिद्धान्त इंग्लंड, जर्मनी, अमेरिका या देशांतून मांडले गेल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. कारण तेथील परिस्थिती व सिद्धान्त यात विशेष विरोध दिसून येत नव्हता. पण त्याच्या उलट एखाद्या हिंदी अर्थशास्त्रज्ञाने जर या प्रश्नाचा विचार केला तर त्यास अनिष्ट परिणामच प्रामुख्याने दिसतील व संक्रमणावस्था ही अल्पकालीन नसून आपल्या देशापुरती तरी निदान कायमची आहे की काय असा भास होईल. तेव्हा या बाबतीत त्याचे सिद्धान्त हे निराळेच असणार. अगदी सर्वसामान्य असे काही थोडे सारखेच लिहिले तरी आर्थिक धोरणाबाबतचे विचार व एकंदर विवेचनाचा भर याविषयी या निरनिराळ्या परिस्थितीमुळे युरोपीय व हिंदी अर्थशास्त्रज्ञांच्या लिखाणात महदंतर पडणारच."

हा महत्त्वाचा मुद्दा विशद केल्यावर हिंदुस्थानातील अर्थशास्त्रीय विचारांची प्रगती किती झाली आहे व पुढे व्हावयास पाहिजे, व हिंदी अर्थशास्त्रज्ञांनी काय केले पाहिजे यासंबंधी ते लिहितात : " एकंदर हिंदी आर्थिक जीवन व धोरण याबाबत आतापर्यंत ( १९४२ ) बराच विचार झाला व झाला त्याहूनही बारकाव्याचा विचार चालू आहे. हे सगळे झाले तरी रानडे यांनी या निबंधात स्वीकारलेल्या भूमीकेवरून अर्थशास्त्रीय विचारांची स्वतंत्र मांडणी करण्याचा उपक्रम केलेला मात्र कोठे दिसून येत नाही. क्वचित प्रसंगी हिंदी समाजरचना अगर संस्था यांचा पुरस्कार करण्याच्या अभिनिवेशाने काही लिहिले गेले असले तरी ते केवळ आग्रही दिसते. अशा लिखाणात शास्त्रीयतेचा बहुशः अभावच असतो. हा उणेपणा आजतागायत राहण्याची कारणे अनेक असू शकतील. एक तर हिंदुस्थानचे अफाट क्षेत्र व विविध परिस्थिती या मानाने अभ्यासकांची संख्या आजही अपुरी आहे. आणि या अभ्यासकास उपलब्ध असलेली साधने व वेळ हीही फार मर्यादित आहेत. परंतु खरे महत्त्वाचे कारण म्हणजे हिंदी अभ्यासकांच्या मनावर बसलेली इंग्रजी विचारांची पकड

हेच असावे. ...स्वतंत्र विचारांचा प्रवाह काय तो तिकडे चालणार व तेथील सिद्धान्तनास अनुसरूनच आपल्या परिस्थितीप्रमाणे आम्ही लिहिणार असेच बहुतांशी अलीकडे होऊन बसले आहे. प्रत्यक्ष विलायतेहून आलेल्या ताज्या पदवीधरास येथील मुरलेल्या अभ्यासकांहूनही जास्त कळते अशा प्रकारची वृत्ती अनेक ठिकाणी दिसून येते. यामुळे येथील अभ्यासकांचा निरुत्साह होतो. इतकेच नव्हे तर इंग्लंडहून शिकून आलेल्यांतही तेथील किनारा सुटला की आपली वाढ थांबते अशी भावना उत्पन्न होते. रानडे यांच्या इतक्या स्वतंत्र प्रज्ञेची माणसे केव्हाही विरळाच असणार. परंतु शिवाय आपल्या अभ्यासकांत विचारांचा व्यापकपणा व आत्मविश्वास ही दोन्ही कमी पडतात असे कष्टाने म्हणावे लागते. नाही म्हणावयास आपल्याकडे स्वतंत्ररीतीने विचार करून धडाडीने सिद्धान्तन करण्याचा प्रयत्न म्हणजे समाजशास्त्रांत डॉ. श्री. व्यं. केतकर यांचाच समजावयाचा. त्यांनी आर्थिक व्यवहाराबद्दलही थोडे सूचक लिहिले आहे. केतकरांच्या कार्यक्षेत्राचे स्वरूप व त्यातील अनेक अडचणी त्यामुळे त्यांस नवीन सिद्धान्तनाकडे विशेष लक्ष देता आले नाही व त्यात तितकेसे यशही आले नाही. परंतु रानड्यांनी दाखविलेल्या व डॉ. केतकरांनी अंशतः आक्रमिलेल्या मार्गानेच आपणास पुढे जावयाचे आहे. आपले अर्थशास्त्र हे केव्हाही गरीब व मागासलेल्यांचे अर्थशास्त्र आहे. त्यांचे एकंदर रूप व रंग ही केव्हाही संपन्न व प्रगत राष्ट्रांच्या अर्थशास्त्रापेक्षा निराळी असणार.[1] आणि या दृष्टीने हिंदी अर्थशास्त्राचा विकास झाल्यावरच आपल्या राष्ट्रीय आर्थिक धोरणाबाबत भरीव कामगिरी अर्थशास्त्रज्ञास करता येईल."

हे उतारे थोडे लांबले तरी त्यातून या चर्चेस उपयोगी असे बरेच मुद्दे

---

१. "याच्या पुष्ट्यर्थ एकच उदाहरण पुरेसे आहे. गेली दहा-बारा वर्षे आर्थिक जीवनाचा मुख्य प्रश्न उत्पादनाचा उरलेला नसून केवळ विभागणीचाच उरला आहे असे सर्व पाश्चात्त्य अर्थशास्त्रज्ञ–मि. केन्स धरून–प्रतिपादितात. त्यांना हिंदुस्थान व चीन यामधील अर्धपोटी असलेल्या असंख्य जनतेची दखलच नाही असे दिसते."

सहजपणे मांडले गेले आहेत. एक तर गाडगीळांची स्वतःची भूमिका ते स्पष्ट करतात आणि आजही त्या भूमिकेत दोष काढता येणार नाहीत. दुसरे, हिंदी किंवा इतर अप्रगत देशातील अर्थशास्त्राच्या अभ्यासकांची धारणा व मनोवृत्ती यासंबंधी गाडगीळांनी व्यक्त केलेले विचार आजही पुष्कळ अंशी खरे आहेत. तिसरे, प्रचलित अर्थ सिद्धान्तनापेक्षा अप्रगत देशातील अर्थसिद्धान्तन परिस्थितीभिन्नत्वामुळे का व कसे निराळे असावे लागते याचा एका उदाहरणाने त्यांनी केलेला खुलासा उद्बोधक आहे. प्रचलित अर्थसिद्धान्तन हे अप्रगत देशातील परिस्थितीस पुष्कळ अंशी गैरलागू आहे हे अगदी अलीकडे सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ गुन्नर मिरडाल यांनी विस्तृतपणे आपल्या Asian Drama[1] या सुप्रसिद्ध ग्रंथात मांडले आहे. तेव्हा त्याबद्दल अधिक लिहावयास नको. अप्रगत देशांना अनुरूप असे स्वतंत्र अर्थशास्त्र किंवा शास्त्रे अजून निर्माण झालेली नाहीत. परंतु व्हावयास पाहिजेत हाही गाडगीळांचा मुद्दा मिरडाल यांनी ठामपणे मांडला आहे व तसे सिद्धान्तन आजच्या वेगाने संशोधन योग्य मार्गाने पुढे गेल्यास १५–२० वर्षांत निर्माण होईल असा आपला अंदाजही सांगितला आहे.

अर्थशास्त्रीय सिद्धान्तनाचे स्वरूप व हिंदी ( अगर तत्सम ) अर्थशास्त्रज्ञांच्या कार्यक्षेत्राचे आतापर्यंत केलेले दिग्दर्शन लक्षात घेतले म्हणजे अर्थशास्त्रीय विचारात भर टाकणे म्हणजे काय करणे, या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देता येते. अशी भर टाकण्याचे मार्ग कोणते व त्यातले गाडगीळांनी कोणते चोखाळले हे या संदर्भात विशद करणे सुलभ होते.

प्रचलित अर्थसिद्धान्तनात निगमनाने अगर विगमनाने भर घालणे हा अर्थशास्त्रीय विचारात भर घालण्याचा एक मार्ग. प्रगत देशाबाहेरच्या अर्थशास्त्रज्ञांना हे करणे फार अवघड जाते याची कारणे उघड आहेत.

---

1. G. Myrdal, Asian Drama, An Inquiry into the Poverty of Nations, Vol. I, II, III, Twentieth Century Fund, New York, 1968.

प्रगत देशाबाहेरच्या अर्थशास्त्रज्ञांनी प्रचलित अर्थसिद्धान्तनात महत्त्वाची भर घातल्याचे उदाहरण औषधास सुद्धा दाखविता येणार नाही. प्रचलित अर्थशास्त्रीय सिद्धान्तनाच्या प्रदेशात काही कोपऱ्यात अशा काही अर्थ-शास्त्रज्ञांनी ( यात तरुण हिंदी अर्थशास्त्रज्ञांचाही समावेश होतो ) काही लक्षात येण्यासारखी कामगिरी केल्याचे दाखविता येईल. परंतु नगाऱ्यापुढे टिमकी येवढाच त्यांचा आवाका. अशा सिद्धान्तनाचे परिस्थितीजन्य स्वरूप लक्षात घेता या बाबतीत अशा अर्थशास्त्रज्ञांकडून याहून फार मोठ्या कामगिरीची अपेक्षा करणेही चूक ठरेल.

प्रचलित अर्थसिद्धान्तनाहून निराळे व अप्रगत देशातील परिस्थितीस अनुरूप असे नवीन सिद्धान्तन निर्माण करणे किंवा असे सिद्धान्तन निर्माण होण्यास लागणारी पूर्वतयारी करणे हा अर्थविचारात भर घालण्याचा दुसरा मार्ग. पूर्वतयारीत अप्रगत देशातील अर्थव्यवस्था कशा आहेत, त्यांच्या गतीचे व स्थितीचे नियम काय असावेत, त्यांच्या गतीचे विश्लेषणात्मक वर्णन करण्यास कोणती ज्ञापके व संकल्पना उपयोगी पडतील, या अर्थव्यवस्थांचे नीट आकलन होण्यास कोणती माहिती नवीन गोळा करावी लागेल व आहे त्या माहितीवरून ह्यासंबंधी काय म्हणता येईल, वगैरेंचा समावेश होतो.

वर उल्लेखिलेल्या दोन मार्गांपैकी पहिल्या मार्गातील गाडगीळांची कामगिरी फारशी नाही. प्रचलित सिद्धान्तनापैकी जमिनीच्या खंडाच्या सिद्धान्तनासंबंधी त्यांनी एका लेखात विगमनात्मक विचार केला आहे. वाई तालुक्यातील पाहणीत जमविलेल्या शेतीविषयक माहितीतून जमिनीच्या खंडासंबंधीची माहिती घेऊन ती सैद्धान्तिक खंडाशी मुळीच जुळत नाही असे त्यांनी दाखविले.[1] हा निष्कर्ष जरी बरोबर असला तरी त्यात नवीन असे काहीच नाही. खंडासंबंधीचे सिद्धान्तन हे प्रत्यक्षा-तील खंडास लागू पडत नाही हे त्यापूर्वीही पुष्कळांनी दाखविले होते.

1. D. R. Gadgil, " A Note on Agricultural Rent, " read at the Third Conference of the Indian Society of Agricultural Economics, Poona, 1941.

विक्सेल यांनी आपल्या सुप्रसिद्ध पाठ्यपुस्तकात सैद्धान्तिक आणि प्रत्यक्षातील जमिनीच्या खंडातील सुसंगती पाहून तो सिद्धान्त खरा की खोटा हे ठरविणे योग्य नव्हे असा स्पष्ट इशाराही दिलेला आढळतो.[1] गाडगीळांचा हा लेख विगमनाने सिद्धान्त तपासून घेण्याचा एक प्रयत्न म्हणून उल्लेखनीय आहे. अशाच प्रकारचा दुसरा प्रयत्न त्यांनी 'मजुरीचे नियंत्रण.... वगैरे'[2] मथळ्याच्या बनाली व्याख्यानमालेत केलेला आढळतो. पैशातील मजुरीचे दर कमी केल्यास मजुर बहुधा भांडतात. पैशाची कमी-जास्त होणारी क्रयशक्ती विचारात घेऊन प्रत्यक्षात खरी मजुरी कमी झाली तरी त्यासंबंधी ते भांडत नाहीत, या केन्स यांच्या विधानाचे हिंदुस्थानातील माहितीच्या आधारे परीक्षण करून हे विधान बरोबर नाही असे गाडगीळांनी दाखविले आहे. परंतु अशा प्रकारचे विगमनात्मक परीक्षण इंग्लंड, अमेरिकेतही झालेले आहे व त्यांतून तसाच निष्कर्ष काढण्यात आला आहे. म्हणून पुन्हा गाडगीळांचा हा निष्कर्ष विशेष अगर नवा नाही.

गाडगीळांची बहुतेक वैचारिक कामगिरी व लिखाण हे दुसऱ्या मार्गाने अर्थशास्त्रीय विचारात भर घालणारे आहेत. अप्रगत देशातील अर्थव्यवहारासंबंधीचे सिद्धान्तन अजून अस्तित्वात आलेले नाही हे पूर्वीच सांगितले आहे. नाही म्हणावयास दक्षिण अमेरिकेतील सामाजिक शास्त्रज्ञांनी गेल्या काही वर्षांत तेथील परिस्थितीस अनुरूप असे संपूर्ण नव्हे तरी अंशमात्र असे सिद्धान्तन सिद्ध केले आहे. त्याला त्यांनी Structural Analysis असे नाव दिले आहे. तथापि यालाही अजून परिणत स्वरूप यावयाचे आहे. दक्षिण अमेरिकेबाहेरील अप्रगत देशांत अर्थविचारांच्या विकासाने ही

1. Knut Wicksell, Lectures on Political Economy, Vol. I, General Theory, G. Routledge & Sons, London, 1934, p. 120 (Translated from Swedish Edition published in 1911).
2. D. R. Gadgil, Regulation of Wages and other problems of Industrial labour in India, Banaili Readership Lectures (Patna), Gokhale Institute Publication No. 9, 1943, p. 23.

पायरीसुद्धा अजून गाठलेली नाही. परंतु त्या दिशेने मार्गक्रमण चालू आहे. हे मार्गक्रमण अर्थातच माहिती जमविणे वगैरे प्रकारचेच आहे. गाडगीळांची कामगिरी याच प्रकारची व या दिशेनेच होती व तसेच तिचे मूल्यमापन केले पाहिजे.

परंतु हे करण्यापूर्वी या प्रकारच्या कार्यातील अडचणींचा उल्लेख करणे आवश्यक आहे. अर्थशास्त्रीय प्रश्नांच्या अभ्यासात अर्थशास्त्रीय सिद्धान्तन हे सुकाणू व होकायंत्र यांच्याप्रमाणे असते. या सिद्धान्तनाच्या मदतीनेच अभ्यास कोणत्या दिशेने व कसा करावयाचा हे ठरवावयाचे असते. त्याच-प्रमाणे कोणत्याही प्रश्नाची छाननी करताना कशा प्रकारची माहिती पाहिजे, आहे ती माहिती कशी वापरावयाची, त्यावरून निघणारे निष्कर्ष कितपत बरोबर आहेत, वगैरेसंबंधीचे मार्गदर्शनही या सिद्धान्तनाच्या सहा-य्यानेच मिळू शकते. परंतु अशा तऱ्हेचे सिद्धान्तन अस्तित्वात नसले तर अशा अभ्यासाच्या अडचणी फारच वाढतात. प्रचलित अर्थसिद्धान्तन हे अप्रगत देशांना सर्वांशी लागू पडत नाही हे माहीत असूनसुद्धा त्याचाच अभ्यास बहुतेक अर्थशास्त्रज्ञांनी केलेला असतो व त्या सिद्धान्तानुरूप तयार झालेल्या बुद्धीच्या चौकटीतच अप्रगत देशातील प्रश्नांचाही विचार त्यांच्याकडून सहजच होतो. प्रचलित अर्थशास्त्रीय सिद्धान्तनातील संकल्पना ज्ञापके, सिद्धान्त हे अप्रगत देशातील परिस्थितीस आंधळेपणाने लावल्यास त्यामुळे चुकीची मीमांसा होण्याचा धोका सतत असतो. साक्षेपाने या गोष्टी अभ्यासकाला सतत मनात बाळगाव्या लागतात. त्याचप्रमाणे अप्रगत देशातील अर्थव्यवस्थेसंबंधीची माहिती सर्वांगीण व पुरेशी नसते. त्यामुळे आहे त्या माहितीवरच काही निष्कर्ष काढावे लागतात. त्यावर अर्थातच अभ्यासकाच्या वैयक्तिक पूर्वग्रहांचा, तत्त्वज्ञानाचा प्रभाव जास्त पडतो व त्या प्रमाणात शास्त्रशुद्धतेचा ऱ्हास होतो. सध्याच्या परिस्थितीत हे टाळता येण्यासारखे नाही म्हणून अभ्यासकाने यासंबंधी विशेष साक्षेप बाळगणे आवश्यक असते व आपल्या मीमांसेच्या मर्यादा ओळखून त्या आपल्या विवेचनात स्पष्ट करणे आवश्यक असते. अशी जागरूकता फार थोड्या अर्थशास्त्रज्ञांच्या लिखाणात आढळते. गाडगीळांच्या लिखाणात अशी

जागरूकता सतत दिसते व वेळोवेळी त्यांनी तिच्याकडे लक्ष वेधल्याचे लक्षात येते. नियोजन व आर्थिक धोरण यासंबंधीचे त्यांचे लिखाण जेथे एकत्र छापलेले आहे त्या पुस्तकात प्रस्तावनेत त्यांनी किंमती व चलन-वृद्धी यासंबंधीची जी टिपणे तेथे छापली आहेत त्यातील विवेचनाबद्दल हे विचार कटाक्षाने मांडले आहेत. ते त्यांच्या व अशा प्रकारच्या सर्वच लिखाणास लागू आहेत. ते लिहितात :

" I confess that I do not feel satisfied with the analysis and discussion of price situation presented in the various notes and memoranda included in this publication. To a large extent they are partial and superficial. At the same time, I feel that it is difficult with existing information and the existing state of economics to achieve a more satisfactory job... One is forced to take an over-all view, with the help of some essentially subjective valuation of the importance of various factors. The result is an analysis which is to a very great extent a matter of personal judgement. All that I can plead is that all other attempted analysis is also in the same category and because of some what extended experience in the matter and because of natural vanity, I cotinue to place some faith in my own judgment. "[1]

गाडगीळांची अर्थशास्त्रीय कामगिरी लक्षात घेताना त्यांनी स्वतःच्या लिखाणाबद्दल केलेले हे प्रांजळ कथन विसरता कामा नये.

गाडगीळांनी अर्थशास्त्रीय विचारात घातलेली भर मी माझ्या समजुती-प्रमाणे येथे देणार आहे. पण ती देण्यापूर्वी थोडा खुलासा करणे जरूर आहे. मी जी कलमवार यादी पुढे दिली आहे ती तशीच स्वतः गाडगीळांना मान्य झाली असती की नाही हे सांगणे कठीण आहे. शिवाय

1. D. R. Gadgl, Foreword to " Planning and Econmic Policy in India, " Gokhale Institute of Politics and Economics Study No. 39, Second Edition, 1962, p. viii–ix.

त्यांनी स्वतः आपली कामगिरी काय यासंबंधी लिहिले नसल्यामुळे[१] मला जी त्यांची कामगिरी वाटते ती मी माझ्या शब्दांत व माझ्या कल्पनेप्रमाणे सुसंगत करून दिली आहे. पुष्कळ वेळा जरी मी गाडगीळांचेच शब्द व वाक्ये वापरली असली तरी त्यांचे संकलन हे माझे आहे, त्यांचे नव्हे हे ध्यानात ठेवणे आवश्यक आहे आणि या संकलनाच्या व समजुतीच्या सर्व संभाव्य चुका सर्वस्वी माझ्या आहेत. गाडगीळांच्या नव्हेत. माझ्या मते गाडगीळांनी अर्थशास्त्रीय विचारात पुढील भर घातलेली आहे :

(१) हिंदुस्थानातील व्यापारी जाती व जमाती, त्यांचा नवीन उद्योगधंद्यात प्रवेश, या ऐतिहासिक उत्क्रांतीमुळे सध्याच्या उद्योगधंद्यांच्या रचनेवर, घटनेवर, ती चालविण्याच्या पद्धतीवर, त्यांच्या संस्थात्मक संघटनांवर झालेल्या परिणामांचा अभ्यास गाडगीळांनी सुरू केला होता. डॉ. केतकरांच्या विचारसरणीशी जुळता असा हा अभ्यास होता. परंतु तो पुरा करण्यास त्यांना सवड मिळाली नाही. त्यांनी एक त्रोटक ऐतिहासिक टिपण त्यासंबंधी प्रसिद्ध केलेले आढळते.[२] त्यात दाखविलेली अभ्यासाची दिशा स्वीकारून हे काम पुढे नेण्यासारखे आहे.

(२) सहकारी संस्था व त्यांची पुनर्रचना यासंबंधी गाडगीळांनी काही नवीन विचार मांडले व ते प्रत्यक्षात आणण्यातही त्यांनी पुष्कळ श्रम केले. सहकारी साखर कारखान्यांच्यासंबंधीची त्यांची कामगिरी विख्यात आहेच. येथे सहकारी तत्त्वज्ञानासंबंधीची त्यांची विचारसरणी लक्षात घ्यावयाची आहे. सहकारी चळवळीस मूलभूत असणारे तत्त्व म्हणजे

---

१. १९४९ साली प्रा. भा. शं. भणगे यांनी " प्राचार्य धनंजयराव गाडगीळ " या मथळ्याच्या ' नवमहाराष्ट्र ' या पुणे येथे अल्पकाल प्रसिद्ध होत असलेल्या त्रैमासिकाच्या आक्टोबर-नोव्हेंबर १९४९ च्या अंकात प्रसिद्धिलेल्या लेखात त्या वेळपर्यंतची गाडगीळांची अर्थशास्त्रविषयक कामगिरी परीक्षिली होती हे येथे नमूद करणे आवश्यक आहे.

2. D. R. Gadgil, Origins of the Modern Indian Business Class, An Interim Report, Institute of Pacific Relations, New York, 1959 ( Memiograph )

सहकारी संघटनांचे ध्येय वैयक्तिक आर्थिक फायदा हे नसून सामाजिक हित हे आहे हे होय. त्याचबरोबर 'एकमेका साह्य करू' ही स्वयंस्फूर्त व अपरावलंबी कामाची स्फूर्ती हे दुसरे. सहकारी चळवळ प्रथम आजच्या प्रगत देशात उगम पावली व तेथेच या तत्त्वांचा आविष्कार व विकास झाला. हिंदुस्थान व इतर अप्रगत देशात सहकारी चळवळ ही सरकार-प्रणीत. येथील भूमीतून निर्माण झालेली नव्हे. सहकारी चळवळीची १९५१ पर्यंत फारशी प्रगती हिंदुस्थानात झालेली नव्हती.

'सहकारी चळवळ अयशस्वी झाली आहे. परंतु ती यशस्वी झालीच पाहिजे' अशी घोषणा गाडगीळांनी ग्रामीण कर्जाच्या पाहणीच्या अहवालात केली. त्यांना असे का वाटत होते याची तात्त्विक चर्चा त्यांनी "Towards a Co-operative Commonwealth" (1961)[1] या मथळ्याच्या ब्रिजनारायण स्मृती व्याख्यानमालेत केली आहे. ती मौलिक आहे. तिचा थोडक्यात मथितार्थ असा : हिंदुस्थानसारख्या अप्रगत देशात सहकारी संघटना ही आर्थिक विकासाचे एक प्रभावी साधन म्हणून वापरणे आवश्यक आहे. या देशातून सर्वत्र असलेली आर्थिक व सामाजिक विषमता लक्षात घेतली म्हणजे वैयक्तिक स्वार्थावर आधारलेली व खुल्या आर्थिक स्पर्धेचा पुरस्कार करणारी भांडवलशाहीची अर्थव्यवहार संघटित करण्याची पद्धती अशा समाजाच्या विकासास व प्रगतीस मुळीच उपयुक्त ठरणार नाही. समाजवादी समाजरचनेतील सरकारी यंत्रणेवरील व उत्पादन साधनांच्या राष्ट्रीयीकरणावरील भर ह्याखेरीज बहुतेक तत्त्वे सहकारी संघटनेत अनुस्यूतच आहेत. सहकार हा एक संघटनाचा विशिष्ट प्रकार आहे. त्यात मालकी व अधिकार ह्यात फारकत करण्यात येते. उदाहरणार्थ, कितीही भाग भागधारकाकडे असले तरी त्यास एकच मत असते. विकेंद्रीकरण हा तिचा आत्मा आहे. ती लहान लहान गटांनी

1. D. R. Gadgil, Towards a Co-operative Commonwealth, Professor Brij Narayan Memorial Lectures, 1960, Punjab, University Publication Bureau, Chandigarh, 1961.

संयुक्तराज्याच्या ( Federal ) पद्धतीने चालविता येते. वैयक्तिक फायद्या-पेक्षा सामाजिक फायद्याकडे तिचे लक्ष असते. तिच्या कार्यपद्धतीस एक नैतिक अधिष्ठान आहे. जनतेची स्वयंस्फूर्ती कार्यप्रवण करण्याची तिची कुवत फार मोठी आहे. या सर्व गुणांमुळे अप्रगत देशात सहकारी संघटना जोपासणे, तिचा प्रसार करणे व तिचा विकासाचे साधन म्हणून नियोजनासाठी तिचा उपयोग करणे हे अत्यंत आवश्यक आहे.

परंतु प्रगत देशांप्रमाणे सहकारी संघटनांची अप्रगत देशात स्वयंस्फूर्त वाढ वा विकास होईल अशी आशा करणे व्यर्थ आहे. या देशातील जनतेच्या अठरा विश्वे दारिद्र्यामुळे त्यातल्या दुर्बळांची संख्या इतकी मोठी आहे की सहकारी संघटनेतही त्यांचा काही प्रभाव पडण्याची आशा नाही. यासाठी सरकारने फार मोठ्या प्रमाणावर सहकारी चळ-वळीस मदत केली पाहिजे. नुसत्या दुर्बल व गरीब जनतेच्या आर्थिक बळावर सहकारी संघटना यशस्वी होणार नाहीत. कारण ते बळ शून्य-वत् आहे. सहकारी संस्थांना सरकारने मोठी भांडवली मदत केली पाहिजे. शेतकी मालाची खरेदी-विक्री यात त्यांना एकाधिकारी स्थान दिले पाहिजे व त्यांच्या मार्फत किंमतीचे नियंत्रण यशस्वीपणे केले पाहिजे असे विचार गाडगीळांनी मांडले आहेत.

सहकारी चळवळीतील जुन्या कार्यकर्त्यांनी गाडगीळांच्या या नवीन विचारांच्या विरुद्ध आक्षेप घेतले. फार मोठ्या सरकारी मदतीने सहकारी संघटनांचा विकास करावयाचा म्हणजे मूळच्या सहकाराच्या तत्त्वाच्या नरडीस नख लावणेच होय असे त्यांपैकी पुष्कळांना वाटले. त्याचप्रमाणे एकदा मोठ्या प्रमाणावर सरकारी मदत घेतली की सहकारी चळवळ ही सर्वस्वी सरकारच्या अंकित बनेल व तिचे स्वातंत्र्य नाहीसे होईल, सरकारी नोकरशाहीचे प्राबल्य सहकार क्षेत्रात माजेल अशीही शंका पुष्कळांनी व्यक्त केली. वर उल्लेखिलेल्या व्याख्यानमालेत गाडगीळांनी या आक्षेपांना उत्तरे दिली आहेत. व्याख्यानापूर्वीच्या ( १९६१ ) ८–१० वर्षांच्या काळातील प्रत्यक्ष अनुभवावरून दुसऱ्या आक्षेपास

काही आधार नाही असे त्यांनी म्हटले आहे.[1] जे सरकार सहकारी मूल्यांचा पुरस्कार करते व ज्याचा या मूल्यांवर विश्वास आहे त्याच्या मदतीमुळे सहकारी तत्त्वे नष्ट होतील हे कसे संभवते असा त्यांनी पहिल्या आक्षेपाबद्दल प्रश्न विचारला आहे व तेवढ्यावरच ते सोडले आहे.

( ३ ) गाडगीळांची बरीच मोठी कामगिरी निगमनापेक्षा विगमनाच्या क्षेत्रातच झाली. हिंदी अर्थशास्त्राची उभारणी करावयाची तर हिंदी आर्थिक व सामाजिक परिस्थितीबद्दल तपशीलवार व भरवसा ठेवण्यासारखी शक्यतर आकडेवारी माहिती उपलब्ध असणे अगर करणे जरूर आहे. हे कार्य ते हिंदुस्थानात परत आले त्या वेळी सरकारमार्फत फारसे होत नव्हते व खासगी प्रयत्नही ( विश्वविद्यालयांच्या द्वारा वगैरे ) यासंबंधात जवळजवळ मुळीच नव्हते. या कार्याला आपण वाहून घेतले पाहिजे असे गाडगीळांनी मनाशी ठरविले होते. इंग्लंडमध्ये विद्यार्थी म्हणून असतानाच त्यांनी लंडनमधील हिंदी खलाशांची पाहणी करून त्यांच्यासंबंधी माहिती गोळा केली होती व त्यावर आधारलेला लेखही 'केसरी'त लिहिला होता. सुरत येथील महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून काम करतानाही त्यांनी सुरत येथील जरीच्या धंद्याची पाहणी केली होती. ह्या पाहणीचा अहवाल पुढे कित्येक वर्षांनी प्रसिद्ध झाला. गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्थेची धुरा पत्करून त्यांनी हे काम नेटाने पुढे नेले. या क्षेत्रातील त्यांचे विशेष उल्लेखनीय वैचारिक विशेष असे सांगता येतील.

( ३·१ ) शेतधंद्याचा तपशीलवार जमाखर्च मांडण्यासारखी बारीकबारीक माहिती एकेका शेतकऱ्याबद्दल वर्षभर मिळवून शेती धंद्याची आर्थिक परिस्थिती अजमावण्याची पद्धती युरोप-अमेरिकेत विकास पावली होती. ती हिंदुस्थानच्या परिस्थितीस योग्य अशी बनवून ( त्यातील

१. १९६१ नंतरच्या काळात या क्षेत्रात झालेल्या घटना लक्षात घेतल्या तर गाडगीळांनी येथे दिलेला दिलासा तितकासा खरा ठरलेला नाही असे म्हणणे भाग पडेल.

प्रश्नपत्रिकेत सुधारणा व फेरफार करून ) व त्यातील व्यावहारिक अडचणींवर मात करून गाडगीळांनी ती वाई तालुक्यातील शेतकऱ्यांच्यात यशस्वी केली. या विषयावरचा त्यांचा अहवाल[1] हा कित्येक वर्षे त्यावरचा एकमेव अधिकृत ग्रंथ म्हणून हिंदुस्थानात मानला जात असे.

( ३·२ ) पाश्चात्त्य देशांप्रमाणे शहरांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीवर प्रकाश टाकण्यासाठी हिंदी शहरांची आर्थिक व सामाजिक पाहणी कशी करावी व कशी करता येते हे गाडगीळांनी पुणे शहराची अशी पाहणी करून दाखवून दिले.[2] हिंदुस्थानात अशा प्रकारची पाहणी ही पहिलीच होती. नागरी उद्योगधंदे, घाऊक व किरकोळ व्यापार, सामाजिक संस्था, कुटुंबे वगैरे संबंधीच्या विविध प्रश्नावल्या गाडगीळांनी या पाहणीत तयार करून प्रथमच वापरल्या. विशेषतः मिळवत्या माणसांचे उद्योगधंदे व वृत्ती यांचे आर्थिक व सामाजिक निकषावर ठरविलेले जे बारा कलमी वर्गीकरण त्यांनी तयार केले त्यात त्यांच्या खोल सामाजिक व आर्थिक अभ्यासाचे व निरीक्षणाचे प्रतिबिंब पडलेले आहे. हे वर्गीकरण सर्वस्वी नवीन आहे.

(३·३ ) कोणत्याही जलपायन प्रकल्पापासून होणारे आर्थिक व सामाजिक फायदे कसे मोजावयाचे हा प्रश्न गाडगीळांनी गोदा-प्रवरा कालव्यांबद्दल पाहणी करून सोडवून दाखविला. त्या वेळपर्यंत हिंदुस्थानात तो अशा प्रकारे कोणीही हाताळला नव्हता. आज पाटस्थळाखाली असलेल्या जमिनीत उत्पादन किती होते हे काढणे सुलभ होते. परंतु त्या जमिनी पाटस्थळाखाली येण्यापूर्वी किंवा त्या तशा न येता पूर्वीसारख्याच कोरडवाहू राहिल्या असत्या तर त्यांच्यावर किती उत्पादन झाले असते व त्या मानाने सध्याचे उत्पादन किती जास्त आहे याचे उत्तर देणे अगर

1. D. R. Gadgil and V. R. Gadgil, A Survey of Farm Business in Wai Taluka, Gokhale Institute of Politics and Economics, Poona, Publicataion No. 7, 1940.
2. D. R. Gadgil, Poona : A Socio-Econmoic Survey, Vol. I ( 1945 ), Vol. II ( 1952 ).

गणित करणे अवघड होते. कारण अशा तऱ्हेने उत्पादनाचा अंदाज करण्यास पूर्वीची माहितीच उपलब्ध नव्हती. गाडगीळांनी हा प्रश्न फार कौशल्याने व समाधानकारक रीतीने सोडविला व एकंदर फायद्या-तोटयाचे संपूर्ण गणित प्रथमच मांडले.[1] आज त्यांनी आक्रमिलेल्या मार्गाने पुष्कळच प्रगती झालेली आहे. परंतु तिचा पाया गाडगीळांनी घातला हे वादातीत आहे.

( ४ ) हिंदुस्थानच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी करावयाचे नियोजन व त्यासाठी कार्यवाहीत आणावयाचे आर्थिक व सामाजिक धोरण यासंबंधी गाडगीळांनी आपल्या कार्यप्रवण आयुष्यात सातत्याने आपले विचार मांडले व ते प्रत्यक्षात आणण्यासाठी हातभार लावला. त्यांचे हे विचार हिंदुस्थानासारख्या एका अप्रगत आणि गरीब देशातील परिस्थितीच्या अभ्यासावर आधारलेले आहेत. हे त्यांचे विश्लेषण नुसते आर्थिक नसून सामाजिकही आहे. हिंदुस्थानातील इतर कोणत्याही अर्थशास्त्रज्ञाने इतका मूलभूत सामाजिक विचार या विषयावर केल्याचे मला माहीत नाही.[२] या दृष्टीने पाहता जरी त्यांचे विश्लेषण हिंदुस्थानाच्या परिस्थितीस अनुरूप असले तरी ते अंशत: अप्रगत व गरीब देशांच्या विकासास व त्यात उद्भवणाऱ्या समस्यांना लागू आहे. साकल्याने हे विचार असे आहेत.

---

1. D. R. Gadgil, Economic Effects of Irrigation, Report of a Survey of Direct and Indirect benefits of the Godavari and Prawara canals, Gokhale Institute of Politics and Economics Poona, Publication No. 17, 1948.
२. गाडगीळांचे नियोजन व विकास यासंबंधीचे बहुतेक इंग्रजी लिखाण हे आर्थिक प्रश्नासंबंधीच आहे. त्यांनी सामाजिक परिस्थिती व तिचा अर्थकारणाशी असलेला संबंध यासंबंधी जे विश्लेषण केले ते बहुतेक सर्व मराठीत आहे. त्यामुळे त्यांचे इंग्रजी लिखाणच माहीत असणाराला त्यांच्या या पायाभूत अशा सामाजिक विश्लेषणाची फारशी माहिती असण्याचा संभव नाही. ध. रा. गाडगीळ, " भारत व महाराष्ट्र " महाराष्ट्र जीवन, परंपरा, प्रगति आणि समस्या, जोशी-लोखंडे, पुणे, १९६०, पृ. १ ते ४८.

(४·१) हिंदुस्थानातील दारिद्रय दारुण, जीर्ण आणि ऐतिहासिक आहे. आपले दारिद्रय हे नुसते आर्थिक नसून सामाजिकही आहे. आपला देश नुसताच गरीब नाही तर तेथे सामाजिक आणि आर्थिक विषमताही पराकाष्ठेची आहे. जुन्या जातिभेदाधिष्ठित स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्थेत आपल्या समाजाचा पिंड वाढलेला आहे. जातिसंस्थेमुळे हिंदुस्थानातील (सामाजिक) स्तरीकरण युरोपीय स्तरीकरणापेक्षाही जास्त घट्ट व टिकाऊ होते व आहे. जातिभेदाधिष्ठित अशा या समाजात व्यक्तिस्वातंत्र्य व समानता या कल्पना उद्भवणे अशक्यच. ऐहिक जीवनास गौण मानण्याच्या परंपरेमुळे नित्य व्यवहाराचा सूक्ष्म अभ्यास, त्याबद्दलची कळकळ किंवा धडपड हीस असावे इतके महत्त्व आपल्या समाजात नाही. व्यक्तिगत मुक्तीच्या महत्त्वामुळे समाजधर्म, सामूहिक कर्तव्ये याजवरही आपल्या तत्त्वज्ञानात भर देण्यात आलेला नाही.

आधुनिक काळात व विशेषत: ब्रिटिश अमदानीत पश्चिमेकडील वारे जोराने वाहावयास लागल्यापासून यासंबंधी बरेच विचारमंथन झालेले आहे. तरी ते तात्त्विक पातळीवरच झालेले आहे. प्रत्यक्ष व्यवहारात त्याचा ठसा फारसा उमटलेला नाही. व्यक्तिगत मुक्तीसाठी संन्यासमार्ग श्रेष्ठ नसून लोकसेवेचा मार्ग श्रेष्ठ मानावा असे जरी नवविचाराच्या तत्त्वज्ञान्यांनी प्रस्थापण्याचे प्रयत्न केले तरी एक प्रकारे संन्यासवृत्ती सोडावी असे त्यांनीही मानले नाही. ‘ काय करावे ’ यापेक्षा ‘ कोणत्या वृत्तीने करावे ’ यावरच त्यांचा भर राहिला. आपल्या परंपरागत तत्त्वविचारात विशिष्ट समूह-अगर-समाज कर्तव्यांचा उद्भव होत नाही याकडे कोणी लक्ष दिले नाही व ती उणीव भरून काढण्याचेही प्रयत्न झाले नाहीत. एवंच आधुनिक वृत्तीत फरक पडला तरी तो कर्मत्यागापुरताच. ‘ अलिप्तपणा ’ व सामूहिक जीवनास गौण लेखण्याची प्रवृत्ती ही टिकून राहिली आणि कोणत्याही तत्त्वज्ञानाची बैठक घेणारा यास विरोध करीत नाही.

आज जातिभेद मोडावे, समानता मानावी, लोकशाही पद्धतीने कारभार करावा वगैरे गोष्टी आम्ही तत्त्वत: मान्य करतो. प्रत्येक जण, प्रत्येक

थर, प्रत्येक जात या नवीन कल्पनांचा आपले स्थान सुधारणे व महत्त्व वाढविणे एवढ्यापुरताच आश्रय करतात. परंतु जेथे जुनी स्थाने, जुन्या सवयी, जुन्या कल्पना सोडणे हे स्वतःच्या तत्कालीन हिताविरुद्ध दिसते तेथे आम्ही सर्व नव्याकडे स्वाभाविक रीतीने दुर्लक्ष करतो.

समाजशिल्प आणि समाजस्थापत्य या प्रकारचा विचार नीतिधर्म-शास्त्राच्या जोडीने आता करावयास पाहिजे. स्वतंत्र,सात्त्विक, समताप्रधान व समाधानी समाजाच्या निर्मितीच्या मार्गाने आपली पावले पडावयास याची फार आवश्यकता आहे. येथे सामाजिक व आर्थिक असा भेद करता येणार नाही. मनुष्य कार्यान्वित होतो तो स्वार्थासाठी. तेव्हा निरनिराळ्या तऱ्हांच्या व श्रेणीच्या विलोभनांची तरतूद केल्यासच अर्थ-व्यवस्था नीट चालू शकते, हा आधुनिक भांडवली अर्थशास्त्राचा मूलभूत सिद्धान्त. कम्युनिस्टांनीही अर्थव्यवस्था बदलणे व कायम ठेवणे या करता. बाहेरून काही इलाज केला तरी व्यवस्थेच्या अंतर्गत व्यवहारात व्यक्तिगत विलोभनास फार महत्त्व दिले. व्यक्तिगत विलोभनावर फार भिस्त टेवली असता, भांडवलशाही अगर कम्युनिझम यांचे ठळक दोष टाळता येत नाहीत. तेव्हा विलोभनाचे कार्य अंशतः तरी धर्मनीतिकल्पना-द्वारा करता येते काय, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. याहूनही महत्त्वाचे म्हणजे व्यक्तिगत संचयात परिमितता व संपत्ती-सत्तेचा परिमित वापर याचे महत्त्व समाजास पटवता येईल काय व या विरुद्ध आचरण गर्ह्य मानण्याकडे समाजाची प्रवृत्ती होऊ शकेल का ?....संपत्तिसंचयार्थ केलेल्या व्यापारी उद्योगास कमी लेखून ब्राह्मण, भिक्षू, लढवय्ये, राज-कारणी इत्यादींचे महत्त्व मानणे हे भारतीय व चिनी संस्कृतींनी साधले होते. आपणास आज अर्थव्यवहार व संपत्तिसंचय यांचे योग्य महत्त्व मान्य करून व्यक्तिगत संचयाचे अगर श्रीमंतीचे विलोभन फार न वाटेल असे करावयाचे आहे. हे सर्व कायद्याने करावयाचे तर दंडाचा वापर ठिकठिकाणी अभिप्रेत राहतो म्हणून तो टाळण्यास नीतिकल्पनांचा आश्रय घ्यावयाचा.

( ४·२ ) आपले निर्घृण दारिद्र्य निवारण करणे हा वर सांगितल्या-

प्रमाणे निव्वळ आर्थिक प्रश्न नाही. त्यासाठी फार मोठ्या आर्थिक व सामाजिक परिवर्तनाची जरुरी आहे. ही गोष्ट चुटकीसरशी साध्य होणारी नाही. सद्यःस्थितीत शक्य असलेल्या कमाल वेगाने जरी आर्थिक प्रगती झाली तरी १५-२० वर्षांनीसुद्धा जगातल्या गरीब राष्ट्रांतच हिंदुस्थानचा समावेश होत राहील. आर्थिक प्रगतीच्या चमत्काराची येथे अपेक्षा करणे व तसे मानून आर्थिक धोरण ठरविणे चूक ठरेल. आताच्या पिढीने संयमाने वागून,[१] स्वार्थत्याग करून, बचत वाढवून भांडवलाची गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर केली तर १५-२० वर्षांत बरे दिवस दिसतील. अशा तऱ्हेचे आर्थिक धोरण अंगीकारण्याचे आणि ते कार्यान्वित करण्याचे सामर्थ्य नैतिक नेतृत्वामुळेच मिळू शकेल. अशा तऱ्हेच्या नेतृत्वाची आज गरज आहे.

(४·३) दारिद्र्याच्या आर्थिक बाजूचा विचार करावयाचा तर आपल्या दारिद्र्याचे स्वरूप नीट लक्षात घेतले पाहिजे. आपण दरिद्री आहोत याचा अर्थ बहुसंख्य जनता अर्धपोटी राहते किंवा जीवनोपयोगी वस्तूंची आपण करतो ती निर्मिती आपल्या किमान गरजांच्या मानानेही अत्यंत अपुरी आहे, हा आहे. आर्थिक विषमतेमुळे ही अपुरी निर्मितीही समाजास समानतेने मिळत नाही. शिवाय ही अपुरी निर्मितीही प्रतिवर्षी स्थिर स्वरूपाची नसून अत्यंत अस्थिर आहे. आपली शेती ही पावसावर बहुतांशी अवलंबून असल्यामुळे आपल्या शेतकीचे उत्पादन पाऊसमानाप्रमाणे जास्त कमी होते. एक वर्षी चांगले पीक तर २।३ वर्षांनी दुष्काळ ही स्थिती आपल्या परिचयाची आहे. या अस्थिरतेमुळे मूळ निर्मितीचे अपुरेपण व तिची विषम वाटणी ही अधिकच दारुण होतात व सर्व अर्थव्यवस्थेसच अस्थिरपणा येतो. आपण आर्थिक दृष्ट्या अप्रगत आहोत याचीच ही एक बाजू आहे.

सर्वच आर्थिक उत्पादनात सर्वत्र थोडी फार अस्थिरता असतेच. परंतु

---

१. त्यांची सरकारी नोकरांच्या वेतन श्रेणीसंबंधीची मते यातूनच उद्‌भवलेली आहेत.

मूळचे उत्पादनच जर किमान गरजेच्या मानाने जादा असले तर या अस्थिरतेचे परिणाम फारसे वाईट होत नाहीत. जादा उत्पादनाची अर्थ-व्यवस्थेतील कूस ही अस्थिरता पचवू शकते. गरीब देशातील अर्थव्यवस्थेत अशा प्रकारची कूस मुळीच नसल्यामुळे अशा अस्थिरतेचा तेथे निरास होऊ शकत नाही. त्यामुळे अशा अर्थव्यवस्थांची प्रकृती अगदी तोळा-मासा असते व लहानसहान आघातांनीही – एखाद्या भागात अवर्षण, चुकीचे धोरण, एखाद्या भागातील कायदासुव्यवस्थेत काही काळ बिघाड, वगैरे – ती पार बिघडून जाते. लहान आघातांची ही स्थिती तर मोठ्या आघातांचे – मोठा दुष्काळ, परराष्ट्राशी लढाई – बोलावयासच नको. अशा तोळामासा प्रकृतीच्या अर्थव्यवस्थेस आर्थिक विकासाने सुदृढ, संपन्न करावयाच्या मार्गात त्यामुळे अनंत अडचणी उभ्या राहतात.

आर्थिक विकासात जादा बचतीमार्फत भांडवलाची निर्मिती करून त्याची नेहमीपेक्षा जास्त गुंतवणूक करणे व त्यातून उत्पादनसाधनांची वाढ करून अर्थव्यवस्थेची एकंदर उत्पादनक्षमता वाढविणे हा प्रमुख भाग असतो. नवीन भांडवल गुंतवणुकीमुळे अस्तित्वात येणारी नवीन उत्पादन साधने कार्यान्वित होऊन त्यातून नवीन उत्पादनाचा ओघ सुरू व्हावयास कालावधी लागतो. एखाद्या नदीवर धरण बांधून जलपायन क्षेत्रात वाढ व्हावयास बरीच वर्षे लागतात ही गोष्ट परिचयाची आहे व वरील विधानाचे ते एक चांगले व परिचित उदाहरण आहे. परंतु नवीन भांडवल-निर्मितीच्या प्रकल्पास सुरुवात केल्यापासून त्यातून उत्पादनाचा ओघ वाहू लागण्यापूर्वीच्या काळात त्या प्रकल्पावर खर्च चालू असतो. तेथे काम करणारे कामगार, माल पुरवणारे व्यापारी, कंत्राटदार वगैरेंची उत्पन्ने निर्माण होतच असतात व त्यांची जीवनोपयोगी वस्तूंची मागणी वाढतच राहते. त्यामुळे मूळचा मागणी-पुरवठ्याचा असमतोल अधिकच असम होतो व अपुऱ्या पुरवठ्याची मूळची समस्या अधिकच बिकट होते.

येथे दोन प्रकारच्या असमतोलांचा विचार आहे. प्रथम सांगितलेला दारिद्र्य लक्षणातला मूळचा मागणी-पुरवठ्याचा असमतोल. अर्थव्यवस्थे-च्या विकासाचा कोणताही प्रयत्न केला नाही तरी हा असमतोल असतोच.

याला अर्थव्यवस्थेच्या स्थिर प्रकृतीतील असमतोल असे म्हणता येईल. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत निर्माण होणारा वर सांगितलेला असमतोल हा अर्थव्यवस्थेस गती देऊन तिचा विकास व्हावा म्हणून असल्यामुळे त्यास 'गतिशील असमतोल' असे म्हणता येईल. गरीब देशांच्या आर्थिक विकासाचा विचार करताना या दोन्ही असमतोलांचा विचार करावा लागतो.

अलीकडच्या अर्थविकासाच्या चर्चेत या दुसऱ्या प्रकारच्या असमतोलाची पुष्कळांनी चर्चा केली आहे. काहींच्या मते असमतोल हाच मुळी आर्थिक विकासाचा गाभा आहे. असा असमतोल होऊ न दिल्यास आर्थिक विकासच खुंटेल. इतर काहींच्या मते असा असमतोल फार काळ चालू दिला तर त्यामुळे विकासास पायबंद बसणे अटळ होईल.

गाडगीळांचा मुद्दा हा अगोदरच्या टप्प्यावरचा म्हणजे स्थितिशील असमातोलाबद्दल आहे. स्थितिशील असमतोलाची योग्य काळजी घेतल्याखेरीज विकासाचा कार्यक्रम अंगीकारणे फोल आहे. तसे केल्यास स्थितिशील असमतोल व गतिशील असमतोल यांची युती होते व नुसताच असमतोलाचा गोंधळ माजून आहे ही स्थितीही अधिक हलाखीची होते आणि विकासाचाही बोजवारा उडतो. गेल्या काही वर्षांतील आपल्या देशातील घटना व घडामोडी या दृष्टीने उद्बोधक आहेत. यासाठी विकास कार्यक्रम अंगीकारण्याचे पथ्य म्हणून प्रथम हा स्थितीशील असमतोल काबूत आणून त्याची व्यवस्था लावणे आवश्यक आहे. हा गाडगीळांचा मुद्दा हिंदुस्थानालाच नव्हे तर इतर अप्रगत देशांनाही लागू पडणारा व मौलिक आहे.

हिंदुस्थानातील स्वातंत्र्य-प्राप्तीपासून आतापर्यंतच्या काळातील आर्थिक घडामोडींचा व घटनांचा अभ्यास केल्यास या स्थितिशील असमतोलाचे स्वरूप अधिक निश्चितपणे सांगता येईल. आपल्या देशात नव्वद टक्के जनतेस जाणवणारा मूळ असमतोल अन्नधान्यांच्या मागणी-पुरवठ्याचा. त्याच्या मागोमाग इतर शेतकी मालाचा व त्यानंतर कापड-चोपड वगैरे इतर जीवनावश्यक वस्तूंचा. अन्नधान्ये व शेतकी माल यांच्या स्थितिशील

असमतोलाची व्यवस्था लावावयाची तर'सर्वांना जो सद्य:स्थितीत शक्य असेल तो या जीवनोपयोगी वस्तूंचा पुरवठा स्थिर किंमतीत सतत मिळेल अशी तजवीज केली पाहिजे. सर्वच शेतकी मालाच्या उत्पादनातील चढ-उतारामुळे येणारी अस्थिरता सरकारी संपादन व वाटप यांचा अवलंब करून निवारली पाहिजे. ज्या वर्षी पीक उत्तम येईल त्या वर्षी जादा सरकारी साठे करून व ज्या वर्षी ते कमी येईल त्या वेळी हे साठे विकून सर्वसाधारणपणे प्रतिवर्षी पुरवठा वाढता पण स्थिर ठेवला पाहिजे. एकाधिकार धान्य व इतर मालाचे संपादन व घरटी समान वाटप केल्या-खेरीज हे शक्य होणार नाही. ह्यासाठी कार्यक्षम सरकारी व सहकारी संघटना उभारली पाहिजे.

या गोष्टीवर आपल्या देशातील विकासाचा वेग अवलंबून आहे हे गेल्या कित्येक वर्षांच्या अनुभवावरून सिद्ध झालेले आहे. देशातील किंमतींची पातळी, विकास-योजनांसाठी लागणारा जादा पैसा उभारण्याची सरकारची कुवत, सरकारी विकास योजनांवर होणारा खर्च व औद्योगिक प्रगतीचा वेग या परस्परांशी अत्यंत निगडित अशा गोष्टी आहेत. आणि या सर्व अन्नधान्य व इतर शेतकी माल यांचा पुरवठा सुस्थिर असण्यावर अवलंबून आहेत. म्हणून आपल्या अर्थव्यवस्थेत अन्नधान्यांचा व शेतकी मालाच्या सुस्थिर पुरवठ्याचा प्रश्न मध्यवर्ती आहे. स्थितिशील समतोलाचा तो गाभा आहे. हा प्रश्न आपल्याला जितक्या यशस्वीपणे सोडवता येईल तितका विकासाचा कार्यक्रम मोठा व वेगवान करता येईल.

गाडगीळांची वैचारिक कामगिरी ही अशी आहे. त्यांच्या या काम-गिरीच्या मर्यादा पूर्वीच्या भागात निराळ्या संदर्भात दर्शविल्या आहेत. त्यांची येथे पुनरुक्ती करीत नाही. त्यांच्या समकालीन हिंदी अर्थशास्त्र-ज्ञांच्या कामगिरीशी तुलना केल्यास ही कामगिरी उत्तुंग ठरेल यात मुळीच शंका नाही. याशिवाय त्यांनी स्वत:च वैचारिक कामगिरी केली असे नव्हे तर अशा तऱ्हेची कामगिरी पुढेही सतत होत राहावी म्हणून गोखले अर्थशास्त्र संस्थेची उभारणी करून ती सुस्थिर केली. कोणत्याही तुलनेने ही सर्व कामगिरी नेत्रदीपक ठरावी अशीच आहे.

जुलै, १९७३ पुणे

# परिशिष्ट

सत्यमेव जयते

योजना आयोग
नई दिल्ली
PLANNING COMMISSION
NEW DELHI

१६, तुघलक रोड
23/६/६८

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

१६ तुघलक रोड
नवी दिल्ली
२९-७-१९८६

प्रि. ना. वि. वि.

आपले पत्र पावले. मनःपूर्वक आभार. [illegible]

[illegible]

आपला

[illegible]

## आमची प्रकाशने

रणजित देसाई

हे बंध रेशमाचे
गरुड झेप

' एस '

कामायनी

देशमुख
आणि कंपनी
पुणे २